# बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन

नोंदणी क्रमांक १) सोसायटी रजिस्ट्रेशन अधिनियम १९७४- मुंबई २९०/७४, दि. ११.१०.१९७४
२) मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधि. १९५०-क्र.एफ् /३५१० (मुंबई), दि. ३१.१२.१९७४

**✿ कार्यालय ✿**

जी-उत्तर महापालिका विभाग कार्यालय इमारत, खोली क्र. ९, तळमजला,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, प्लाझा सिनेमाच्या जवळ, दादर (प.), मुंबई- ४०००२८,
दूरध्वनी : ०२२-६९५१७८०० • भ्रमणध्वनी : ७७००९२४७४२
ई-मेल - mmpasso739gmail.com
website - www.bmpa.co.in

**✿ संलग्न संस्था ✿**

महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, पुणे.

# ५१ वा वार्षिक अहवाल

## २०२४ - २०२५

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५, वेळ - स. ११.३० वा.

**❊ स्थळ ❊**

दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, जे. के. सावंत मार्ग,
जोशी वाडी, माटुंगा (प.), मुंबई-४०० ०२८.

## (कार्यकारी मंडळाचे सदस्य )

### कालावधी : ०१-०४-२०२२ ते ३१-०३-२०२५

| सदस्याचे नांव | पद | भ्रमणध्वनी/ दूरध्वनी |
|---|---|---|
| १. श्री. कमलाकर क्षीरसागर | अध्यक्ष | ९८१९१३८२५४ |
| २. श्री. वामन कुटुंबे | उपाध्यक्ष | ९८१९०३२७७३ |
| ३. श्री. अनंत काजरोळकर | उपाध्यक्ष | ९८३३९४१२८३ |
| ४. श्री. महादेव सोहनी | उपाध्यक्ष | ९८९२२८८४४९ |
| ५. डॉ. मारुती नलावडे | कार्यवाह | ९८६९७२२२३८ |
| ६. श्री. हेमंत पटवर्धन | खजिनदार | ९१६७९५१४९९ |
| ७. श्रीम. प्रतिमा पवार | संयुक्त कार्यवाह | ९९८७७७९९५७ |
| ८. श्री. जयंत दातार | संयुक्त कार्यवाह | ९८६९६७२३७१ |
| ९. श्री. शिवराम अतकरी | संयुक्त कार्यवाह | ९८९२९१६३२४ |
| १०. श्री. चंद्रशेखर फडके | सह खजिनदार | ९६१९७४९९६४ |
| ११. श्री. दिलीप करंदीकर | (कार्यालय प्रमुख) | ९८३३८५६८५२ |
| **कार्यकारिणी सदस्य** | | |
| १२. श्री. विजयकुमार पोतदार | बदलापूर | ९७६६५२५२६७ |
| १३. श्री. रमेश राणे | बोरिवली | ९८६९०६६५२३ |
| १४. श्रीम. शोभना पाटील | कुर्ला | ९७५७३०१२८५ |
| १५. श्री. दिलीप मा. साळवी | गिरगाव | ९८६९६५५८३५ |
| १६. श्रीम. हेमलता हटकर | वसई | ९१३७०६१८०३ |
| १७. श्रीम. कोन्सेसाव डिमेलो | वसई | ८००७३५४६४० |
| १८. श्री. सुरेश सावंत | बोरिवली | ९८६९१८६८१२ |
| १९. श्री. अशोक जाधव | नवी मुंबई | ९९६७८३८४४७ |
| २०. श्रीम. शिल्पा पटवर्धन | कल्याण | ९८२०३३६५७६ |
| २१. श्री. चंद्रकांत तळेले | कल्याण | ९९८७२७३०२० |

*श्री. प्रदीप कुलकर्णी, अंतर्गत हिशेब तपासनीस, दूरध्वनी : ९७६९२२००५०

** श्री. निलेश म्हापसेकर, चार्टर्ड अकाऊंटंट, सनदी हिशेब तपासनीस, दूरध्वनी : २४७१०८७१

## अनुक्रमणिका


१) विद्यमान पदाधिकारी /कार्यकारी मंडळ सदस्य सूची - मुखपृष्ठ / मलपृष्ठ

२) तातडीने लक्ष देण्यायोग्य - दस्तऐवजांची विल्हेवाट - मलपृष्ठ

३) वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस - पृ. १

४) ५१ वा वार्षिक अहवाल - पृ. २

५) ५०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा (दि. २१ सप्टेंबर २०२४) चा इतिवृत्तांत - पृ. ५१ ते ६३

६) सनदी लेखापरिक्षकांचा अहवाल - पृ. ६४-६५

७) लेखापरिक्षित जमा-खर्च / ताळेबंद - पृ. ६६-७१

८) सन २०२५ - २०२६ साठीचे अंदाजपत्रक - इंग्रजीत (पृ. ७४) मराठीत (पृ. ७५)

# बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन
## वार्षिक सर्वसाधारण सभेची अग्रसूचना (नोटीस) – फक्त सभासदांकरिता

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या सभासदांची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **शनिवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२५, रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता, दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, जे. के. सावंत मार्ग, जोशी वाडी, माटुंगा (पश्चिम), मुंबई ४०००२८** या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. सभेत खाली नमूद केलेल्या विषयांवर विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येतील. सर्व सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी सभेला वेळेवर हजर राहून सभेत सहभाग घ्यावा.

**कार्यक्रम पत्रिका**

१) मागील (५०व्या)वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (मागील वर्षी, वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार, दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित केली होती.) सदर सभेचे इतिवृत्त माहिती प्रयोजनार्थ परिशिष्ट 'अ' मध्ये जोडले आहे.

२) ५१ वा वार्षिक अहवाल (१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५), या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षीत जमाखर्च, ताळेबंद वाचून मंजूर करणे.

३) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रक मंजूर करणे.

४) सन २०२५-२०२६ या वर्षासाठी मानद अंतर्गत हिशेब तपासनीसाची निवड करणे.

५) सन २०२५-२०२६ चे आर्थिक व्यवहार तपासण्यासाठी सनदी लेखापाल, यांची नेमणूक करणे.

६) सन २०२५ ते २०२८ (०१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८) या कालावधीकरिता ११ कार्यकारिणी सदस्यांची निवड जाहीर करणे.

७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेणे.

**कार्यकारिणीच्या आज्ञेवरून,**

मुंबई **डॉ. मारुती नलावडे**

दिनांक : २९ ऑगस्ट, २०२५ **कार्यवाह**

**टीप :**

१) **ही सभा फक्त दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत सभासद असलेल्या सभासदांसाठी आहे. सभेस येताना संस्थेचे ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे.**

२) ५०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, सन २०२४-२०२५चा वार्षिक अहवाल, लेखापरिक्षीत जमाखर्च, ताळेबंद इ. कागदपत्रांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी संबंधित अभिलेख **दि. ०१.०९.२०२५** ते **दि. १०.०९.२०२५** या कालावधीत (शनिवार, रविवार व सर्व सुट्टीचे दिवस वगळून) संस्था कार्यालयात दु. २.३० ते सायं. ४.३० या वेळेत उपलब्ध करून देण्यात येतील. शिवाय वार्षिक अहवाल, लेखापरिक्षीत जमाखर्च, इतिवृत्त व ताळेबंद आपल्या संस्थेच्या **www.bmpa.co.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील.

३) ज्या सदस्यांना ठराव मांडावयाचा असेल त्यांनी त्या ठरावाची प्रत, सभेच्या दिनांकापूर्वी किमान सात दिवस आधी पाठवावी. ठराव पाठविताना त्यावर सूचक व अनुमोदक यांच्या सह्या आवश्यक आहेत.

४) सभेच्या नियत वेळी, गणपूर्ती न झाल्यास सदर सभा अर्धा तास कालावधीसाठी तहकूब करण्यात येईल व त्यानंतर उपस्थित संख्या पुरेशी आहे असे मानून, सभेला सुरुवात करून, कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व विषयांवर निर्णय घेण्यात येतील.

५) **वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, वार्षिक अहवाल, लेखापरिक्षीत जमाखर्च व ताळेबंद सर्व सभासदांना ई-मेलद्वारा पाठवण्यात आला आहे.** तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना दै. सामना व दै. नवाकाळ मध्ये प्रकाशित करण्यात येत आहे.

६) लेखापरिक्षीत जमाखर्च, ताळेबंद तसेच वार्षिक अहवालाच्या मुद्रित प्रती, असोसिएशनच्या कार्यालयात तसेच संस्थेच्या मुंबई शहर, गोरेगांव, बोरीवली, वसई, मुलुंड, ठाणे, डोंबिवली, कल्याण, बदलापूर, नवी मुंबई, चेंबूर, पुणे इ. विविध केंद्रस्थानी, दिनांक **०१ सप्टेंबर २०२५** पासून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या संदर्भात कृपया संबंधित विभागीय कार्यकर्त्यांशी संपर्क साधून सभासदांनी वार्षिक अहवालाची छापील प्रत प्राप्त करावी.

# बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन
# ५१ वा वार्षिक अहवाल
# (वर्ष २०२४-२०२५)

**सर्व सभासद बंधू भगिनींनो,**

आपल्या असोसिएशनचा ५१वा वार्षिक अहवाल आपल्या हाती सुपूर्द करतांना कार्यकारिणीला आनंद तसेच अभिमान वाटतो. अहवाल वर्षातील ठळक बाबींचा उल्लेख पुढीलप्रमाणे :-

## १) मासिक सभा / वार्षिक सर्वसाधारण सभा :

अहवाल वर्षांत कार्यकारिणीच्या १२ सभा, पदाधिकारी मंडळाची १ सभा अशा एकूण **१३** सभा संपन्न झाल्या. कार्यकारिणीच्या सभांना कार्यकारिणी सदस्य/निमंत्रित सदस्य यांची सरासरी उपस्थिती ३५ होती.

शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी, सन २०२३-२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा, दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, जे. के. सावंत मार्ग जोशी वाडी, माटुंगा (प), मुंबई -४०००२८ माटुंगा येथे सकाळी. ११:३० वा. संपन्न झाली. सदर सभेत २५५ सभासदांनी उपस्थित राहून कामकाजात भाग घेतला.

## २) सभासद संख्या :

वृत्तांत साली एकूण ७६८ नवीन सभासद संस्थेस जोडले गेले आहेत. वृत्तांत वर्षाअखेर पटावरील सभासद संख्या २५६०२ आहे.

| सभासद | १.०४.२०२४ रोजी पटावर असलेले सभासद | नवीन झालेले सभासद | निधन झालेल्या सभासदांची संख्या | दि. ३१.०३.२०२५ रोजी एकूण सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| आश्रयदाते / आजीवन सभासद | २४८९१ | ७६८ | ५७ | २५६०२ |

## ३) सभासद नोंदणी / चळवळ :

अहवाल वर्षात संस्थेतर्फे विभागीय / केंद्रीय स्तरावर सभासदांसाठी उदबोधनपर व्याख्याने, सुवर्ण महोत्सवी सांगता संमेलने, जीवनप्रमाणद्वारा ऑनलाईन पद्धतीने हयातीचे दाखले सादर करणे, इ. प्रकारचे कार्यक्रम निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी आयोजित केले गेले. सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना संस्थेचे महत्त्व उमजल्याने ७६८ एवढया मोठया संख्येने सेवानिवृत्त संस्थेस सभासद नात्याने जोडले गेले. तरीही एकूण सुमारे १.१० लक्ष निवृत्तीवेतन धारकांची संख्या लक्षात घेता सदर वाढ ही नक्कीच समाधानकारक नाही. त्यामुळे सभासदांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येकाने सेवानिवृत्त कामगार/कर्मचारी/अधिकारी यांच्याशी संपर्क साधून नवीन सभासद नोंदणीसाठी प्रयत्न करावेत व संस्थेची संख्यात्मक ताकद वाढवावी. सभासद वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

- ❊ आजीवन सभासदत्व अर्जासोबत रु. ३१०/- (रु. ३००/- अधिक रु.१०/- प्रवेश फी)
- ❊ वार्षिक वर्गणी रु. १५०/- प्रतिवर्षी निवृत्तीवेतनातून परस्पर जमा होते
- ❊ वैद्यकीय सहाय्य योजना वर्गणी रु. २००/- प्रतिवर्षी निवृत्तीवेतनातून परस्पर जमा होते

**वैद्यकीय सहाय्य योजनेचे सभासदत्त्व घेणे ही बाब पूर्णतः ऐच्छिक आहे. दि. १३ जानेवारी २०२४ पासून, रुग्णालय खर्चाच्या २०% किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/– एवढे आर्थिक सहाय्य, सदर योजनेच्या नियम/अटी सापेक्ष अर्जदार सभासदास त्याच्या सभासदत्त्वाचा कालावधी ३ वर्षे पूर्ण झाल्यावर देण्यात येत आहे.**

तरी सर्व सभासदांनी सदस्य नोंदणीसाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करत आहोत. **''सभासद नोंदणीची चळवळ हाती घेऊ या, संघटन शक्ती वाढवू या''** अशी अपेक्षा करत आहोत.

## ४) गतिमान प्रशासकीय व्यवस्थापन व त्याची कार्यवाही :

आपल्या असोसिएशनचे कार्य अधिक भरीव व परिणामकारक व्हावे, तसेच कार्यालयीन प्रशासन गतिमान व्हावे, या उद्देशाने कांही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येऊन त्याची अंमलबजावणी देखील करण्यात आली आहे.

## ४ अ) बदल अहवालांस (Change Reports) मंजूरी प्राप्त :

दर तीन वर्षानंतर संस्थेची नवीन कार्यकारिणी निवड/निवडणूक विहीत प्रक्रियेद्वारे अस्तित्वात येत असते. त्यानुसार दि.०१.०४.२०१५ ते दि.३१.०३.२०२५ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी वेळोवेळी अस्तित्वात आली होती. त्याचे बदल अहवाल व घटना बदल अहवाल, धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे मंजूरीसाठी वेळोवेळी पाठवण्यात आले होते. परंतु कोरोना महामारी व इतर प्रशासनिक अडचणी, कागदपत्रांच्या त्रुटींमुळे बदल अहवाल मंजूर होऊ शकले नव्हते.

**संस्था कार्यवाह डॉ. नलावडे, कार्यालय प्रमुख श्री. दिलीप करंदीकर व उपाध्यक्ष श्री. महादेव सोहनी** यांच्या सततच्या चिकाटी व परिश्रमामुळे उपरोक्त कालावधीचे बदल अहवाल मंजूर करून घेण्यात संस्थेला यश मिळालेले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

| अनु क्र. | बदल अहवाल | कालावधी | सादर क्र. | मंजूर दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारिणी बदल | ०१.०४.२०१५ ते ३१.०३.२०१८ | ACC/486/2023 | २४.१०.२०२४ |
| २ | कार्यकारिणी बदल | ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०२२ (कोरोनामुळे ४ वर्षे) | ACC/2139/2020 | २४.१०.२०२४ |
| ३ | कार्यकारिणी बदल | ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२५ | ACC/4415/2022 | २४.१०.२०२४ |
| ४ | घटना बदल (Trust) | दि.११.०९.२०२२ पासून | ACC/4057/2023 | २४.१०.२०२४ |
| ५ | घटना बदल (Society) | दि.११.०९.२०२२ पासून | ACC/301/2023 | २४.१०.२०२४ |

उपरोक्त ०५ बदल अहवालास **दि. २४.१०.२०२४** रोजी धर्मादाय आयुक्तांकडून मंजूरी मिळालेली असून त्याचे आदेशही आत्ता संस्थेला प्राप्त झालेले आहेत. याविषयी मान. अध्यक्षांनी निवेदन केले, ते पुढीलप्रमाणे.

धर्मादाय आयुक्त कार्यालयातील संस्थाविषयक अभिलेख/नोंदी अद्ययावत असणे, या गोष्टीस तांत्रिक तसेच कायदेशीर/वैधानिकदृष्ट्या अत्यंत महत्त्व असते. ही मोठी त्रुटी, संस्था कार्यवाह, डॉ. मारुती नलावडे, कार्यालय प्रमुख श्री. दिलीप करंदीकर यांनी सातत्यपूर्ण प्रयत्नाने दूर केली आहे. हे योगदान अत्यंत अभिनंदनीय आहे. या कामी श्री. महादेव सोहनी तसेच सर्व सहाय्यकर्त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. या कष्टसाध्य यशामुळे, भविष्यातील संस्थेची वाटचाल सुकर होणार आहे, हे निश्चित.

**४ब)** असोसिएशनचे लेखे परीरक्षित करण्याच्या कामाचे संगणकीकरण तसेच अभिलेख्यांचे डिजिटायझेशन करण्याचे कामास आता गती मिळालेली आहे. प्रवेश शुल्क, सभासद वर्गणी, देणगी इ. च्या पावत्या व सभासदांची ओळखपत्रेही डिजिटल स्वरूपात काढली जात आहेत. तसेच सदर पावत्या, whatsApp माध्यमातून संबंधितांस विनाविलंब देण्याची कार्यवाही सुरू झालेली आहे.

**४क)** जी /नॉर्थ विभागीय कार्यालय इमारतीमधील असोसिएशनच्या कार्यालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ११:३० ते सायंकाळी ५:३० अशी करण्यात आली असून, कार्यालयीन कर्मचारी, सेवक यांचे वेतन पुनर्निर्धारित करून सेवा अटींमध्ये सुसूत्रता आणली आहे. असोसिएशनचे लेखे, टॅली, संगणकीय प्रणालीत परिरक्षित करणे, वैद्यकीय सहाय्य योजनेची माहिती, सभासद नोंदवही इत्यादी, अभिलेख संगणकीय प्रणालीत परिरक्षित करण्यासाठी, **सौ. मनाली गावड (B.Com)** यांची, पूर्ण वेळ नेमणूक केली आहे.

**४ड)** असोसिएशनचे होणारे सभासद, देणगीदार इत्यादींना पैसे देणे सोपे, सुरक्षित व्हावे, यासाठी, **QR Code** मिळवण्यात आला असून नेट बँकिंगद्वारे, डिजिटल पेमेंट सिस्टीमद्वारे रकमा स्वीकारण्यासाठी, आवश्यक सुधारणा कार्यान्वित केल्या आहेत. सभासद वर्गणी जमा करण्यासाठीचा QR Code, **www.bmpa.co.in** या वेबसाइटवर उपलब्ध असून तो पुढीलप्रमाणे आहे.




याचबरोबर कर्मचाऱ्यांचे पगार, वैद्यकीय सहाय्य रकमेचे अधिदान, इ. साठी NEFT/RTGS प्रणालींचा वापर करण्यात येत आहे.

**४इ) महानगरपालिका प्रशासनाकडून Vendor Code प्राप्त :**

सभासदांची वार्षिक वर्गणी तसेच वैद्यकीय सहाय्य योजनेची वर्गणी निवृत्तीवेतनातून दरवर्षी महानगरपालिका प्रशासनाकडून जमा करून ती नंतर संस्थेला धनादेशाद्वारे प्राप्त होत असे. सदर धनादेश प्राप्त होण्यास ३-४ महिन्याचा विलंब होत असे. महानगरपालिकेने वसूल केलेली रक्कम संस्थेला त्वरित मिळावी, यासाठी संस्थेने प्रशासनाकडे Vendor Code मिळवण्यासाठी अर्ज केलेला होता. त्यास मंजूरी मिळाली असून, आपल्या संस्थेस 0000052581 असा Vendor Code मिळालेला आहे. या Vendor Code ला संस्थेचे बँक खाते क्रमांक लिंक केलेले असून, आता यापुढे महानगरपालिकेने संस्था सभासदांकडून गोळा केलेली रक्कम लवकरात लवकर मिळवण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

**४फ)** सर्व कार्यकारणी सभासदांना सभेची नोटीस, मागील सभेचा इतिवृत्तांत, इत्यादी ईमेलद्वारे पाठवण्यास प्रारंभ केला आहे. लेखापरिक्षीत जमाखर्च, ताळेबंद, वार्षिक अहवाल व वार्षिक सभेची नोटीस सर्व सभासदांना इमेलद्वारे पाठवण्यात येते. शिवाय हे सर्व दस्तावेज संस्थेच्या www.bmpa.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध केले जात आहेत.

## ५) महागाई भत्ता वाढ :

महापालिका कर्मचाऱ्यांबरोबरच निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनाही दरवर्षी १ जानेवारी व १ जुलैपासून महागाई भत्त्यात वाढ दिली जाते. ७व्या वेतन आयोगानुसार वेळोवेळी वाढलेल्या महागाई भत्त्याच्या दराचा तक्ता माहिती प्रयोजनार्थ पुढीलप्रमाणे सादर करीत आहे. महागाई भत्ता वाढीच्या दराचा तपशील (७ व्या वेतन आयोगानुसार)

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ जानेवारी २०१६ | ते | ३० जून २०१६ | ०% |
| ०१ जुलै २०१६ | ते | ३१ डिसेंबर २०१६ | २% |
| ०१ जानेवारी २०१७ | ते | ३० जून २०१७ | ४% |
| ०१ जुलै २०१७ | ते | ३१ डिसेंबर २०१७ | ५% |
| ०१ जानेवारी २०१८ | ते | ३० जून २०१८ | ७% |
| ०१ जुलै २०१८ | ते | ३१ डिसेंबर २०१८ | ९% |
| ०१ जानेवारी २०१९ | ते | ३० जून २०१९ | १३% |
| ०१ जुलै २०१९ | ते | ३१ डिसेंबर २०१९ | १७% |
| ०१ जानेवारी २०२० | ते | ३० जून २०२० | १७% |
| ०१ जुलै २०२० | ते | ३१ डिसेंबर २०२० | १७% |
| ०१ जानेवारी २०२१ | ते | ३० जून २०२१ (प्रत्यक्ष अंमलबजावणी जुलै २०२१ पासून) | २८% |
| ०१ जुलै २०२१ | ते | ३१ डिसेंबर २०२१ | ३१% |
| ०१ जानेवारी २०२२ | ते | ३० जून २०२२ | ३४% |
| ०१ जुलै २०२२ | ते | ३१ डिसेंबर २०२२ | ३८% |
| ०१ जानेवारी २०२३ | ते | ३० जून २०२३ | ४२% |
| ०१ जुलै २०२३ | ते | ३१ डिसेंबर २०२३ | ४६% |
| ०१ जानेवारी २०२४ | ते | ३० जून २०२४ | ५०% |
| ०१ जुलै २०२४ | ते | ३१ डिसेंबर २०२४ | ५३% |
| ०१ जानेवारी २०२५ | ते | ३० जून २०२५ | ५५% |

**महागाई भत्ता, मूळ निवृत्तीवेतनावर देण्यात येतो, याची कृपया नोंद घ्यावी.**

## ६) वैद्यकीय सहाय्य निधी योजना :

सन १९९४ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनतर्फे चालवली जाणारी ही वैशिष्ट्यपूर्ण अशी योजना आहे. या योजनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

* या योजनेचे सभासदत्व मिळाल्यापासून , ३ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, स्वतः सभासद किंवा त्यांचे जोडीदाराच्या - (पती किंवा पत्नी) आजारपणासाठी आर्थिक सहाय्यासाठी मिळण्यासाठी अर्ज करता येतो.
* वैद्यकीय कारणास्तव खर्च केलेल्या एकूण रकमेच्या २०% किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य, निधी उपलब्धतेसापेक्ष मंजूर केले जाते. निधीचे प्रत्यक्ष अधिदान NEFT द्वारे करण्यात येते.
* विहीत नमुन्यातील छापील अर्जासोबत, रुग्णालयाचे अॅडमिशन / डिस्चार्ज कार्ड, डॉक्टरांचे निदान, शस्त्रक्रियेची माहिती याचे प्रमाणपत्र, हॉस्पिटलचा खर्च व बीले यांच्या मूळ प्रती जोडणे अनिवार्य आहे. हॉस्पिटलचा खर्च रु. २.५० लाखापेक्षा जास्त असल्यास इतर बिलांची आवश्यकता नाही.
* या योजनेतून आर्थिक मदत मिळण्यासाठी किमान वैद्यकीय खर्च रु. ४०,०००/- होणे अनिवार्य आहे. त्याच्या २०% किंवा अधिकतम रु. ५०,०००/- एवढी रक्कम संपूर्ण सभासदत्व कालावधीसाठी मिळू शकेल.
* प्रत्यक्ष अधिदान सुलभ व्हावे यासाठी अर्जासोबत स्वयंसाक्षांकित पॅनकार्ड, आधारकार्ड तसेच चेकची / बँक पासबुकची झेरॉक्स प्रत किंवा रद्द केलेला धनादेश जोडावा.
* एकदा या योजनेचा फायदा घेतल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत असोसिएशनचे सभासदत्व रद्द करता येणार नाही. संबंधिताने या योजनेची वार्षिक वर्गणी, वार्षिक सभासद वर्गणीसह आजीवन भरणे जरुरीचे आहे.
* तसेच इतर कोणत्याही आस्थापना/व्यक्ती, धर्मादाय संस्था, विमा कंपनीकडून मदत घेतली असल्यास व त्यांचेकडून प्राप्त प्रतिपूर्ती रकमेपेक्षा, जास्त खर्च झाल्यास, ज्यादा खर्चावरील रकमेच्या २०% प्रमाणे या योजनेअंतर्गत प्रतिपूर्ती केली जाईल, अशा प्रसंगी बिलांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात. तसेच विमा कंपनीचे रक्कम मंजूर /अधीदान झाल्याचे पत्र जोडावे.
* या योजनेंतर्गत वैद्यकीय समिती तसेच असोसिएशनच्या कार्यकारिणीने मंजूर केलेले निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असतील.
* **डोळ्याच्या ऑपरेशनसाठी** : एका डोळ्यासाठी नियमानुसार जास्तीत जास्त रु.१०,०००/- मदत देण्यात येईल. एका डोळ्याचा कमीत कमी खर्च रु. ४०,०००/- असणे जरुरीचे आहे. दंत चिकित्सेसाठी मदत अनुज्ञेय नाही.
* जास्तीत जास्त गरजू सभासदांना या योजनेचा फायदा करून देणे, हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. संस्थेचे सभासदत्व स्वीकारतानाच वैद्यकिय सहाय्य योजनेचे सभासदत्त्व स्वीकारणे अभिप्रेत आहे.
* या योजनेंतर्गत सभासदाने अर्ज सादर केल्यानंतर, रकमेच्या अधिदानापूर्वी, जर सभासदाचा मृत्यू झाला तर, नियमानुसार योग्य ती कागदपत्रे सादर केल्यानंतर, सभासदाच्या वारसास सदर रक्कम अदा करण्यात येईल.

* सभासदाच्या हिताच्या दृष्टीने वेळोवेळी नियमावलीत योग्य तो बदल करण्याचा अधिकार वैद्यकीय समिती / कार्यकारिणीला आहे. सदर बदल लगेचच लागू करण्यात येईल.
* या अहवाल वर्षात, वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत एकूण ६० अर्जांना मंजूरी देण्यात येऊन एकूण **रु. १८,१६,२००/–** (रु. अठरा लाख सोळा हजार दोनशे फक्त) इतक्या रकमेचे अधिदान करण्यात आले आहे. ही योजना सुरू केल्यापासून ते ३१ मार्च २०२५ पर्यंत संस्थेने एकूण **१३२६** सभासदांना **रु. २,०३,७६,२३५/– (रु. दोन कोटी तीन लाख शहात्तर हजार दोनशे पस्तीस फक्त)** इतके अधिदान केलेले आहे.
* या योजनेची माहिती, तसेच आर्थिक सहाय्य प्राप्त होण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, असोसिएशनच्या संकेतस्थळावर **(www.bmpa.co.in)** उपलब्ध आहे.

७अ) **दि. ०१.०४.२००० पूर्वी निवृत्त झालेल्या निवृत्तांची थकबाकी मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका.**

उपरोक्त विषयीची याचिका क्र. २५९८/२०१६ मान. उच्च न्यायालयाने दि. १५.०२.२०१९ रोजी निकाली काढली असून संबंधितांना थकबाकी देण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु दुर्दैवाने महानगरपालिका त्याच्या विरोधात मान. सर्वोच्च न्यायालयात गेली आहे. असोसिएशनच्या वतीने क्र. **SLP (C)/24360/2019** ही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. ४ वर्षानंतर म्हणजे ऑक्टोबर २०२३ मध्ये महानगरपालिकेने याला विरोध करण्यासाठी Rejoinder Affidavit सादर केले आहे. त्याला असोसिएशनतर्फे Counter Affidavit सादर केले आहे. जाने २०२४ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे Rejoinder Affidavit सादर केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या नोटीसनुसार मनपा प्रशासन व असोसिएशन या दोन्ही पक्षकारांची तडजोडीसाठी लोक अदालतीच्या माध्यमातून एक Conciallition Sitting माजगाव कोर्ट, मुंबई येथे दि. १९. जून २०२४ रोजी आयोजित केली होती. परंतु सदर दिवशी मनपा प्रशासनाने कोणताही प्रस्ताव मांडला नाही. माजगाव कोर्ट, मुंबई यांनी प्रकरण प्रलंबीत असल्याचा अहवाल मान. सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवलेला आहे. त्यामुळे आता सदर प्रकरण अंतिम सुनावणीसाठी, येणे अपेक्षित आहे. आपले अविरत प्रयत्न सुरूच असून या प्रकरणाचा अंतिम निर्णय सर्वोच्च न्यायालयातच होईल. सकारात्मक निकाल लागेल, अशी आशा करूया.

**(ब) सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे अंशराशीकरणाची फरकाची रक्कम मिळणे. (रिट याचिका क्र. १६९/२०१६) : न्यायालय याचिका प्रगती :**

सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणीप्रमाणे अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना अंशराशीकरणाची फरकाची रक्कम मिळालेली नाही. या प्रश्नी असोसिएशनने मान. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेली आहे. ही याचिका आद्याप सुनावणीसाठी आलेली नाही. असोसिएशनच्या ॲडव्होकेट श्रीम. सांगलीकर यांचेमार्फत पाठपुरावा सुरू आहे.

## ८) हयातीचा दाखला :

**अ)** हयातीचे दाखले सादर करण्याची मुदत दरवर्षी १ नोव्हेंबर ते ५ फेब्रुवारीपर्यंत असते. कोविड–२०१९ ची महामारी लक्षात घेऊन असोसिएशनने महापालिकेकडे सातत्याने पाठपुरावा करून ही मुदत ५ मार्चपर्यंत वाढवून घेतली आहे. हयातीचे दाखले प्रत्यक्ष पोस्टाद्वारे, कुरिअरद्वारेही सादर करता येतात. अहवाल वर्षात, अनेकांनी हयातीचे दाखले असोसिएशनच्या मदतीने, जीवनप्रमाण प्रणालीद्वारे online

पद्धतीने सादर केले आहेत. असोसिएशनने आपल्या स्तरावरून दादर, डोंबिवली, कल्याण, बदलापूर, मुलुंड, चेंबूर, वसई, ठाणे, गोरेगाव, बोरिवली, पुणे, नवी मुंबई, भांडूप इ. शाखांमार्फत अनेक निवृत्तांना हयातीचे दाखले जीवनप्रमाण प्रणालीद्वारा सादर करण्यासाठी सहाय केले आहे. सदर बाबतीत श्री. केळकर, श्री. बधान, श्री. देठे, श्रीम. शिल्पा नाईक, श्री. म्हात्रे, श्रीम. शोभना पाटील, श्री. भोसले, श्री. काशीनाथ पाटील, श्री. दातार, श्री. करंदीकर, श्री. क्षीरसागर, डॉ. नलावडे, श्रीम. पटवर्धन, श्री. विजय पोतदार, श्रीम. हटकर, श्री. सुहास खामकर, श्रीम. अलका जोशी, श्री. मधुकर अंबोणकर, श्रीम. मांजरेकर, श्री. कुटुंबे, श्री. आठवले, श्री. सुरेश सावंत, श्रीम. शिल्पा पटवर्धन, श्रीम.रेखा ताम्हाणेकर, इत्यादींनी मोलाची भूमिका पार पाडली आहे. या कामी श्रीम. रागिणी गुरव व श्रीम. मनाली गावड यांनी सक्रिय सहभाग दिला आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यात डोंबिवली निवासी, श्री. प्रसाद देशमुख यांचे बहुमोल सहकार्य आहे.

विशेष म्हणजे जीवणप्रमाण प्रणालीद्वारा **Face Recongnition System** चा उपयोग करून हयातीचे दाखले सादर करण्याचे कामी प्रत्येक विभागातून ३-४ कार्यकर्ते संस्थेने प्रशिक्षीत केलेले आहेत.

दरवर्षीप्रमाणे अहवाल वर्षात, जीवणप्रमाण प्रणालीद्वारा हयातीचे दाखले भरून घेण्याची एक विशेष मोहीम विभागनिहाय राबविण्यात आली. हयातीचे दाखले Online पद्धतीतून यशस्वीपणे सादर केलेल्या सर्व सभासदांनी भविष्यातही याच पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन आहे.

**अहवाल वर्षात असोसिएशनमार्फत Online पद्धतीने सादर केलेल्या हयातीच्या दाखल्याचा तपशील पुढीलप्रमाणे.**

| ठिकाण | जीवनप्रमाण प्रणालीद्वारे दाखले सादर करणाऱ्या सभासदांची संख्या |
|---|---|
| मुलुंड | ६४६ |
| बोरिवली | १०५ |
| ठाणे | १४५ |
| डोंबिवली | ५२५ |
| कल्याण | १६५ |
| बदलापूर | १५४ |
| वसई | ७२९ |
| गोरेगाव | ६५ |
| चेंबूर | ६० |
| मध्यवर्ती कार्यालय | १५९ |
| **एकूण** | **२७५३** |

असोसिएशनच्या वतीने दरवर्षी सर्व शाखांमार्फत जीवनप्रमाण प्रणालीद्वारा हयातीचे दाखले सादर करण्यासाठी अशीच मोहीम राबवली जाईल. मात्र यासाठी विभागीय कार्यकर्त्यांच्या सहकार्याची गरज आहे.

जीवनप्रमाण प्रणालीद्वारा हयातीचे दाखले सादर करताना पुढील बाबी कटाक्षाने पाळाव्यात, असे आवाहन आहे.

* पेन्शन पेमेंट ऑर्डर क्र. (PPO number) च्या जागी आपला कर्मचारी संकेतांक नमूद करणे अत्यावश्यक आहे. PPO क्र. नमूद करू नये. सॅप संगणकीय प्रणाली इ.सी.नंबर / कर्मचारी संकेतांकावर चालते.
* आधार क्रमांक अचूक नमूद करावा.
* आधारकार्ड संलग्नित पॅन कार्ड व बँकेची माहिती : खाते क्रमांक, आय.एफ.एस् सी, इ. माहिती अचूक भरावी.
* Online पद्धतीने हयातीचा दाखला सादर केल्यानंतर जीवनप्रमाणद्वारे एक पोचपावती प्राप्त होते. या पावती आधारे हयातीच्या दाखल्याची जीवणप्रमाण मधील सद्यस्थिती कळू शकते. अहवाल वर्षात ज्या निवृत्तीवेतन धारकांचे जीवनप्रमाणद्वारे प्राप्त झालेले दाखले महानगरपालिकेच्या SAP संगणकीय प्रणालीत स्वीकारले गेले, त्या सर्व सभासदांना मनपा प्रशासनाने तदनुसार ई-मेलद्वारे ७२ तासांच्या कालावधीत कळवून त्यांना चिंतामुक्त केले होते. या सुविधेसाठी पेन्शनर्स असोसिएशनने सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. सर्व सभासदांनी यापुढे हयातीचे दाखले जीवणप्रमाण प्रणालीद्वारेच सादर करावेत, असे आवाहन आहे. Face Recongnition System द्वारे निवृत्तीवेतनधारक आता त्यांच्या निवासस्थानातून सुद्धा, Life Certificate काही मिनिटात सादर करू शकतो, ही बाब महत्त्वाची आहे.

**ब) Online हयातीचे दाखले सादर करण्याविषयीच्या प्रशिक्षणात संस्था पदाधिकाऱ्यांचा सहभाग :**

जीवनप्रमाण प्रणालीद्वारा online हयातीचे दाखले सादर करण्याविषयीचे प्रशिक्षण मनपा प्रशासनाने महापालिका मुख्यालयातील कमिटी हॉलमध्ये दि.०४.१२.२०२४ रोजी आयोजित केलेले होते. सदर प्रशिक्षणास संस्थेच्या वतीने १) श्री. सुरेश सावंत २) श्रीम. नीता मांजरेकर ३) श्री. विजय सावंत ४) श्री. प्रकाश राणे व ५) श्री. महेश म्हात्रे हे कार्यकारिणी सदस्य / कार्यकर्ते उपस्थित होते.

विशेष बाब अशी की, या प्रशिक्षण वर्गात श्री. सुरेश सावंत यांनी केलेले सादरीकरण व श्रीम. नीता मांजरेकर यांनी दिलेली माहिती याची प्रशासनाकडून दखल घेतली गेली.

वरील सर्व कार्यकर्त्यांचे संस्थेतर्फे अभिनंदन !

**क) हयातीचा दाखला सादर केल्यानंतर निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक / सभासद यांनी घ्यावयाची काळजी :**

* जीवनप्रमाण प्रणालीद्वारा (online) हयातीचा दाखला सादर केल्यानंतर निवृत्ती वेतन धारकाला दाखला सादर झाल्याचा एक मेसेज त्याच्या मोबाईलवर तसेच ईमेलवर येतो. त्यामध्ये जीवनप्रमाण आय.डी दिलेला असतो. त्या मेसेजवर क्लिक केल्यास तेथे Praman Id नावाची एक विंडो ओपन होते. तेथे जीवनप्रमाण आय.डी नमूद करावा.
* त्यानंतर तिथे एक confirmation code येतो. तो त्या बॉक्समध्ये टाईप करावा. तो टाईप केल्यानंतर Generate OTP वर click करावे. एक OTP येईल. OTP टाईप करावा व login करावे. login केल्यानंतर To Download Life Certificate वर click करावे. आपणास आपले Life Certificate प्राप्त होईल. त्या Certificate च्या खाली This Life Certificate will be subject to acceptance by your Pension Processing Centre Brihanmumbai Municipal Corporation असे नमूद केलेले असेल.
* वरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पेन्शनधारकांचा असा गैरसमज होतो की, आपला हयातीचा दाखला महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. संस्थेच्या प्रतिनिधींनी संबंधितांना वारंवार बजावलेले

असते की, **आपला दाखला महानगरपालिकेने स्वीकारला आहे किंवा नाकारला आहे, असा मेसेज मोबाईलवर तसेच ईमेलवर पुढील ७२ तासांत येतो.** नाकारला असेल तर का नाकारला आहे, त्याचे स्पष्टीकरणही दिलेले असते. नाकारला असल्यास त्रुटींची पूर्तता करून पुन्हा Online दाखला सादर करता येतो.

* **दाखला सादर केल्यानंतर निवृत्तीवेतनधारकाचे पुढील ७२ तासांत मनपाकडून येणाऱ्या मेसेज / ईमेलवर लक्ष नसते.** त्यामुळे आपला दाखला नाकारल्याचे लक्षात येत नाही. परिणामी यावर्षी ११००० पेक्षा जास्त निवृत्तीवेतनधारकांचे दाखले महानगरपालिकेकडे पोहोचले नाहीत. ज्या निवृत्तीवेतन धारकांचे / कुटुंब निवृत्ती वेतन धारकांचे हयातीचे दाखले स्वीकारले गेले नाहीत, अशा ११००० + जणांची माहिती संस्थेने आपल्या वेबसाईटवर प्रकाशित केली होती व तसा संदेश सुद्धा whats App द्वारे सर्वत्र प्रसारीत केला होता. एवढे करून सुद्धा सुमारे ८००० + जणांनी दखल घेतली नाही. परिणामतः त्यांचे पेन्शन रोखले गेले. त्यामुळे त्यांना पुन्हा हयातीच्या दाखल्याचे फॉर्मस भरून निवृत्तीवेतन विभागात सादर करावे लागले. **त्यामुळे सर्व पेन्शनधारकांना आवाहन करण्यात येते की, हयातीचा ऑनलाईन दाखला सादर केल्यानंतर पुढील ७२ तास दक्ष राहून मोबाईल / ईमेल वरील मनपाचे आलेले मेसेज कृपया काळजीपूर्वक पहावेत व पुढील होणारा मनस्ताप टाळावा.**
* आपण सादर केलेला Online दाखला व तो महानगरपालिकेने स्वीकारल्याचा ई-मेल या दोन्हीच्याही Hard Copies काढून कृपया आपल्या दप्तरी ठेवाव्यात, असेही आवाहन आहे.

## ९) संस्थेची वेबसाईट (www.bmpa.co.in)

आपली संस्था व निवृत्तीवेतनधारक, यांच्यातील संपर्क, वाढते वय, विविध आजार, यामुळे अवघड होत आहे. त्यामुळे संपर्क, मार्गदर्शन, परस्पर सहकार्य सुकर व्हावे, यासाठी संस्थेने स्वतःची वेबसाईट दिनांक १२ नोव्हेंबर, २०२२ पासून सुरू केलेली आहे. या वेबसाईटमध्ये संस्था व निवृत्तीवेतनधारकांशी संबंधित इत्यंभूत माहिती देण्यात आलेली आहे. सभासदांनी या वेबसाईटला जरूर भेट देऊन घरबसल्या आपल्या समस्यांची सोडवणूक करावी. वेबसाईटमध्ये पुढील महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश आहे.

* निवृत्तीवेतन तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनची माहिती, पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य यांची नावे, संपर्क क्रमांक, मार्गदर्शक मंडळ - संकल्पना - सभासद.
* बृहन्मुंबई पेन्शनर्स असोसिएशनद्वारे संचालित वैद्यकीय सहाय्य योजनेची माहिती.
* पेन्शन अदालतीविषयी माहिती.
* मासिक निवृत्तीवेतन, मृत्यू नी सेवा उपदान (DCRG), निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण (Commutation), कुटुंब निवृत्ती वेतन, इ. आवश्यक माहिती.
* सुवर्ण महोत्सव सोहळ्याची क्षणचित्रे.
* कार्यकारिणीच्या सदस्य पदाच्या निवडणुकीविषयीची माहिती, हयातीचे दाखले न स्वीकारलेल्या सभासदांची यादी.
* असोसिएशनची संपर्कासाठी व्यवस्था.
* संस्थेचे सभासदत्व घरबसल्या प्राप्त करण्यासाठी अर्ज नमुना उपलब्ध केला आहे. वर्गणी (Cash/ Net Banking/QR code) इत्यादी माध्यमातून देता येते.

* विविध अत्यावश्यक अर्जांचे नमुने (वैद्यकीय सहाय्य / बँकेद्वारा पेन्शन / कुटुंब निवृत्ती वेतन / दुय्यम सेवा पुस्तिका, हयातीचा दाखला / माहिती अधिकार अधिनियम २००५, पेन्शन स्लिप, निवृत्ती वेतन थांबवणे, पेन्शन दावा दुय्यम प्रत, इ.)

गरजेनुसार वेळोवेळी या माहितीत वाढ, सुधारणा करण्यात येऊन माहिती अद्ययावत करण्यात येते. आजपर्यंत सुमारे २०२७ सभासद व इतरांनी संस्थेच्या संकेतस्थळाला भेट दिलेली आहे.

## १०) पेन्शन अदालत व तक्रार निवारण समिती :

संस्थेच्या कार्यालयात अनेक सभासदांच्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन, इत्यादी विषयांच्या तक्रारी सातत्याने येत असतात. अशा तक्रारी निवृत्ती वेतन विभागाकडे सादर करून त्या तक्रारींच्या सोडवणुकीसाठी असोसिएशनद्वारा अदालतीच्या माध्यमातून प्रयत्न केला जातो.

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी सकाळी ११ वा. प्रमुख लेखापाल (कोषागार), निवृत्तीवेतन विभाग, म. न. पा मुख्यालय, विस्तारित इमारत, १ ला मजला, महापालिका मार्ग, मुंबई-४००००१ येथे पेन्शन अदालत होते. या अदालतीत संस्थेचे प्रतिनिधी निवृत्त कर्मचारी / सभासद यांच्या तक्रारी मांडून त्या सोडवण्याचा प्रयत्न करत असतात.

**तक्रार निवारण समितीद्वारा केलेल्या तक्रारींचे निवारण** : निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांचेकडून विविध प्रकारच्या तक्रारी/समस्या संस्थेकडे प्राप्त होत असतात. तसेच अनेक सभासद आपल्या पेन्शनविषयक तक्रारींचे मार्गदर्शन घेण्यासाठी कार्यालयात येवून मार्गदर्शन घेत असतात. सर्व प्रकारच्या

तक्रारींचे सभासदांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित आस्थापना /निवृत्ती वेतन विभाग यांच्याकडे प्रत्यक्ष जाऊन त्या तक्रारींची सोडवणूक करणे, पेन्शन अदालतीत उपस्थित राहून तक्रारींच्या सोडवणुकीविषयी योग्य ती उपायोजना करणे, इत्यादी गोष्टींसाठी असोसिएशनने पुढीलप्रमाणे एक तक्रार निवारण समिती गठित केलेली आहे.

१) श्री. वामन वा कुटुंबे (उपाध्यक्ष) : ९८१९०३२७७३ (तक्रार निवारण समिती प्रमुख)
२) श्रीम. प्रतिमा पवार, (संयुक्त कार्यवाह): ९९८७७७९९५७
३) श्रीम. शोभना पाटील, (कार्यकारणी सदस्य) : ९७५७३०१२२८
४) श्री. शिवराम अतकरी, (संयुक्त कार्यवाह) : ९८९२९१६३३४
५) श्रीम. अनुजा आचरेकर, (निमंत्रित सदस्य) : ९८३३१९२८२१
६) श्रीम. नीता मांजरेकर, (निमंत्रित सदस्य) : ९६५३३२८७५६
७) श्री. विजय सावंत, (निमंत्रित सदस्य) : ९८६९९८६२९७
८) श्री. चंद्रकांत तळेले, (कार्यकारिणी सदस्य) : ९८८७२७३०२०
९) श्री. शरद कुवेसकर (निमंत्रित सदस्य) : ९८६९४६४५४४

सदर समितीद्वारा संस्थेचे सभासद/निवृत्त कर्मचारी यांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य केले जाते. (उदा. प्रलंबित पेन्शन दावे मंजूर करून घेणे, दावे तयार करण्यास पेन्शन विभागास सहाय्य करणे, कुटुंब निवृत्ती वेतन, सुधारित निवृत्त वेतन मंजूर करून घेणे, बंद झालेली पेन्शन सुरू करणे, वारसाच्या नावाची नोंद करणे, कमी मिळत असलेल्या पेन्शनमध्ये नियमानुसार वाढ करून घेणे, **पी.टी केस करण्यास मदत करणे, मृत्यूचा दाखला काढण्यास मदत करणे, इ**.)

सदर प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी आवश्यकतेनुसार वरील सदस्य संबंधित विभाग/निवृत्ती वेतन विभाग येथे जाऊन संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्याशी चर्चा करून समस्या लवकरात लवकर

सोडवण्याचा प्रयत्न करत असतात. अहवाल वर्षात समितीकडे आलेल्या प्रकरणांचा गोषवारा पुढीलप्रमाणे देण्यात आलेला आहे.

**एकूण प्राप्त प्रकरणे : १९**
**निकाली निघालेली प्रकरणे : ०७**
**कार्यवाही सुरू असलेली प्रकरणे : १२**

## वानगीदाखल काही ठळक यशोगाथा पुढीलप्रमाणे

**१) श्रीम. योगिता शिंदे, EC-4112295, सभासद क्र. २४२९४**

श्रीम. योगिता शिंदे यांच्या पतीचे निधन होऊन २-३ वर्षे झाल्यानंतरही त्यांचे कुटुंब निवृत्तीवेतन सुरू होत नव्हते. समितीच्या वतीने या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. या प्रयत्नाला यश मिळून त्यांचा कुटुंब निवृत्तीवेतनाचा दावा मंजूर झाला असून निवृत्ती वेतन सुरू झाले आहे. त्यांना सर्व रक्कम प्राप्त झाली आहे. एवढेच नाही तर त्यांना वारसा हक्काने नोकरी मिळवून देण्यातही संस्थेला यश आले आहे.

**२) श्रीम. एलिझाबेथ येशू मित्र, EC - 3723599, सभासद क्र.२६५४०**

श्रीम. एलिझाबेथ या जुलै, २०२३ रोजी लो.टी.म.स. रुग्णालयामधून प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून सेवानिवृत्त झाल्या. दीड वर्षे होऊनही त्यांना कोणत्याही प्रकारची रक्कम प्राप्त झालेली नव्हती. एवढेच नाही तर त्यांना निवृत्तीवेतनही सुरू नव्हते, साधा पेन्शन दावाही तयार करण्यात आलेला नव्हता.

एस.एस.सी. ला मराठी विषयात पास नसणे, एम.एस.सी.आय.टी परीक्षा पास नसणे, रजेबाबतची विसंगती, इ. त्रुटींमुळे हा दावा प्रलंबित होता. या सर्व त्रुटींची पूर्तता करून सदर दावा मंजूर करून घेण्यात संस्था प्रतिनिधी **श्रीम. प्रतिमा पवार, श्रीम. शोभना पाटील, श्री. विजय सावंत** यांना यश लाभले आहे. या कामी **श्री. सतीश आवटे** यांचे बहुमूल्य योगदान विसरता येणार नाही.

३१ मार्च, २०२५ रोजी त्यांचे सर्व दावे निकाली निघाले असून त्यांना **रु. १४,००,०००/- (रु. चौदा लक्ष फक्त) इतकी रक्कम प्राप्त झाली व किमान पेन्शनही सुरू झालेली आहे.**

पेन्शन सुरू होत नसल्याने त्यांची हलाखीची परिस्थिती पाहता असोसिएशनच्या कांही पदाधिकारी / कार्यकर्त्यांनी त्यांना स्वतःच्या खिशातून आर्थिक मदत केली होती, हे विशेष होय.

**३) श्री. सुनील चव्हाण, EC-3535987, सभासद क्र. २५९४३**

श्री. सुनील चव्हाण, निवृत्त मेकॅनिकल, हे मुंबई अग्निशमन दलातून दि. ३१.०७.२०२३ रोजी सेवानिवृत्त झाले. दीड वर्षांपासून त्यांचे सर्व दावे प्रलंबीत होते. समिती सदस्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावामुळे त्यांचे सर्व दावे निकाली निघाले असून त्यांना **रु. ३०,००,०००/- (रु.तीस लक्ष)** चे अधिदान झालेले आहे.

**४) श्रीम. ख्रिस्तीना रॉकी रिजाई, EC-3545795, सभासद क्र. २५७३६**

श्रीम. ख्रिस्तीना या दि.३१.१२.२०२२ रोजी जलमापक निरीक्षक या पदावरून एच/पूर्व येथून सेवानिवृत्त झाल्या. परंतु त्यांचे दावे २ वर्षांपासून कांही ना कांही कारणास्तव प्रलंबित ठेवण्यात आले होते. समिती सदस्यांच्या अथक परिश्रमामुळे त्यांचे सर्व दावे मंजूर झाले असून, त्यांना सर्व रक्कम प्राप्त झालेली आहे.

**५) श्रीम. पल्लवी धुमक, EC-3560598, सभासद क्र. निरंक**

श्रीम. धुमक या शताब्दी हॉस्पिटलमध्ये कार्यरत असताना कर्करोगाने २०२३ मध्ये मृत्यू पावल्या.

कालांतराने त्यांच्या पतीचेही निधन झाले. त्यांचा मुलगा श्री. कुणाल धुमक यास मनपाकडून देय असलेली रक्कम मिळवून देण्यासाठी समिती सदस्यांनी ठोस प्रयत्न केले व त्यास सर्व रक्कम प्राप्त झाली. विशेष म्हणजे श्री. कुणाल यांस पी.टी. केस अंतर्गत मनपाची नोकरीही मिळवून देण्यात यश आले आहे.

**६) श्री. मोहन पद्मा, EC-3680870, सभासद क्र. २४४९५**

श्री. मोहन पद्मा, निवृत्त नोंदणी सहाय्यक, लो. टि. म. रुग्णालय, सायन यांचे निवृत्ती वेतन, इत्यादी प्रलंबित दावे निकाली काढण्यास ठोस मदत करण्यात आली. व त्यांना सर्व देय रक्कम मिळवून देण्यात आली.

उपरोक्त सर्व तक्रारींचे निरसन करुन संबंधितांना दिलासा देण्याचे काम **१) श्रीम. प्रतिमा पवार २) श्रीम. शोभना पाटील ३) श्री. विजय सावंत** यांनी केलेले आहे.

त्यांचे संस्थेतर्फे आभार व पुढील कार्यास शुभेच्छा!

**विशेष अदालतीचे आयोजन :**

लोकमान्य टिळक रुग्णालय, शीव येथून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांचे विविध लाभ मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी कार्यालयात प्राप्त झाल्याने मे २०२४ मध्ये अधिष्ठाता श्री. मोहन जोशी यांच्या दालनात संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर एका बैठकीचे आयोजन करण्यात आले. सदर बैठकीचे आयोजन करण्याबाबत श्री. सतीश आवटे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

सदर बैठकीत संस्थेच्या वतीने संयुक्त कार्यवाह श्रीम. पवार, श्रीम. पाटील, श्री. विजय सावंत, श्रीम. चिकुर्डे यांनी सहभाग घेतला. प्राप्त तक्रारी सोडविण्याचे आश्वासन श्री.मोहन जोशी यांनी दिले.

**श्री. चंद्रकांत तळेले,** कार्यकारिणी सदस्य यांनी सोडविलेली प्रकरणे पुढीलप्रमाणे.

**६) श्रीम. विजया काजरेकर (शिक्षण विभाग) EC-2851354, सभासद क्र. २६४२६**

यांचे दि.०४ जाने, २०२२ रोजी निधन झाले. दोन वर्षे होऊनही त्यांचा कुटुंब निवृत्ती वेतन दावा मंजूर होऊ शकला नाही. सातत्यपूर्ण ठोस प्रयत्न करून सदर दावा मंजूर करून घेण्यात यश आले. नोव्हेंबर २०२४ मध्ये श्री. विष्णू काजरेकर यांना कुटुंब निवृत्ती वेतन सुरू झाले. तसेच त्यांना रु.४,४७,०००/- (रु. चार लाख सत्तेचाळीस हजार फक्त) थकबाकीची रक्कमही प्राप्त झाली.

**७) श्रीम. लता खाचणे (शिक्षण विभाग) EC-2947860, सभासद क्र.२६४९९**

यांचे दि.ऑक्टो २०२३ रोजी निधन झाले. दीड वर्षांपासून त्यांचा कुटुंब निवृत्ती वेतन दावा प्रलंबित होता. सतत पाठपुराव्यामुळे श्री. सुधाकर खाचणे यांना फेब्रुवारी २०२५ पासून कुटुंब निवृत्ती वेतन सुरू होऊन थकबाकीची रक्कम रु.३,७७,०००/- (रु. तीन लाख सत्याहत्तर हजार) प्राप्त झालेली आहे.

**श्री. चंद्रकांत तळेले** यांचे संस्थेच्या वतीने आभार व अभिनंदन. तसेच पुढील कार्यासाठी शुभेच्छा!

८) **संस्थाध्यक्ष मान. कमलाकर क्षीरसागर यांच्या अथक प्रयत्नातून कै. नाना सावंत यांच्या पेन्शन वृद्धीत झालेली लक्षणीय वाढ.**

श्री. नाना सावंत, वय वर्षे १०२ +, निवास - माणगाव, जिल्हा रायगड जवळील एक छोटे गाव, यांना शतकोत्तर, १०० टक्के, निवृत्ती वेतन वाढ , मंजूर करून देण्यात बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनला यश लाभले आहे. हे कार्य संबंधित लेखा अधिकारी, खातेप्रमुख यांच्या सहकार्याने शक्य झाले आहे.

श्री. सावंत अग्नीशमन दलात कार्यरत होते व विशेष बाब म्हणजे त्यांनी १९४२ च्या मुंबई गोदीत

कार्यरत असताना गोदी स्फोटात झालेल्या जखमा सहन करत कार्य केले. अशी प्रकरणे दुर्मिळ आहेत व असोसिएशनचा आपल्या सेवानिवृत्त मंडळींना आधार वाटतो, हे महत्त्वाचे आहे.

| | | |
|---|---|---|
| पहिली पेन्शन | रु. | २९/- |
| मागील दोन वर्षापर्यंत | रु. | १२,०००/- |
| ऑक्टोंबर २०२४ पासून | रु. | २२,०००/- |
| प्राप्त थकबाकी | रु. | २.६८ लाख . |

२७.१०.२०२४ रोजी माणगाव येथे जाऊन संस्था पदाधिकऱ्यांनी श्री. सावंत यांचा सत्कार केला. श्री. रवींद्र अंबुलगेकर, अ.द. खाते प्रमुख यांचे या कामी मोलाचे सहकार्य झाले.

९) कै.एस.एस राणे, निवृत्त वरिष्ठ अधिकारी, लेखा खाते यांचे निधनानंतर त्यांच्या पत्नीस एक वर्षानंतर मान. श्री. क्षीरसागर यांचे प्रयत्नातून कुटुंब निवृत्ती वेतन सुरू झाले. लेखा खात्यातील निवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बाबतीत सुद्धा कुटुंब निवृत्तीवेतन मंजूर होऊन प्राप्त होण्यास अतिविलंब झाला, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. **सकारात्मकतेचा अभाव, दुसरे काय?**

१०) नरे परिसर, पुणे येथील वृद्धाश्रमात श्रीम. उषा पडळकर या आपल्या कुटुंब निवृत्तीवेतनधारक राहतात. त्यांचा मुलगा अमेरिकेत वास्तव्यास आहे. त्यांच्या मुलांनी कुरियर मार्फत पाठवलेला श्रीम. पडळकर यांचा हयातीचा दाखला प्रशासनास प्राप्त झाला नाही किंवा गहाळ झाला. परिणामी त्यांना एप्रिल, २०२४ ते ऑक्टोबर, २०२४ या कालावधीचे कुटुंब निवृत्ती वेतन मिळाले नाही. सदर बाब मान. अध्यक्षांच्या कानावर येताच त्यांनी पुणे येथील श्री. शरद कुलकर्णी व श्री. उदय देशपांडे यांच्याशी संपर्क साधला. या द्वयींने श्रीम. पडळकर यांची वृद्धाश्रमात भेट घेऊन वैद्यकीय दाखल्यासह त्यांचा हयातीचा दाखला भरून घेऊन तो त्वरित मनपा प्रशासनाकडे सादर केला. त्यांना वरील कालावधीचे पेन्शन मिळवून देण्यात आले.

**एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथचे हे एक आदर्श उदाहरण आहे. या निस्पृह सेवा कार्यासाठी श्री. कुलकर्णी व श्री. देशपांडे यांचे संस्थेतर्फे आभार.**

११) **कै. विजयसिंह पाटणकर,** संस्थेचे माजी अध्यक्ष यांचे निधनानंतर त्यांच्या पत्नीचा कुटुंब निवृत्ती वेतन दावाही ६ महिने रखडलेला होता. संस्थेचे उपाध्यक्ष श्री. महादेव सोहनी यांनी सतत पाठपुरावा करून त्यांचा कुटुंब निवृत्ती वेतन दावा मंजूर करून घेतला.

श्री. महादेव सोहनी यांचे संस्थेतर्फे आभार!

१२) केंद्रिय कार्यालयात नोंदी नसलेल्या विभागीय स्तरावरच्या अनेक प्रकरणांचा निपटारा **श्री. शिवराम अतकरी, श्रीम. नीता मांजरेकर, श्रीम. अनुजा आचरेकर व श्री. शरद कुवेस्कर** यांनी केलेला आहे. या सर्वांचे संस्थेतर्फे अभिनंदन व आभार‘

उपरोक्त ठोस, उदाहरणांव्यतिरिक्त अशी अनेक प्रकरणे संस्थेमार्फत धसास लावलेली आहेत. अशा प्रकारच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व संबंधित पदाधिकाऱ्यांचे / कार्यकर्त्यांचे संस्थेतर्फे हार्दिक आभार!

सर्व सभासद/निवृत्त कर्मचारी यांना आवाहन करण्यात येते की, आपल्या काही समस्या असल्यास त्यांचे निराकरण करून घेण्यासाठी उपरोक्त नमूद केलेल्या तक्रार निवारण समिती सदस्यांशी अवश्य संपर्क साधावा.

**तक्रार निवारण समितीने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व समिती सदस्यांचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा!**

सभासदांना आवाहन करण्यात येते की, आपल्या कांही समस्या असल्यास, त्या वरील प्रतिनिधींशी संपर्क करून सोडवून घ्याव्यात. या तक्रार निवारण सोईची सुविधा मुलुंड, डोंबिवली, बोरिवली, तसेच वसई विभाग केंद्रात उपलब्ध आहे.

## ११) केंद्रिय स्तरावरील आयोजित कार्यक्रम :

जी/नॉर्थ येथील केंद्रिय कार्यालयात १) दसरा संमेलन व २) दीपोत्सव, असे दोन कार्यक्रम साजरे करण्यात आले. रांगोळी सजावट, गीत गायन ही कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्टे होती. संस्थेत काही पदाधिकारी व कार्यालयीन कर्मचारी यांनी यात उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

## १२) विभागीय वृत्त :

डोंबिवली, कल्याण, ठाणे, मुलुंड, मुंबई शहर, वसई, बदलापूर, गोरेगाव, बोरीवली, चेंबूर, पुणे अशा ११ विभागीय शाखांमार्फत सभासदांसाठी अहवाल वर्षात विविध कार्यक्रम/उपक्रम/व्याखाने, इ. गोष्टींचे आयोजन करण्यात आले. विभागनिहाय वृत्ताचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे.

# संक्षिप्त अहवाल

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष विविध गुणांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरले. त्यातला एक घटक होता संस्थेच्या ११ शाखांची वाटचाल, सुवर्ण महोत्सवी सांगता कार्यक्रम व त्यांचे वर्धापन दिन. संक्षिप्त अहवाल या विभागात आपणास या सर्व गोष्टींची क्षणचित्रे फोटोसह वाचावयास मिळतील. संस्थेस अभिमान वाटावा, असाच हा संक्षिप्त अहवाल आहे. याबाबत संस्था स्वतःस गौरवशाली समजत असून सर्व अकरा शाखेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, देणगीदार व सर्व सभासदांचे संस्था आभार मानत आहे व सर्व ११ शाखांच्या कार्यकर्त्यांच्या चमूला शाबासकी देत आहे. ''**कल्याने होत आहे रे**'' हाच संदेश यातून सर्वांना मिळत आहे.

## १२.०१ : कल्याण विभाग

कल्याण शाखेची सुरुवात २०१८ पासून झाली. अहवाल वर्षातील शाखेने आयोजित केलेले उपक्रम पुढीलप्रमाणे.

**मासिक सभा** :

अहवाल सालात अनेक सभा घेतल्या गेल्या. त्यात पेन्शन संदर्भातील तक्रारी, पेन्शन स्लिप, कुटुंब निवृत्तीवेतन, सर्वथैव सक्षमतेवर आधारित मार्गदर्शन / चर्चा असे सभेचे स्वरूप होते. महिन्यातून एक सभा ज्येष्ठ नागरिक संघ, राणी लक्ष्मीबाई उद्यान, सिंडिकेट कल्याण येथे घेतली गेली. प्रत्येक सभेला सुमारे ४० ते ५० सभासद उपस्थित होते.

सभासदांचे वाढदिवस साजरे करणे, नवीन सभासद नोंदणी, व्यक्तिगत अथवा गटाने सभासद नोंदणी करताना आलेले अनुभव कथन व चर्चा असे सभेचे विषय होते. या अहवाल वर्षात घरोघरी जाऊन १२५ सभासद व केंद्रप्रमुख म्हणून शिल्पा पटवर्धन यांनी २०० सभासद नोंदणी केली आहे. अनेक वेळेला संस्थेचे कांही कार्यकारिणी पदाधिकारीही मार्गदर्शनार्थ सभेत उपस्थित होते.

**हयातीचे दाखले** :

दि.०८.१२.२०२४ रोजी पेन्शनर्स असोसिएशनद्वारा १६५ सभासदांचे ऑनलाईन हयातीचे दाखले सादर करण्याचा उपक्रम घेण्यात आला. या कामात श्री. देशमुख सर व श्रीम. रागिणी गुरव यांची मोलाची मदत झाली आहे.

❀ **सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ :**

२३ फेब्रुवारी, २०२५ रोजी पंडितवाडी सभागृहात सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ संपन्न झाला. सकाळी ९:३० ते २:३० पर्यंत चाललेल्या या समारंभात सर्वांचे गुलाबाचे फूल, पेढा व बिस्किटाचा पुडा देऊन स्वागत केले गेले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वललाने समारंभ सुरू झाला. श्रीम. शिल्पा पटवर्धन यांच्या सुरेल आवाजात ईशस्तवन, स्वागत गीत व राज्यगीत सादर केले. राज्य गीतासाठी श्रीम. रेखा सहस्त्रबुद्धे, श्रीम. अलका हिंगणे, श्रीम. मंगल वैद्य, श्री. विनायक मोघे, श्री. किरण शहा, श्री. परदेशी व श्री बागुल यांनी साथ दिली. शिल्पा पटवर्धन यांनी सभागृहाला शाखेच्या वाटचालीचा परिचय करून दिला. नंतर संस्थेचे पदाधिकारी, समाजसेवक, कलाकार, साहित्य- नाटय - सांस्कृतिक क्षेत्रात काम करणारे ज्येष्ठ व स्थानिक कलाकारांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

संस्थेचे कार्यवाह **डॉ. मारुती नलावडे** यांनी कल्याण शाखेच्या कार्यकर्त्यांचे खूप कौतुक केले. संस्थेच्या कार्यावर प्रकाश टाकताना त्यांनी सांगितले की, कार्यकर्त्यांनी मतभेदाचे - मनभेदात व व्यक्तिभेदाचे - व्यक्तिसुडात रूपांतर होणार नाही, याची काळजी घ्यावी. संस्थेचे अध्यक्ष **श्री. कमलाकर क्षीरसागर** यांनी कार्यक्रमाचे कौतुक करताना दैनंदिन संपर्काचे महत्त्व पटवून दिले. ५० वर्षात संस्था संख्यात्मक व गुणात्मक वाढीचेही उद्दिष्ट गाठत आहे, याबद्दल समाधान व्यक्त केले.

यानंतर दोन तास संगीत मैफीलीचा आस्वाद घेत उपस्थित धुंद झाले. विशेष म्हणजे श्री. योगेश जोशी यांच्या 'हसू आणि आसू'मुळे वातावरण हास्यमय झाले. शेवटी शिल्पा पटवर्धन यांनी पेन्शनर्स असोसिएशनवर स्वरचित गीत सादर केले. या समारंभात श्री. अतुल राव साहेब, डॉ. विद्याताई ठाकूर, डॉ.आनंदराव सुर्यवंशी त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला व आभार प्रदर्शनाने कार्यक्रम संपन्न झाला.

या व वर्षभरातील इतर कार्यक्रमास श्री. गोविंद भावे, श्री. अभय चौबळ, श्री. सुरेश महाजन, श्री. चंद्रकांत तळेले, श्री. श्रीकांत पाटील, श्री. नितीन कपोते, श्री. विनायक मोघे, श्री.अप्पा कुलकर्णी, श्री. वसंत कोतवाल, श्री. पालवे, श्री. रवींद्र बाविस्कर, श्रीम. रेखा सहस्त्रबुद्धे, डॉ. जोग, श्रीम. माया हांडे यांचे उत्तम सहकार्य लाभले.

❀ तक्रारी व संपर्कासाठी नावे व संपर्क क्रमांक

१) श्रीम. शिल्पा पटवर्धन ९८२०३३६५७६
२) श्री. अभय चौबळ ९९२०५७५७३१
३) श्री. रवींद्र बाविस्कर ९००४३९०७२७
४) श्री. चंद्रकांत तळेले ९९८७२७३०२०
५) श्री. विनायक मोघे ९८१९१२०४९३
६) श्री. श्रीराम कुलकर्णी ९८३३५८९३४०

पुढील उपक्रमास कल्याण विभागास संस्थेतर्फे हार्दिक शुभेच्छा !

## १२.०२ : चेंबूर विभाग

चेंबूर शाखा गेल्या वर्षीच माघी जयंतीला स्थापन झाली. स्थापनेनंतर चार महिने उत्साह भरभरून वहात होता. अनेक जुने सभासद या निमित्ताने प्रथमच संपर्कात येत होते. दर आठवडयात साप्ताहिक सभा होत होती. सगळ्यांची ख्यालीखुशाली समजत होती पण गाडी पुढे जात नव्हती. त्यानंतर गृहभेटी सुरू केल्या. त्यामधून सभासद संपर्क झाला व सभासद नोंदणी होत गेली. अमेय सोसायटीमधील तात्पुरती जागा कमी पडू लागली असून एम् (पश्चिम) विभागाच्या सहआयुक्तांना भेटून कॉन्फरन्स हॉलची मागणी केली आहे व त्याचा पाठपुरावाही चालू आहे. अहवाल वर्षातील महत्त्वाचे उपक्रम पुढीलप्रमाणे.

**❧ संपर्क अभियान सभा :**

चेंबूर शाखेचा विकास हा संपर्क अभियानातूनच होऊ शकतो याची जाणीव सर्व कार्यकर्त्यांना झाली. सन्मा. खेडेकर सरांनी, आधी सभासद नोंदणी व संपर्क अभियान यावर लक्ष केंद्रित करण्यास सुचवले व स्वतः चेंबूरमधील सर्व महापालिका कर्मचाऱ्यांच्या सोसायटींना संपर्क करण्यास सुरुवात केली. श्री. कामेरकर सरांचाही संपर्क दांडगा असल्यामुळे त्यांचीही मोलाची साथ मिळाली. खेडेकर सरांनी मुंबईमधील ७३ सोसायटी व चेंबूरमधील ३५ सोसायटयांचे पत्ते, फोन नंबर मिळवून दिले व स्वतः त्यांच्याशी संपर्क करून सुमारे ६-७ सोसायटींची एक सभा, अशा ५-६ सभा, संपर्क अभियानांतर्गत घेतल्या गेल्या. त्यासाठी ताराराणी सोसायटीने त्यांचे कार्यालय वापरण्यास दिले. त्यांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत.

**❧ ऑनलाइन हयातीचे दाखले सादर करणे :**

जीवन प्रमाण प्रणाली अंतर्गत हयातीचे दाखले सादर करण्यासाठी मनपा आयोजित प्रशिक्षणात श्री. प्रकाश राणे व श्री. महेश म्हात्रे यांनी सहभाग घेतला. त्याआधारे अमेय सोसायटीमध्ये सुमारे ५०-६० निवृत्तांचे ऑनलाईन दाखले महापालिकेला सादर करण्याचा उपक्रम राबविला गेला. त्यातही वृद्ध सभासदांच्या घरी जाऊन त्यांची जीवन प्रमाणपत्रे सादर केली गेली. श्री. प्रकाश राणे, श्री. महेश म्हात्रे, श्रीम.शिल्पा नाईक, श्रीम. शोभना पाटील यांचे सभासदांना घरपोच सेवा देण्यात मोठे योगदान होते.

**❧ सभासद नोंदणी :**

यावर्षी ५०-६० निवृत्त कर्मचाऱ्यांना संस्थेचे सभासद केले गेले. त्यातही शिक्षण विभागाचे कर्मचारी जास्त प्रमाणात होते. सभासद नोंदणीमध्ये श्रीम.शकुंतला थोरात यांचा पुढाकार महत्त्वपूर्ण होता.

**❧ तक्रार निवारण :**

श्रीम. शोभना पाटील या पेन्शनर्स असोसिएशनच्या तक्रार निवारण कक्षाच्या सदस्या असल्यामुळे अमेय सोसायटीत अनेक प्रकारच्या तक्रारींचे निरसन व्हावे, यासाठी मार्गदर्शन केले गेले. कुटुंब निवृत्ती वेतन, ८० वर्षानंतरची पेन्शन वाढ, वारस नोंदणीतील त्रुटी, जातीचे प्रमाणपत्र, गहाळ पेन्शनपुस्तिका अशा प्रकारचे तक्रारींचे स्वरूप होते. श्रीम. शोभना पाटील यांनी जेष्ठांशी संवाद साधला व कांही खबरदारीच्या युक्त्या दिल्या. मात्र सर्व तक्रारींची नोंदणी ना चेंबूर शाखेच्या रजिस्टरमध्ये झाली ना संस्थेच्या. पुढील वर्षापासून ही त्रुटी सुधारली जाईल व तक्रारींचा पाठपुरावाही केला जाईल अशी आशा आहे.

**❧ सांगता समारंभ व प्रथम वर्धापन दिन :**

१६ मार्च २०२५ रोजी 'चेंबूर महिला समाज सभागृह' येथे संस्थेचा सुवर्ण महोत्सवी सांगता सोहळा अत्यंत दिमाखात साजरा केला गेला. सर्व पदाधिकारी व पाहुण्यांचे ढोलताशाच्या गजरात स्वागत करून सर्वांचे औक्षण केले गेले. ह.भ.प. **अनिता कचरे** यांचे ईशस्तवनपर किर्तन, रंजना जगताप व डॉ. कविता यांचे कथ्यक आधारीत स्वागत नृत्य व मराठी भाषा गीत, 'बाईपण भारी गं' हे नृत्य नाटय, श्रीम. शिल्पा नाईक लिखित व दिग्दर्शित सव्वीस मराठी ओव्या'' व श्री. सावंत व सहकारी यांची सुगम संगीताची मैफील रंगली. या कार्यक्रमात सर्व निवृत्त सभासदांनी आपापल्या कलेची चुणूक दाखविली.

सदर प्रसंगी श्रीम. शोभना पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून इच्छापत्र, वारसनोंद करणे इ. कागदपत्रे तसेच ''श्रीमद् भगवत गीता श्लोकार्थसहित हे गीताप्रेस गोरखपूर'' नावाचे पुस्तक उपस्थितांना वितरित करण्यात आले.

प्रथम सत्रात मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. त्यानंतर संयुक्त कार्यवाह श्रीम.प्रतिमा पवार यांनी निवृत्तीवेतनाचे मुद्दे अधोरेखीत केले व **डॉ. मारुती नलावडे** यांचे काव्यमय मनोगत व हॉल निवडीवरील भाष्यांनी सर्वांचे लक्ष वेधले तर अध्यक्ष **श्री. कमलाकर क्षीरसागर** यांनी चेंबूरवासियांशी साधलेला सुसंवाद उपस्थितांना प्रभावित करून गेला. निसर्गोपचार तज्ञ **डॉ. दिलीप बढीये** यांचे व्याख्यान अत्यंत मोलाचे व संस्थेचे सर्वथैवसक्षमतेचे उद्दिष्ट साधणारे ठरले. एकंदरीत पाहता अत्यंत वेगवेगळ्या कार्यक्रमांनी हा समारंभ संपन्न झाला, ज्यामागे संस्थाध्यक्ष **मान. क्षीरसागर सर व कार्यवाह डॉ. नलावडे** सरांची प्रेरणा होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी **श्रीम. शिल्पा नाईक व श्रीम. शोभना पाटील** यांच्या नेतृत्वाखाली श्रीम. प्रमिला कोंडगेकर, श्रीम.सुष्मिता चिकोर्डे, श्रीम. ज्योती जोशी, श्रीम. शकुंतला थोरात, श्री.प्रकाश राणे, श्री. महेश म्हात्रे, श्री. विजय सावंत, श्रीम. रंजना जगताप, श्रीम. साधना पुरोहित, श्रीम.आशा साने, श्रीम. सुजाता जोशी अशा अनेक कार्यकर्त्यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

- तक्रारी व संपर्कासाठी नावे व संपर्क क्रमांक

१) श्रीम. शिल्पा नाईक ९८२०२२२०७५
२) श्रीम. शोभना पाटील ९७५७३०१२८५
३) श्रीम. प्रमिला कोंडगेकर ९३२३७१९५९०
४) श्रीम. शकुंतला थोरात ९००४०७८४६४
५) श्रीम. सुष्मिता चिकोर्डे ९३२४७९७३१०
६) श्री. प्रकाश राणे ९८६९४१९३९७
७) श्री. महेश म्हात्रे ९८६९२२७४८३

चेंबूर विभागाचे संस्थेतर्फे अभिनंदन व पुढील उपक्रमास शुभेच्छा !

## १२.०३ : ठाणे विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या ठाणे शाखेच्या सन २०२४-२५ या वर्षातील वाटचालीचा आढावा खालीलप्रमाणे :

**आयकर मार्गदर्शन :**

मंगळवार दिनांक २५ जून २०२४ रोजी श्री. मिलिंद देशमुख, सनदी लेखापाल यांचे आयकराविषयी मार्गदर्शन जल विभाग कार्यालय, कापूरबावडी, ठाणे येथील वेल्फेअर सेंटरमध्ये आयोजित केले.आयकराविषयी असलेल्या समस्या, त्यातील खाचखळगे, त्याचप्रमाणे आयकर परतावा भरणे आवश्यक आहे का? याबाबतची अतिशय उपयुक्त माहिती देण्यात आली. या उपक्रमास १३० निवृत्त कर्मचारी उपस्थित होते.

**हेरिटेज वॉक :**

रविवार दिनांक ०७ जुलै, २०२४ रोजी श्रीम. अलका जोशी यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील पुरातन वास्तू व त्यांचे महत्त्व, त्यांची स्थापना या बाबतची प्रत्यक्ष माहिती हेरिटेज वॉकद्वारे देण्यात आली. आपण नेहमी पहात असूनदेखील अशा वास्तू आपल्यासाठी अनभिज्ञ असतात. त्याबाबतची माहिती या निमित्ताने नव्याने मिळाली. तसेच हेरिटेज वॉक चा प्रत्यक्ष अनुभवही घेता आला. हा उपक्रम सगळ्यांना आनंद देऊन गेला.

**संगीत मैफिल :**

गुरुवार दिनांक ०८ ऑगस्ट, २०२४ रोजी आपल्याच सेवानिवृत्त सहकाऱ्यांची कराओकेवर सांगीतिक

मैफिल, विभाग कार्यालय, कापूरबावडी ठाणे येथील वेल्फेअर सेंटर येथे आयोजित करण्यात आली. यास सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ :**

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त (१९७४ –२०२४) ठाणे शाखेतर्फे सेवानिवृत्तांचे स्नेहसंमेलन तथा सुवर्ण महोत्सवी सांगता सोहळा बुधवार दिनांक २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी ठाणे येथील ज्ञानराज सभागृहात संपन्न झाला. एकूण पाच तास चाललेल्या या कार्यक्रमात सभागृहातील उपस्थिती लक्षणीय होती. संस्थाध्यक्ष मान. **श्री. कमलाकर क्षीरसागर** व संस्था कार्यवाह **डॉ. मारुती नलावडे** यांची उदबोधक, सकारात्मक व जगण्यासाठी नवी उमेद देणारी मनोगते उपस्थितांना प्रभावित करून गेली. गुणवंतांचा सत्कार, सौ. दिपाली केळकर यांनी सादर केलेला **'गप्पांच्या गावा जावे'** हा कार्यक्रम, आपल्या एक सहकारी श्रीमती सुषमा भागवत यांनी दिग्दर्शित केलेला. **'वाह गुरू'** या नाटकातील नाट्यप्रवेश व गाण्यांचा कार्यक्रम यामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.

**जीवन प्रमाणद्वारा हयातीचे दाखले सादर करणे :**

सोमवार दिनांक ९ डिसेंबर २०२४ रोजी जल विभाग, कापूरबावडी कार्यालय येथील सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विशेष म्हणजे व्हॉट्सअ‍ॅपवरून सभासदांना याबद्दलची पद्धती समजावून सांगितलेली असल्यामुळे व त्याचे प्रात्यक्षिकही दिलेले असल्यामुळे कित्येकांनी घरबसल्या हयातीचा दाखला सादर केला. या उपक्रमातून सुमारे १४५ सेवानिवृत्तांचे दाखले सादर करण्यात आले.

ठाणे शाखेच्या वाटचालीत **श्री. सुहास खामकर व श्री. मधुकर आंबोणकर** यांचेसह आपल्या असंख्य सभासदांचे नेहमीच सहकार्य लाभत आलेले आहे. त्यातील प्रामुख्याने काही नावांचा उल्लेख येथे करावासा वाटतो. श्रीम.अलका जोशी, श्रीम. वंदना शिर्के, श्रीम. स्मिता पाटील, श्रीम. रेखा ताम्हाणेकर, श्रीम. आशालता वैद्य, श्रीम. ज्योत्स्ना फडके, श्रीम. सुषमा भागवत, श्री. भास्कर देशपांडे, श्री. घनश्याम दीक्षीत, श्री. सुरेन्द्र भोई, श्री. सदानंद ढापरे, श्री. गुलाब माळी, श्री. रोहिदास थळे, श्री. मिलिंद भागवत, श्री. शिरिष सराफ, श्री. किरण कोल्हटकर, श्री. संजय वारीक, श्री. राजेंद्र चौधरी, श्री. मॅन्यूएल मस्करेन्हास, श्री. प्रभाकर मोहिते, श्री. विवेक गद्रे, श्री. आबासाहेब कोळेकर, श्री. कुलभूषण व्होरा. इ. अनेकांचे सहकार्य नेहमीच लाभत आलेले आहे. सर्वांचाच येथे नामोल्लेख करणे शक्य नाही; याबद्दल क्षमस्व. ठाणे शाखेशी संपर्क साधणे अथवा अन्य कोणत्याही कारणांसाठी या शाखेची संपर्क समिती संपर्कास सदैव तयार आहे. त्यांचे संपर्क क्रमांक व नांवे पुढीलप्रमाणे.

१) श्री. सुहास खामकर ९८२०८४०२५३

२) श्री. मधुकर आंबोणकर ९९६९१६६६८२

३) श्री. सुरेन्द्र भोई ८७७९३८९१३९

४) श्रीम. वंदना शिर्के ७०४५६४९३३५

५) श्रीम. अलका जोशी ९३७२६१३९०८

६) श्रीम. रेखा ताम्हाणेकर ९००४२८१६१०

ठाणे विभागास पुढील वाटचालीसाठी असोसिएशनच्यावतीने हार्दिक शुभेच्छा!

## १२.०४ : बोरिवली विभाग

अहवाल वर्षात बोरीवली विभागात आयोजित केलेल्या उपक्रमांचा थोडक्यात आढावा खालील प्रमाणे.

**ऑनलाइन पद्धतीने हयातीचे दाखले सादर करणे :**

श्री. सुरेश सावंत यांच्या पुढाकारातून एकूण १०५ निवृत्त कर्मचाऱ्यांचे जीवन प्रमाण प्रणालीद्वारे हयातीचे दाखले प्रशासनास सादर करण्यात आलेले आहेत. काही दिव्यांग सभासदांच्या घरी जाऊन त्यांनी त्यांचे हयातीचे दाखले सादर केले. काही सभासदांनी आपले निवासस्थान सदर कामाकरिता वापरण्यास परवानगी दिली होती. त्या सभासदांचे अगदी मनापासून आभार.

**महिला दिन कार्यक्रम :**

दि.०८ मार्च २०२५ हा जागतिक महिला दिन. सदर दिवशी बोरिवली विभागातील ३०-४० महिलांनी हा जागतिक महिला दिन, आर (मध्य) विभागाच्या सभागृहात निरनिराळे कार्यक्रम करून साजरा केला. कार्यक्रमात कविता वाचन, निवृत्त काळातील विविध उपक्रमांतील सहभाग इ. विषयी माहिती दिली. उपस्थित असलेल्या पुरुष सभासदांनी महिला शक्ती किती शक्तिमान असते, याची काही उदाहरणे दिली. अगदी अलीकडील उदाहरण म्हणजे बोरिवली शाखेच्या सांगता समारंभात महिला वर्गाच्या पुढाकाराने **रु.५,००,०००/- (रु.पाच लाख)** एवढा मोठा निधी उभारून तो (SIRF) या संस्थेला देणगीदाखल देण्यात आला.

उपस्थित महिलांनी एकमेकांना फुले, भेटवस्तू, पेढे देऊन महिला दिनाची रंगत वाढविली. शेवटी सर्वांना अल्पोपहार व चहा देवून महिला दिन कार्यक्रमाची सांगता केली.

**सायबर गुन्हे मार्गदर्शनपर कार्यशाळा :**

दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी आर-मध्य विभागातील सभागृहात श्री. प्रथमेश सोनसुरकर (सायबर तज्ञ) यांची सायबर गुन्हे या विषयावरील मार्गदर्शनपर कार्यशाळा संपन्न झाली. घेतली. सदर कार्यशाळेत ६० सभासदांनी भाग घेतला होता. प्रथमतः श्री. सोनसुरकर साहेबांनी सायबर गुन्हे म्हणजे संगणक, नेटवर्क किंवा डिजिटल उपकरणांचा वापर करून केलेले गुन्हे, ज्यामध्ये हॅकिंग, फिशिंग, ओळख, चोरी यांचा समावेश होतो, असे सांगून त्यांनी दृकश्राव्य माध्यम व स्लाईड शो वर सायबर गुन्हे कसे होतात? लोकांची फसवणूक कशी होते? व फसवणूक टाळण्याकरिता ज्येष्ठांनी कोणत्या प्रकारची दक्षता घ्यायला पाहिजे, याचे मार्गदर्शन केले.

उदाहरणार्थ :-

अ) कोणत्याही अनोळखी link वर प्रतिसाद देऊ नये.

ब) अपरिचित फोनला प्रतिसाद देऊ नये.

क) आपल्या महत्त्वाच्या कागदपत्रांची माहिती कोणालाही देऊ नये.

ड) Online मागविलेल्या वस्तूचे पार्सल प्राप्त झाल्यावर त्यावरील आपली माहिती नष्ट करावी किंवा कोणालाही ती कळणार नाही, याची दक्षता घ्यावी, इ.

**सहलीचे आयोजन :**

दिनांक १९ जुलै २०२४ रोजी बोरीवली शाखेची सहल करंजोल, शिरसाट फाटा, वज्रेश्वरी रोड येथील 'रोहिणी कृषी पर्यटन केंद्र' येथे आयोजित करण्यात आली. सदर सहलीमध्ये एकूण ६० सभासदांनी भाग घेतला. सकाळी ७ वाजता सर्व बोरिवलीहून बसने निघाले व १० वाजता पर्यटन स्थळी पोहचले. जाताना

बऱ्याच गायकांनी सर्व प्रकारची गाणी गाऊन वातावरण आनंदी करून टाकले होते. गायकांची संख्या भरपूर असल्याने अगदी शेवटपर्यंत गाणी सुरूच होती. गाणी गाण्यासाठी अहमहमिका लागलेली होती.

**❦ सुवर्ण महोत्सवी वर्ष सांगता समारंभ :**

मान. अध्यक्ष **श्री. कमलाकर क्षीरसागर** व कार्यवाह **डॉ. मारुती नलावडे** यांच्या उपस्थितीत व सुमारे १८० सभासदांच्या साक्षीने दि.०२ मार्च, २०२५ रोजी प्रबोधनकार ठाकरे लघु नाट्यगृह येथे सुवर्ण महोत्सवी वर्ष सांगता समारंभ थाटामाटात संपन्न झाला. (SIRF) च्या संस्थापिका **श्रीम. सुमेधा चिथडे** या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

सुप्रसिद्ध गायिका अर्चना कान्हेरे यांच्या शिष्या **सौ. राईलकर** यांनी ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात केली. बोरिवली शाखेची वाटचाल **श्रीम. अलका वठारकर** यांनी सभागृहापुढे मांडली. **डॉ. मारुती नलावडे,** कार्यवाह यांनी पेन्शनर्स असोसिएशन या संस्थेचा ५० वर्षाचा माहितीपट सादर केला. यानंतर विशेष सत्कार सोहळ्यात सात जणांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष, कार्यवाह व संयुक्त कार्यवाह यांच्या हस्ते करण्यात आला. यात शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व ट्रॉफी देण्यात आल्या. तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अन्य पाच जणांचा सत्कार करण्यात आला. यानंतर अध्यक्ष **श्री. कमलाकर क्षीरसागर** सरांनी अध्यक्षीय भाषणात भूतकाळाचा आढावा व भविष्याचा वेध घेणारे विचार मांडले.

**या समारंभाचे मुख्य आकर्षण ठरले, SIRF संस्थेच्या संस्थापिका श्रीम. सुमेधा चिथडे यांचे सियाचीन प्रकल्पाचे सादरीकरण.** देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या भारतीय सैनिकांची ऑक्सिजनची गरज ओळखून ती सर्वथैव प्रयत्नांतून दूर करणाऱ्या सुमेधा चिथडे यांचे लोकसहभागातून केलेले अमूल्य कार्य म्हणजेच सियाचीन प्रकल्प. त्यांच्या सादरीकरणातून अभिमानीत झालेल्या **श्रीम. गोंधळेकर यांनी रु. १ लाख, व उपस्थित इतर पदाधिकारी व बोरिवली शाखेचे कार्यकर्ते या सर्वांनी मिळून रु.४.६५ लाख एवढा निधी संकलित केला. बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशने बोरिवलीमधील सभासदांना साथ देत स्वनिधीतून भर घालून एकूण रु.५,००,००१/– एवढा निधी राष्ट्रकार्यास अर्पण केला.**

सदर कार्यक्रमात दृकश्राव्य माध्यमाद्वारे (SIRF) Soldiers Independent Rehabilitation Foundation या संस्थेची श्रीम. सुमेधा चिथडे यांनी माहिती दिली. सदर slide show मध्ये सियाचेन सारख्या जगातील उंच युद्ध भूमीवर सैनिक कसे लढतात, तेथे असणारा ऑक्सिजन प्लांट, त्याची देखभाल, लढताना जखमींवर करण्यात येणारे इलाज, अपंगांना करण्यात येणारी मदत इत्यादी माहिती देण्यात आली.

बोरिवली शाखेचा सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ अतिशय अविस्मरणीय पद्धतीने साजरा केला गेला. उपरोक्त सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. सुरेश सावंत, श्री. संजय तोरस्कर, श्री. रमेश राणे, श्री. नागेश सामंत, श्रीम. अनिता गोंधळेकर, श्रीम. आरती राणे, श्रीम. स्मिता पाटील, श्रीम. सरस्वती खाडे, श्रीम. दिशा प्रभू, श्रीम. अरुण धुरी, श्रीम. वठारकर इ. कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतलेले आहेत.

**❦ संपर्क समिती :**

शाखेतील सर्व सभासदांचे प्रश्न सोडविणे, संपर्क करणे, विविध उपक्रमांचे आयोजन यासाठी पुढील पाच जणांच्या संपर्क समितीशी संपर्क साधावा.

१) श्री. सुरेश सावंत ९८६९१८६८१२

२) श्री. रमेश राणे ९०८२७२२८१९

३) श्रीम. अनिता गोंधळेकर ७०४५३५३५०५

४) श्री. संजय तोरस्कर ९९६९४०९८९७

५) श्री. नागेश सामंत ९८६९५३१६९८

## १२.०५ : बदलापूर विभाग

बदलापूर शहर मुंबईपासून दूरवर अंतरावर आहे. या शहराचा विकास झपाटयाने होत आहे. थोड्याच दिवसात हे शहर तिसऱ्या मुंबईमधील प्रमुख शहर म्हणून ओळखले जाणार आहे. या बदलापूर शहरात मुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी मोठया संख्येने स्थायिक होत आहेत. अशा ठिकाणी सेवानिवृत्तांच्या अडी अडचणीचा निपटारा करण्यासाठी कार्यकारिणी सदस्य श्री. विजयकुमार पोतदार यांच्या नेतृत्वाखाली बदलापूर विभागाची यशस्वी वाटचाल सन २०१७ पासून सुरू आहे.

अहवाल वर्षात आयोजित केलेल्या उपक्रमांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

**मार्गदर्शनपर बैठक :**

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन, बदलापूर विभागाच्या वतीने रविवार दि.२८.०८.२०२४ रोजी सकाळी ठीक १० वाजता निवृत्तांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी मान. श्री. कमलाकर क्षीरसागर (अध्यक्ष) यांचे नेतृत्वात एका बैठकीचे आयोजन केले होते. सदर बैठकीत मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुष सभासद उपस्थित होते. सन २०२४ - २०२५ या वर्षात ४७ नवीन सभासदांची नोंदणी झालेली आहे.

**हयातीचे दाखले सादर करणे :**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १५४ सभासदांना जीवन प्रमाण प्रणालीद्वारा ऑनलाईन हयातीचे दाखले (Digital Life Certificate) सादर करण्यासाठी सहाय्य केले. तसेच ऑफ लाईनद्वारे हयातीचे दाखले सादर करण्याकामी प्रमुख लेखापाल खात्यातील अधिकारी सेवावृत्तीने उपस्थित राहिले व त्यांनी काही हयातीच्या दाखल्यांचे साक्षांकन केले.

**सुवर्ण महोत्सवी वर्ष सांगता सोहळा व द्वितीय विभागीय स्नेहसंमेलन :**

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या सांगता समारंभ व विभागीय स्नेहसंमेलनाच्या शृंखलेतील ८ वा कार्यक्रम संजीवनी मंगल कार्यालय, स्टेशन जवळ, बदलापूर (पूर्व) येथे दिनांक १० मार्च, २०२५ रोजी ११० सभासदांच्या उपस्थितीत थाटामाटात संपन्न झाला. विभागातील काही सभासद कलाकारांनी कला, संगीत, इत्यादीचे सुंदरपणे सादरीकरण केले. छत्रपती संभाजी राजे यांचेवरील काव्य, ज्येष्ठांनी कसे वागावे, हे सुचविणारे काव्य तसेच नृत्य किंवा संगीतावर योगाभ्यास असे लक्षवेधी कार्यक्रम सादर केले गेले.

या सांगता समारंभासाठी कर्जत, नेरळ, शेलू, वांगणी, अंबरनाथ, इत्यादी ठिकाणाहून कांही सभासद आवर्जून उपस्थित होते. सदर प्रसंगी मान. **श्री. कमलाकर क्षीरसागर** (अध्यक्ष), **मान. डॉ. मारुती नलावडे** (कार्यवाह) यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या विभागातील सभासदांच्या बैठका, उपक्रम, स्नेहसंमेलन इ. कार्यक्रमांचे आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष, कार्यवाह, खजिनदार व इतर पदाधिकारी यांचे नेहमीच सहकार्य लाभते.

**संपर्क समिती :**

विभागातील सभासदांनी आपल्या समस्यांसाठी खालील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

१) श्री. विजयकुमार पोतदार :- कार्यकारिणी सदस्य - ९७६६५२५२६७

२) श्री. कैलाशनाथ राजपूत :- ८६९८७३१३७६

३) श्री. विश्वनाथ जाधव :- ९४२३२३११३४

४) सौ. सुमित्रा कुलकर्णी :- ९४२२४८०२९९

५) सौ. अपर्णा पेठकर :- ९३२५५७६४७५

बदलापूर विभागाचे संस्थेतर्फे धन्यवाद व पुढील कार्यास शुभेच्छा!

## १२.०६ : गोरेगाव विभाग

नुकतेच एक वर्ष पूर्ण झालेल्या गोरेगाव शाखेची वाटचाल व उल्लेखनीय उपक्रम पुढीलप्रमाणे.

**हेरिटेज वॉक :**

दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी 'हेरिटेज वॉक' हा कार्यक्रम श्री. नवीन म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला. बोरिवली येथील नॅशनल पार्क म्हणजेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यान मधील 'कान्हेरी गुंफा' या निमित्ताने माहितीपूर्णरित्या पहिल्या गेल्या. पावसाळा असल्याने, अविस्मरणीय असा पावसाळी सहलीचा आनंद एकूण २० सभासदांनी घेतला.

**दीपोत्सव :**

डोंबिवली शाखेकडून प्रेरणा घेऊन दीपोत्सवाचा कार्यक्रम मोजक्या सभासदांच्या उपस्थितीत अश्वत्थ मारुती मंदिर, बेस्ट नगर, गोरेगाव येथे साजरा केला. त्यानंतर चहापान व खाऊ वाटप केले.

**कोजागिरी :**

कोजागिरीचा छोटेखानी कार्यक्रम कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी 'प्रबोधन गोरेगाव' येथे आपल्या सभासदांनी सुंदर रीतीने साजरा केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मान. **श्री. कमलाकर क्षीरसागर** आवर्जून उपस्थित राहिले. तसेच ठाणे व शहर शाखेचे श्री. खामकर व श्री. थोरात यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. संस्थेचे सभासद व प्रबोधन गोरेगावचे वरिष्ठ कार्यकर्ते **श्री. गावडे** यांनी संपूर्ण कार्यक्रम चहापानासहित प्रायोजित केला. त्यांचे आभार.

सदर कार्यक्रमाचा अनुभव गोरेगाव शाखेचा सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ कार्यक्रमाची आखणी करताना निश्चित उपयोगी पडला.

**ऑनलाइन दाखले :**

दि.१६.११.२०२४ रोजी ऑनलाइन हयातीचे दाखले सादर करण्याचा उपक्रम दुपारी २ ते ५ या वेळेत आयोजित करण्यात आला होता. एकूण ६५ सभासदांचे हयातीचे दाखले सादर करण्यात आले.

सदर उपक्रमाची व्यवस्था पी / द. विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त **मान. श्री. संजय जाधव,** स. अ. (मेंटेनन्स) श्री. निषाद कुलकर्णी, श्रीम. दळवी मॅडम यांच्या सहकार्याने पी / द. विभागात करण्यात आली होती. यानंतरही दर गुरुवारी दुपारी २ ते ४ या वेळेत ऑनलाईन हयातीचे दाखले देण्याचा उपक्रम मुदत संपेपर्यंत CFC हॉल (पी / दक्षिण कार्यालय) येथे राबविण्यात आला.

**सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ :**

सुवर्ण महोत्सव सांगता समारंभाचे औचित्य साधून गोरेगाव शाखेचे पहिले वार्षिक स्नेहसंमेलन दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी कै. केशव गोरे स्मारक सभागृहात संपन्न झाले. या दिवशी मराठी भाषा दिनही साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमास संस्था अध्यक्ष **मान. श्री. कमलाकर क्षीरसागर,** कार्यवाह **डॉ. मारुती नलावडे,** प्रमुख वक्ते **श्री. अक्षय जोग,** कार्यकारिणीचे ८ पदाधिकारी व १२५ सभासद उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, **श्रीम. राजश्री श्रोत्रिय** यांनी इशस्तवन व **श्री. संजय भातखंडे** यांनी महाराष्ट्र गीत सादर करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला.

तत्पूर्वी दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मान्यवरांचा परिचय व स्वागत झाल्यावर **श्री. विनायक रेगे** यांनी प्रमुख वक्ते **श्री. अक्षय जोग** यांचा परिचय करून दिला. स्वातंत्र्यसूर्य विनायक दामोदर सावरकरांच्या कार्याचा परिचय श्री. अक्षय जोग यांनी करून दिला व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

त्यानंतर **डॉ. मारुती नलावडे**, कार्यवाह यांनी मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठीची गोडवी, तिचा सुरू असलेला ऱ्हास, ती टिकवण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, इ. विषयी प्रभावी विवेचन केले. अध्यक्ष **श्री. कमलाकर क्षीरसागर** यांनी त्यांच्या भाषणात संस्था कार्यावर प्रकाश टाकला. संस्थेची उद्दिष्टे, गतिमान कारभार, भविष्यकालीन उपाय, इ. वर मोलाचे मार्गदर्शन केले.

यानंतर सुमधुर मराठी गाण्यांचे सादरीकरण झाले. त्यात अनेक सभासद सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे शाखेने वर्षभर राबविलेल्या उपक्रमांच्या फोटोंचे भरवलेले प्रदर्शन व भारतनगर व्होकेशनल शाळेच्या मुलांनी व विशेष शिक्षक श्री. मुकेश देशमाने यांनी मांडलेले लाकडी वस्तूचे प्रदर्शन व सादर केलेली प्रात्यक्षिके होत.

सांगता समारंभ तसेच वर्षभरातील उपक्रम यशस्वी करण्याची जबाबदारी श्रीम. नीता मांजरेकर, श्रीम. नीलिमा जवंजाळ, श्रीम. ललिता भट, श्रीम. स्वरदा दाते, श्रीम. देविका सरमळकर, श्री. संजय मोरे, श्री. विनायक रेगे, श्री. श्रीराम जोशी, श्री. अजित कदम, श्री. आनंद पुरंदरे, श्रीम. छाया सातारकर, श्रीम. अदिती इस्वलकर, श्री. बळीराम कदम, श्री.ज्ञानेश्वर कदम, श्री. जगदाळे यांनी पार पाडली.

**संपर्क समिती** :

विभागातील सभासदांच्या समस्या निवारण, उपक्रमांचे आयोजन, इ. साठी कृपया पुढील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

१) श्रीम. नीता मांजरेकर ९६५३३२८७५६

२) श्री. विनायक रेगे ९८६९०६१५७२

३) श्री. श्रीराम जोशी ८१०८०७८३७८

४) श्रीम. नीलिमा जवंजाळ ९८९२८३४५२०

५) श्रीम. स्वरदा दाते ९८२११९३५२०

गोरेगाव विभागाचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा!

## १२.०७ : शहर विभाग

बृहन्मुंबई मनपाचे निवत्तीवृवेतनधारक बृहन्मुंबईतील तसेच आजबाजूच्या सर्व शहरांमध्ये अगदी पुणे, कोंकण विभागात वास्तव्यास आहेत. या सर्व निवृत्त वेतनधारकांच्या निरनिराळ्या एकूण ११ शाखा कार्यरत आहेत परंतु मुंबई शहर विभागासाठी स्वतंत्र शाखा कार्यरत नव्हती, ही बाब शहर विभागातील कांही प्रतिनिधींना खटकली व त्यांनी शहर शाखा सुरू करण्याचं शिवधनुष्य उचललं आणि अहवाल वर्षात शाखा सुरूही झाली.

वर्षभरातील ठळक घटनांचा आढावा पुढीलप्रमाणे.

**शाखारंभ :**

मुंबई शहरात वास्तव्य करणाऱ्या पेन्शनर्ससाठी अनेक उपक्रम पुन्हा पुन्हा राबवले जावेत, यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनने, संस्थेचे निमंत्रक सदस्य श्री. शरद कुवेसकर, श्री. सुधीर शिशुपाल, श्री. सतीश आवटे, श्रीम. अनुजा आचरेकर, श्री. नामदेव थोरात, श्री. महादेव सोहोनी व श्रीम. प्रतिमा पवार यांच्या कार्यावर विश्वास ठेवनू दिनांक १५ ऑगस्ट, २०२४ रोजी मुंबई शहर विभाग या ११व्या शाखेच्या स्थापनेची घोषणा केली व ती प्रत्यक्ष सुरूही करण्यात आली. मुंबई शहर विभागातील सर्व पेन्शन धारकांच्या सेवेसाठी ही शहर शाखा आता जोमाने सुरू झालेली आहे.

**❧ प्रथम सभा :**

मुंबई शहर विभागाची प्रथम सभा सर्वांच्या सहकार्याने दिनांक २४ ऑगस्ट २०२४ रोजी केईएम हॉस्पिटल इमारतीतील सभागृहात संपन्न झाली. सुमारे २०० निवृत्ती वेतन धारकांच्या उपस्थितीत मुंबई शहर विभाग या शाखेची अधिकृत घोषणा आपल्या संस्थेचे **अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर व कार्यवाह डॉ. मारुती नलावडे** यांनी सभेमध्ये केली. सर्वांना पेढे वाटून आनंद व्यक्त केला. सदर सभागृहात अध्यक्ष व कार्यवाह यांनी आपल्या सेवानिवृत्त पेन्शन धारकांसाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक उपक्रम राबवून त्यांना लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन मुंबई शहर विभागास केले होते. त्यानुसार मुंबई शहर विभाग अनेक क्रियाशील उपक्रम राबविण्यासाठी तत्पर झाला आहे.

**❧ सीनियर सिटीजन डे** :

प्रथमतः मुंबई शहर विभागाच्या वतीने दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय सीनियर सिटीजन डे निमित्ताने वय वर्षे ८० वरील ज्येष्ठ सेवानिवृत्त धारकांच्या (साधारण २८-३० जणांच्या) घरी जाऊन, त्यांचा विभागाच्या वतीने गुलाबाचा पुष्पगुच्छ व श्री सिद्धिविनायक देवतेचा श्री प्रसाद देऊन यथोचित सत्कार केला. हा सत्कार पाहून सर्व सत्कारार्थींनी मुंबई शहर विभागाला व संस्थेला मनमोकळेपणाने शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

**❧ लाखोंची थकबाकी मिळवून देण्यात यश :**

मुंबई अग्निशमन दल सेवेतून सेवानिवृत्त झालेले **श्री. नाना गणपत सावंत**, वय वर्षे १०१, निवृत्ती वेतनधारक यांना पेन्शन कमी मिळत असल्याची तक्रार त्यांच्या नातवाकडून मुंबई शहर विभागास मिळाली. सदर तक्रारीचे निवारण संस्थेचेअध्यक्ष **मान. श्री. कमलाकर क्षीरसागर** यांच्या मार्गदर्शनाखाली केले गेले. वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करून त्यांना वाढीव पेन्शन थकबाकीसह मिळवून दिली. श्री. सावंत यांना रूपये ३ लाख पर्यंत इतकी थकबाकीची रक्कम मिळाली व निवृत्तीवेतन रु. ११,५००/- वरुन रु. २२५००/- इतके सुरू झाले. मुख्य म्हणजे **वय वर्षे १०० वर्षे पूर्ण झाल्यावर नियमानुसार १०० टक्के वाढ मिळाली, याचे हे अत्यंत दुर्मिळ व एकमेव उदाहरण आहे.** हा एक मैलाचा दगड ठरला आहे.

सदर वाढलेली पेन्शन आणि थकबाकीची रक्कम मिळणार आहे, ही बातमी श्री. सावंत यांच्या नातवाला दिली. नातवाने सुद्धा ही आनंदाची बातमी आपण स्वतःहून दिल्यास त्यांना अधिक अत्यानंद होईल असे सांगितले. दिवाळीच्या सुमारास त्यामुळे ही आनंदाची बातमी देण्यासाठी स्वतः **मान. श्री. क्षीरसागर, डॉ. नलावडे, श्री. दिलीप करंदीकर, श्री. फडके, श्री. कुवेसकर**, इत्यादी प्रतिनिधी त्यांच्या माणगाव, रायगड जिल्हा येथील निवासस्थानी गेले आणि श्री. सावंत यांना आनंदाची बातमी दिली. खऱ्या अर्थाने त्यांना मिळालेली ही दिवाळी भेटच म्हणावी लागेल. हे एक अत्यंत दुर्मिळ उदाहरण मनपाच्या आजपर्यंतच्या इतिहासातील नोंद घेण्यासारखे आहे. संस्थेला मात्र श्री. सावंत यांच्या हयातीमध्येच त्यांना आनंद दिल्याचे समाधान मिळाले.

**❧ समस्या निवारणार्थ विशेष अदालतीचे आयोजन :**

अग्निशमन दल सेवानिवृत्त कर्मचारी, अधिकारी यांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभ वेळेच्या वेळी मिळत नसल्याबाबत अनेक तक्रारी मुंबई शहर विभागास प्राप्त झाल्यानंतर, संस्थेच्या मार्गदर्शनाने मान. प्रमुख अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल यांच्या मुख्य कार्यालयात पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी एक संयुक्त बैठक घेऊन साधारण १०५ कर्मचाऱ्यांच्या तक्रारी दिल्या. त्या मार्गी लावण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन **श्री. आंबुलगेकर,** मुंअद खाते प्रमुख यांनी पेन्शनर्स असोसिएशन यांना दिले. या अदालत कार्यात

श्री. शरद कुवेसकर यांनी तक्रारदारांच्या समस्या प्रशासनासमोर प्रभावीपणे मांडल्या. या कार्यास त्यांना श्रीम. नीता मांजरेकर, श्रीम. अनुजा आचरेकर, श्रीम. स्वरदा दाते यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले.

**सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ :**

दि.२२ मार्च २०२५ रोजी सर्व सभासदांच्या सहकार्याने संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ आणि मुंबई शहर विभागाचे पहिले स्नेहसंमेलन अण्णाभाऊ साठे सभागृह, राणी बाग, भायखळा येथे संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी आदरणीय **डॉ. प्रभात एस. रहांगदळे** सेवानिवृत्त उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन / सुरक्षा) बृहन्मुंबई महानगरपालिका व संचालक - महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा व मुख्य अग्निशमन अधिकारी - मुंबई अग्निशमन दल, तसेच आदरणीय **श्री. सुनील धामणे**, सेवानिवृत्त सह आयक्तु - बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच आदरणीय **डॉ. अर्जुन आहुजा**, सेवानिवृत्त प्रोफेसर नेत्ररोग तज्ञ व नेत्ररोग खातेप्रमुख - केईएम रूग्णालय तसेच आदरणीय **डॉ. मारुती नलावडे**, कार्यवाह, बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन तसेच आदरणीय **श्री. कमलाकर क्षीरसागर** अध्यक्ष, बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन व उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स असो. यांचे प्रभावी मार्गदर्शन लाभले.

सदर कार्यक्रमास साधारण ३०० ते ३५० सेवानिवृत्त पेन्शनधारक आवर्जून उपस्थित होते. प्रामुख्याने सर्वश्री राजा पवार - निवृत्त प्रमुख लेखापाल, सी. जी. कुलकर्णी - निवृत्त दक्षता अधिकारी, अशोक सकपाळ, निवृत्त उपलेखा परिक्षक, श्रीम. एम.व्ही.कुलकर्णी, निवृत्त प्रमुख अधिकारी (चौकशी), श्रीम. राणे-निवृत्त चौकशी अधिकारी, श्रीम. निता जाधव निवृत्त सह कर्मचारी अधिकारी इत्यादी मनपाच्या विविध खात्यातून निवृत्त झालेले अनेक वरिष्ठ अधिकारी आवर्जून उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आदरणीय **श्री. समीर लिमये** यांचे **'सद्यस्थितीत मनाच्या श्लोकाची गरज'** या विषयावरचे व्याख्यान, हास्यप्रबोधनकार **श्री. योगेश जोशी** यांचे **'हासू आणि आसू'** हा हसता हसता

अंतर्मुख व मंत्रमुग्ध करणारा एकपात्री हास्य कार्यक्रम आणि बाल शाहीर कु. रुद्राक्ष सावंत या ७ वर्षीय मुलाचा पोवाडा इ. प्रमुख आकर्षण होते. या संमेलनामुळे कार्यक्रमाची ऊंची वाढल्याचा अभिमान वाटतो.

**संपर्क समिती :**

मुंबई शहर विभागाने दिनांक १५ ऑगस्ट, २०२४ रोजी स्थापना झाल्यापासनू अत्यंत अनमोल असे कार्य अल्पावधीत करण्याचा प्रयत्न केला आहे. विभागातील निवृत्तांच्या समस्या व इतर मार्गदर्शनासाठी कृपया पुढील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

१) श्री. सतिश आवटे ९८६७७२०३२५

२) श्री. शरद कुवेसकर ९८६९४६४५४४

३) श्रीम. अनुजा आचरेकर ९८३३१९२८२१

४) श्री. नामदेव थोरात ९३२२२३८७२०

५) श्री. सुधीर शिशुपाल ९८९२१९०८०५

शहर विभागाचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील उपक्रमास शुभेच्छा!

## १२.०८ : पुणे विभाग

संस्थेची ही शाखाही तशी नवीनच आहे. मुंबई पुणे अंतराची पर्वा न करता दादर येथील केंद्रीय कार्यालयाशी सतत संपर्क व सुसंवाद साधून या शाखेने अहवाल वर्षात मोजकेच परंतु नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित केले. ते पुढीलप्रमाणे.

**सभासद समस्या निवारण :**

पुण्यातील सभासदांशी संपर्क करणे, त्यांच्या समस्यांचा पाठपुरावा दादरमधील संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमार्फत करणे, महिला दिन किंवा इतर कार्यक्रमाचे आयोजन करणे, इ. विषयीची चुणूक शाखेने दाखवलेली आहे.

**ऑनलाइन हयातीचे दाखले :**

पुणे विभागातील कार्यकर्त्यांनी ऑनलाइन जीवनप्रमाणपत्र महापालिकेला सादर करण्यासाठी अनेक निवृत्तांना सहाय्य केले. वेळप्रसंगी वृद्ध सभासदांच्या घरी जाऊनही जीवन प्रमाणपत्र सादरीकरणाची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

**सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ :**

दिनांक २५.०२.२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या पुणे विभागाचा सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ, कोथरूड येथील उत्सव कार्यालयात अत्यंत नियोजनपूर्ण, आनंदी वातावरणात आणि उत्साहात साजरा झाला. या समारंभाची जबाबदारी श्री. काशीनाथ मणेरीकर, श्री. नितीन पोटभरे, श्री. अनिल पारखे, श्री. रामचंद्र ओक, श्री. उदय देशपांडे, श्री. शरद कुलकर्णी, श्री. करवीर, श्रीम. बहुतुले, श्रीम. गोरे आणि इतर महिला प्रतिनिधी यांनी चोखपणे पार पाडली.

सुंदर रांगोळीने कार्यक्रमाची रंगीत सुरुवात झाली. सनईचे सूर कार्यक्रमाचे मांगल्य आणि पावित्र्य वाढवत होते. सर्व पेन्शनर्स मित्र मैत्रिणींना एकमेकांना भेटण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची, मनमुराद गप्पा मारण्याची अहमहमिका लागलेली होती. नाश्त्याचा आणि चहाचा आस्वाद घेत असताना सगळे आनंदले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत ज्ञात-अज्ञात म.न.पा. कर्मचारी यांना श्रद्धांजली वाहून झाली. त्यानंतर **डॉ. सलील लाटे** यांचा '**सुकूनभरे नगमे**' हा कार्यक्रम झाला. जुन्या गाण्यांनी कार्यक्रमाची रंगत आणखीच वाढवली. वाद्यवृंदांचा पसारा नाही, ढणढणाट नाही, शांत सूर, त्यामुळे उपस्थितांना कार्यक्रम खूपच भावला. सोनाटा कन्सर्ट या उपक्रमात किबोर्ड स्वरूप वाद्याचा केलेला वापर लक्षणीय होता.

**श्रीम. नीला सहस्त्रबुद्धे** यांनी, जोपासलेले विविध छंद VDO क्लिपद्वारे दाखवले तसेच त्याची प्रत्यक्ष मांडणी केली होती. या वयातील त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता.

श्री. करवीर सरांनी हंपी आणि खजुराहोच्या देवळांचे, प्रत्यक्ष काढलेले फोटो आणि केलेले वर्णनात्मक सादरीकरण यांनी प्रेक्षक भारावून गेले.

त्यानंतर स्थानिक गायकांनी त्यांच्या गायन कलेची झलक दाखवली. मनीषा मेंहदळे यांचे ईशस्तवन, श्रीम. माधवी गोडबोले यांचे स्वागत गीत, श्रीम. अनुराधा गोखले यांचे भजन, श्री. अविनाश पंडित, श्री. रविंद्र मोरबे, श्रीम. मनिषा जोग, श्रीम. अंजली गोरे, श्रीम. चिपळूणकर, श्रीम. प्रतिभा गोखले यांचा गाण्यांचा कार्यक्रम चढत्या क्रमाने रंगत गेला.

संस्थाध्यक्ष **मान. श्री. क्षीरसागर** यांनी संस्था कार्याची माहिती तसेच पुढील उपक्रम याविषयी प्रभावी विवेचन केले. प्रमुख अतिथी **मान. श्री. करमळकर**, माजी उपकुलगुरू, सावित्रीबई फुले विद्यापीठ, पुणे यांनी सध्याच्या शिक्षण पद्धतीत बदल कसा आवश्यक आहे, निवृत्त मंडळींनी जमेल तेव्हा जमेल तसे मुलांच्यावर संस्कार करणे कसे आवश्यक आहे, इ. विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. मान. श्री.क्षीरसागर, अध्यक्ष यांनी सद्य घडामोडींचा आढावा, घेऊन उपस्थितांना काही सूचना केल्या. कार्यक्रमाच्या आयोजनाचे कौतुक केले.

या कार्यक्रमासाठी **डॉ. नलावडे,** कार्यवाह, संयुक्त कार्यवाह **श्रीम. पवार** तसेच वेगवेगळ्या विभागांचे प्रतिनिधी १) श्रीम. रेखा ताम्हाणेकर, २) श्रीम. नीता मांजरेकर ३) श्रीम. अनुजा आचरेकर ४) श्री. नामदेव थोरात ५) श्री. सतीश आवटे ६) श्री. सुधीर शिशूपाल, हे सगळेजण आवर्जून मुंबईहून आले होते.

सदर प्रसंगी **श्रीम. कुसुम कामत,** माजी शिक्षणाधिकारी त्यांच्या ''फुले बकुळीची'' या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. त्या प्रत्यक्ष हजर होत्या. मनपा शिक्षण विभागात त्यांनी केलेल्या भरीव योगदानाचा उल्लेख **डॉ. नलावडे** यांनी त्यांचा परिचय करताना आवर्जून केला. विशेष बाब म्हणजे सदर प्रसंगी त्यांनी संस्थेला **रु.२०,०००/–** ची देणगीही दिली. त्यांचा तसेच नव्वद वर्षांचे **श्रीयुत वैशंपायन, श्री. शैलेश भागवत** यांचाही सन्मान करण्यात आला. श्री. शैलेशजी भागवत यांच्या सुविध पत्नी सौ.ललिता भागवत या संस्थेच्या सभासद असून **श्री. शैलेशजी जगभरातील नामवंत शहनाई वादक असून उस्ताद बिस्मील्लाखान यांचे, या संगीतक्षेत्रातील वारसदार आहेत.**

कार्यक्रमानंतर श्री. डिंगणकरांच्या खास सुग्रास जेवणाचा सगळ्यांनी आस्वाद घेतला. मागच्या सुखद आठवणींचा पट उलगडत, मित्र मैत्रिणींच्या गप्पा, जिव्हाळ्याचे विषय बोलत सगळे पुन्हा लवकर भेटूया, असे ठरवूनच निघाले. एक चांगला सोहळा सर्वांच्या दीर्घकाळ लक्षात राहील असे म्हणावेसे वाटते.

**संपर्क समिती :**

१) श्री. मणेरीकर ८१०८५१४५१४

२) श्री. सुधीर सावदेकर ९८१९७५४४६६

३) श्रीम. सुरेखा बहुतुले ९८६९१०८५५५

४) श्रीम. अंजली गोरे ९३७०३३०८२८

५) श्री. शरद कुलकर्णी ९८२०५६६००८

पुणे विभागाचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा!

## १२.०९ : वसई विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या वसई विभागाने आयोजित केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचा आढावा पुढीलप्रमाणे.

**मासिक सभा :**

एकूण १५ मासिक सभांमधून दिवंगतांना श्रद्धांजली, इतिवृत्त वाचन, मुख्य कार्यालय दादर येथील सभेचा वृत्तांत, मागील महिन्याचा जमाखर्च इ. गोष्टींचे सादरीकरण केले गेले. पेन्शनर्सच्या अडचणींवर चर्चा करून पुढील कामकाजाचे नियोजनही केले. संबंधितांचे वाढदिवस साजरे करून त्यांना शुभेच्छा दिल्या. चहापाणी व आभार प्रदर्शनाने मासिक सभा संपन्न झाल्या.

**हयातीचा दाखला :**

निवृत्तांचा जिव्हाळ्याचा विषय म्हणजे हयातीचा दाखला भरून पाठविणे. ज्येष्ठांचा हा त्रास वाचविण्यासाठीच वसई विभागातील कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन हयातीचे ऑनलाईन दाखले भरण्यासाठी निवृत्तांना प्रोत्साहित केले. वसई, विरार, नालासोपारा, आगाशी परिसरामधून १६ केंद्रांवर एकूण ७२९ सभासदांचे ऑनलाईन दाखले सादर केले गेले. सदर कामी श्री. ललित पाटील यांनी संगणकीय कामाची मोलाची मदत केली. हे काम यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकारिणी सदस्यांना, बैठक व्यवस्था, विजेची सोय आणि इतर मदत करणाऱ्या संस्था व तेथील कार्यकर्त्यांना धन्यवाद.

**❧ विरार परिसरातील निवृत्तांची सभा :**

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन वसई विभागाने, विरार येथे १ डिसेंबर २०२४ या दिवशी निवृत्तांची सभा आयोजित केली होती. सभेला १४० सभासद उपस्थित होते. विरार ते पालघर येथील सभासदांना मातृसंस्था बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या कार्याची ओळख व्हावी, त्यांच्या मनातील शंकांचे निरसन व्हावे, संस्थेचा विस्तार व्हावा, हे या सभेचे प्रमुख उद्देश होते. संस्थाध्यक्ष **मान. श्री. क्षीरसागर**, संस्था कार्यवाह **डॉ. नलावडे**, संयुक्त कार्यवाह **श्रीम. प्रतिमा पवार** यांनी सदर सभेत मोलाचे मार्गदर्शन करून उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले.

**❧ वार्षिक शिबीर :**

वसई विभागाने जुलै २०२४ मध्ये विरार येथील राजहंस रिसॉर्टमध्ये एक शिबीर आयोजित केले होते. यावेळी अनाथ आश्रमाला भेट, मासिक सभा आयोजन, विविध खेळ, चहापान, स्विमिंग, सुग्रास भोजन अशा रंगतदार कार्यक्रमांमधून सर्वांनी मनमुराद आनंद घेतला.

**❧ सुवर्ण महोत्सवी सांगता सोहळा एकात्मता दिन व स्नेहसंमेलन :**

शनिवार दि. २९ मार्च २०२५ रोजी सकाळी ९:०० ते २:०० वाजेपर्यंत भरलेल्या सभागृहात सुमारे ४०० सभासदांच्या उपस्थितीत ज्येष्ठ नागरिक केंद्र, गिरीज (वसई) येथे हा सोहळा अगदी थाटामाटात साजरा करण्यात आला. बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचे सन्माननीय अध्यक्ष मान. **श्री. कमलाकर क्षीरसागर**, कार्यवाह सन्मा. **डॉ. मारुती नलावडे** यांच्या अनमोल मार्गदर्शनाचा लाभ घेऊन सुवर्णमहोत्सवी सांगता समारंभाचा कळस वसईकरांना गाठता आला.

प्रास्ताविकामध्ये व्यासपीठावर श्री.अनंत पाटील (वसई अध्यक्ष) यांनी वसई आणि मुंबईचे नाते, आई आणि मुलासारखे कसे आहे, हे अनेक उदाहरणे देऊन कथन केले.

वसई कार्यकारिणीच्या तेराव्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते झाले. तदनंतर गुणवंतांचे सत्कार केले. मान. अध्यक्ष व महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष **श्री. कमलाकर क्षीरसागर**, संयुक्त कार्यवाह व महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनच्या स्वीकृत सदस्या **श्रीम. प्रतिमा पवार**, कार्यवाह **डॉ. मारुती नलावडे** यांचे तसेच उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणवंतांचे सत्कार करण्यात आले.

देहदान चळवळीचे पुरस्कर्ते श्री. पुरुषोत्तम पाटील, साहित्यिक श्री. सुधाकर ठाकूर, पर्यावरण प्रेमी श्रीम. कीर्ती रावल गावकर-शेंडे, आरोग्य सेविका श्रीम. सुजाता तुस्कानो, सेवक श्री. सुधीर महाडिक, संगीत क्षेत्रात डॉक्टरेट पदवी संपादन केलेल्या डॉ. संपदा पोतदार, युवक आयुष वर्तक, आयुष म्हात्रे, स्टार प्रवाह वाहिनीवरील संगीत गायिका लॅरेसा, आठ वर्षीय जलतरणपटू, महापौर व राज्य पुरस्कार प्राप्त निवृत्त मुख्याध्यापिका व समाजसेविका श्रीम. हेमलता राऊत या १४ गुणवंतांचा संमेलनाध्यक्ष श्री. क्षीरसागर साहेब यांच्या शुभहस्ते गौरव करण्यात आला.

७५ वर्ष पूर्ण केलेल्या अमृतमहोत्सवी ३१ सत्कारमूर्तींचे सत्कार व्यासपीठावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना सन्माननीय पुरुषोत्तम पाटील, करोना योद्धा यांनी देहदान चळवळीची थोडक्यात माहिती सांगून -

**देते रहे देते रहे**
**जिंदगी के साथ भी**
**जिंदगी के बाद भी**

हा देहदानाविषयी अनमोल मंत्रही दिला.

वसई कार्यकारिणी सदस्य श्रीम. हेमलता राऊत यांनी ७५ वर्षे पूर्ण केलेल्या सत्कारमूर्तींच्या वतीने सत्काराला उत्तर दिले.

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचे संयुक्त कार्यवाह श्री. शिवराम अतकरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तदनंतर संमेलनाचे अतिथी सन्मा. **डॉ. मारुती नलावडे** कार्यवाह यांनी आपल्या भाषणातून वसई कार्यकारिणीने सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभावर खरोखरच कळस चढविला, असे सांगून वसईकरांचे कौतुक केले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये सन्मा. **श्री. कमलाकर क्षीरसागर** यांनी **'सर्वथैव सक्षमता'** या विचाराने पेन्शनर्सना असोसिएशन कशी साह्य करीत आहे, ते पटवून सांगितले.

सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात 'जीवन' या थीमवर गाणी म्हणून झाली. सोमवंशी क्षत्रिय वाडवळ समाज, शेषवंशी क्षत्रिय भंडारी समाज व ख्रिस्ती समाजातील लग्नप्रसंगाची झलक आपल्या बोलीभाषेतून सादर केली. ख्रिस्ती समाजातील लग्नाच्या वेळेच्या बँड पथकाच्या तालावर सर्व सभागृहांने ठेका धरला. त्यामुळे सभागृहातील वातावरण उल्हासित झाले होते. संपूर्ण सांगता समारंभ सोहळ्याचे श्रीम. हेमलता राऊत यांनी उत्कृष्ट निवेदन केले.

वर्षभरातील उपरोक्त सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. काशीनाथ पाटील, श्रीम. विजया खानोलकर, श्रीम. हेमलता हटकर, श्रीम. मेबल घोन्सालवीस, श्री. वसंत नाईक, श्रीम. हेमलता राऊत, श्रीम. आंजेलिन नुनीस, श्रीम. नंदिनी राऊत, डॉ. संपदा पोतदार, श्री. अनंत पाटील, श्री. प्रकाश सातवे, श्री. भारत वर्तक, श्रीम. सिल्विया मचाडो, श्रीम. वेरोणिका रिबोलो, इ. सर्व कार्यकर्त्यांनी अतिशय मेहनत घेतली आहे. त्या सर्वांचे आभार.

**संपर्क समिती :**

विभागातील सभासदांच्या समस्या निवारण व इतर कार्यक्रमांसाठी खालील प्रतिनिधींशी कृपया संपर्क साधावा.

१) श्रीम. हेमलता हटकर ९१३७०६१८०३
२) श्री. काशीनाथ पाटील ९८२३४२४९६९
३) श्री. जॉन गोन्सालवीस ९३२२७५८८०४
४) श्रीम. मेबल घोन्सालवीस ९८१९७१०४८३
५) श्रीम.विजया खानोलकर ७७१९८४८९७९
६) श्रीम. आंजेलिन नुनीस ९७३०४४५७९६
७) श्री. अनंत पाटील ९८९२३४६५६२
८) श्रीम.कोन्सेसाव डिमेलो ८००७३५४६४०

वसई विभागाचे संस्थेतर्फे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील नवनवीन उपक्रमांसाठी हार्दिक शुभेच्छा!

## १२.१० : डोंबिवली विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचा डोंबिवली विभाग हा निवृत्तांविषयीचे विविध उपक्रम/कार्यक्रम यांचे सुनियोजितपणे सादरीकरण करण्यात वाकबगार आहे. त्यामुळे डोंबिवली विभागाचा सेवानिवृत्तांशी मोठा जनसंपर्क आहे.

विभागाने वर्षभरात राबविलेल्या ठळक उपक्रमांचा आढावा पुढीलप्रमाणे.

**❦ आयकर या विषयावरील उद्‌बोधन :**

प्रासंगिक कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दि.२४ जून २०२४ रोजी, आयकरासंबंधी विशेष माहिती देणारा एक कार्यक्रम सादर करण्यात आला. सनदी लेखापरिक्षक **श्री. मिलिंद देशमुख** यांनी याविषयी एक सुरेख विवेचन केले. नियमित रिटर्न भरणे कसे गरजेचे आहे, तसेच त्या अनुषंगाने इतर आवश्यक माहिती सोप्या स्वरुपात देण्यात आली. सदर कार्यक्रमात सुमारे १०० + निवृत्त सभासदांनी उपस्थिती नोंदविली.

**❦ एक कलाकार एक संध्याकाळ :**

सप्टेंबर २०२४ मध्ये सभासदांपैकी एक कलाकार **श्री. भट** यांनी **'एक कलाकार एक संध्याकाळ'** या शीर्षकाखाली अप्रतिम गाणी सादर करून उपस्थितांचे मनोरंजन केले. सदर कार्यक्रम संस्थेचे नियमित कार्यालय असलेले कानविंदे क्रीडाभवन, पेंडसेनगर डोंबिवली (पूर्व) या वास्तूत संपन्न झाला.

**❦ दीपोत्सव :**

दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी दिवाळीनिमित्त संध्याकाळी कानविंदे क्रीडाभवन पेंडसेनगर, डोंबिवली (पूर्व) येथील कार्यालयामध्ये दीपोत्सवाचा एक नयनरम्य कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमात १५० सभासदांनी भाग घेतला आणि १५० दिव्यांनी सभागृह उजळून निघाले. नाट्य संगीतांमधील विविध रागांवर आधारित गाण्यांचा एक सुश्राव्य कार्यक्रम सभासदांनी सादर केला. सदर कार्यक्रमात **श्रीम. अनुजा रानडे, श्रीम. अनघा जोशी, श्री. सदानंद घैसास व श्री. दिलीप करंदीकर** यांनी गाणी सादर केली. सभासदांनी त्यास खूप छान प्रतिसाद दिला.

**❦ हयातीचे दाखले :**

प्रतिवर्षीपणे दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी क्रीडा भवन, पेंडसेनगर डोंबिवली येथे निवृत्ती वेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारक असे मिळून एकूण ५२५ सभासदांचे हयातीचे दाखले डिजिटल पद्धतीने (जीवनप्रमाणद्वारा/Face Recognition System) सादर करण्यात आले. विशेष म्हणजे या वर्षीही एकाही सेवानिवृत्ताचे निवृत्ती वेतन रोखले गेले नाही.

**❦ सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ व स्नेहसंमेलन :**

दि. १८ जानेवारी २०२५ रोजी डोंबिवली विभागाचे स्नेहसंमेलन व बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ सोहळा, सुयोग मंगल कार्यालय, डोंबिवली (पूर्व) येथे थाटामाटात संपन्न झाला.

सदर सोहळ्यामध्ये रामदासाचे विनोद या विषयावर कार्पोरेट कीर्तनकार **श्री. समीरजी लिमये** यांनी श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या दासबोधातील श्लोकांचे दृकश्राव्य पद्धतीने सुयोग्य विवेचन केले व त्यास उपस्थित ३०० सभासदांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

त्यानंतर निमंत्रित मान्यवर आणि जुन्या जाणत्या सभासदांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचे कार्यवाह **डॉ. मारुती नलावडे** यांनी संस्थेच्या कार्याचा थोडक्यात पण महत्त्वपूर्ण शब्दांत आढावा घेतला.

विशेष अतिथी **श्रीम. अनुराधा मोहिदेकर** यांनी सुविहीत जीवनप्रणाली या संकल्पनेच्या अनुषंगाने बहुमोल मार्गदर्शन केले.

नंतर उपस्थित कलाकार सभासदांनी हिंदी/मराठी गाणी कराओके पद्धतीने गाऊन प्रेक्षकांचे मनोरंजन केले व त्यांची वाहव्वा मिळविली.

स्थानिक कलाकारांच्या कलाकृतीचे विशेष उल्लेखनीय प्रदर्शन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

शेवटी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेऊन उपस्थितांनी संयोजकांचे आभार मानले व आनंदाने, तृप्त

मनाने धन्य पावले. संपूर्ण कार्यक्रम हा संस्थेचे अध्यक्ष **श्री. कमलाकर क्षीरसागर** यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

**महिला दिन :**

दि.१५ मार्च, २०२५ रोजी संस्थेच्या डोंबिवली विभागाने महिला दिनाच्या औचित्याने कानविंदे क्रीडा भवन, पेंडसे नगर, डोंबिवली (पूर्व) येथे आयोजित केलेला कार्यक्रम यशस्वी करण्यात आला. या कार्यक्रमाचे आकर्षण होते ते, **'मी, ती आणि स्त्री'**, याविषयी प्रसिद्ध नाटककार प्रवचनकार **श्रीम. प्राचीताई गडकरी** यांचे अविस्मरणीय व्याख्यान. वेदपुराणकालीन स्त्री आणि आजची स्त्री, दुसऱ्या स्त्री मागे खंबीरपणे उभी राहिली तर, तोच खरा महिला दिन, हे उदाहरणासहित पटवून दिले.

उपस्थित महिला सभासदांनी विविध प्रकारच्या कलांचा जणू संगमच घडवून आणला. गायन, नाट्यछटा व कवितांनी बहार आणली. संपूर्ण कार्यक्रमात ६६/७० महिला सभासदांनी भाग घेतला. अनेक दिवसानंतरच्या झालेल्या गाठीभेटी सुरेल मैफिलींच्या भरगच्च आठवणी गोळा करून सर्व महिला सभासद तृप्त मनाने परत गेल्या. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन हे श्रीम. चक्रदेव, श्रीम. अनुजा रानडे, श्रीम. स्वाती नेरूरकर इत्यादी सभासदांनी केले.

एकूण वर्षभरामध्ये झालेल्या समारंभास/उपक्रमात लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हेच उत्तम कार्याची फलश्रुती.

**साप्ताहिक बैठक :**

दर महिन्याच्या शनिवारी सायं ५:१५ ते ६:३० या वेळात क्रीडा भवन, पेंडसेनगर, डोंबिवली (पूर्व) या सभागृहात साप्ताहिक बैठकीचे आयोजन केले गेले. या बैठकीत सेवानिवृत्तांना समस्या निर्मूलनासाठी मार्गदर्शन केले जाते, पुढील उपक्रमांचे नियोजन केले जाते.

डोंबिवली सेवा निवृत्तांनी संघटना तर्फे दि.१७.१२.२०२४ रोजी आदित्य मंगल कार्यालय येथे पेन्शनर्स डे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला **डॉ. कैलास दातरंगे** प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात, आपल्या संस्थेच्या डोंबिवली शाखेच्या वतीने अध्यक्ष **श्री. कमलाकर क्षीरसागर** यांनी संस्था, संस्थाकार्य याबाबत माहिती दिली व आपल्या भाषणाने सभेला मंत्रमुग्ध केले.

संस्थेचे अध्यक्ष मान. कमलाकर क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री. दिलीप करंदीकर, श्री. जयंत दातार, श्री. हेमंत पटवर्धन, श्री. प्रदीप कुलकर्णी, श्री. चंद्रशेखर फडके, श्रीम. अनुजा रानडे, श्रीम. अमिता चक्रदेव, श्री. सुनील जोशी, श्री.सुबोध पाटील, श्री. चिपळूणकर यांच्या सहकार्यातून उपरोक्त सर्व कार्यक्रम यशस्वीपणे राबवले गेले. त्या सर्वांचे आभार.

**संपर्क समिती :**

आपले समस्यांवर योग्य ते मार्गदर्शन मिळविण्यासाठी विभागातील सभासदांनी पुढील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

१) श्री. दिलीप करंदीकर ९८३३८५६८५२

२) श्री. जयंत दातार ९८६९६७२३७१

३) श्री. हेमंत पटवर्धन ९८२०३३६५७६

४) श्री. चंद्रशेखर फडके ९६१९७४९९६४

५) श्रीम. अनुजा रानडे ९८२०५१२३८८

डोंबिवली विभागाचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी मंगलमय शुभेच्छा!

## १२.११ : मुलुंड विभाग

२९ वर्षांपूर्वी सुरू झालेला हा विभाग एक सशक्त व उपक्रमशील विभाग म्हणून ओळखला जातो. या विभागाने अहवाल वर्षात आयोजित केलेले उपक्रम पुढीलप्रमाणे.

**उतारवयातील विस्मरण उदबोधन वर्ग :**

दि. ०१. सप्टेंबर, २०२४ रोजी सायं ४:३० ते ६:३० या वेळेत मिठागर मनपा शाळा, मुलुंड (पूर्व) येथील सभागृहात २५० सभासदांच्या उपस्थितीत **श्री. अजित कदम** यांचे '**उतारवयातील विस्मरण**' या विषयावरील मार्मिक उदबोधन संपन्न झाले. प्रथमतः **डॉ. नलावडे**, कार्यवाह यांनी उपस्थितांना संस्थाकार्याची माहिती देऊन या उदबोधन वर्गाची गरज प्रतिपादन केली.

स्मृतीभ्रंश, त्यावरील उपाययोजना, योग्य आहार, व्यायाम व त्याचे महत्त्व इ. विषयावर **श्री. कदम** यांचे ओघवत्या शैलीत मार्गदर्शन झाले. तसेच उपस्थित सभासदांच्या प्रश्नांची अभ्यासपूर्ण उत्तरेही दिली.

श्री. घांगरेकर त्यांचे अभ्यासपूर्ण मनोगत, श्रीम. वैशाली घांगरेकर यांचे दमदार सूत्रसंचालन, श्रीम. घरत त्यांचे ओघवत्या शैलीतील आभार व श्रीम. आशा चित्रे आणि श्रीम. विद्या जगे यांचे राष्ट्रगान यामुळे कार्यक्रमात रंगत भरलेली होती.

'**सर्वथैव सक्षमता**' हे संस्थेचे उद्दिष्ट साध्य करणारा हा एक कार्यक्रम.

**दीपोत्सव–२०२४ :**

डोंबिवली विभागाकडून प्रेरणा घेऊन मंगळवार दि.२९ ऑक्टोबर, २०२४ रोजी सायं.४:०० ते ७:०० या वेळेत प्रथमच दिवाळीनिमित्त दीपोत्सव कार्यक्रम टी–वार्ड येथील भव्य सभागृहात १२० सभासदांच्या उपस्थितीत थाटामाटात संपन्न झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून **श्री. अजित पाटणे**, सहाय्यक आयुक्त, विशेष अतिथी म्हणून **मान. श्री. क्षीरसागर**, अध्यक्ष, पेन्शनर्स असोसिएशन हे उपस्थित होते.

या सोहळ्याची कांही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

१) १२० दिव्यांच्या तेजस्वी आरासाने सजलेली दिवाळी.
२) मान. सहाय्यक आयुक्तांचा शुभसंदेश व पुढील उपक्रमासाठी सहकार्याचे आश्वासन.
३) एकूण १० सभासदांचे सांगीतिक कार्यक्रमाचे सादरीकरण. श्रीम. रेखा ताम्हाणेकर, श्री. मोहन साटम, श्री. मुकुंद जोग, श्रीम. निलांबरी कुलकर्णी व सीमा पंडित यांच्या सादरीकरणाने डोळ्याचे पारणे फिटले.
४) कार्यवाह **डॉ. मारुती नलावडे** यांचे असोसिएशनचे कार्य, ठळक यशोगाथा, पुढील उपक्रम, इ. विषयीचे विवेचन.
५) मान. अध्यक्ष **श्री. कमलाकर क्षीरसागर** यांची अफलातून शाब्दिक दिवाळी भेट.
६) सुरेल गाण्यांच्या मेजवानीसह दिवाळीचा खुसखुशीत व स्वादिष्ट फराळ.
७) श्री. महादेव सावंत, अध्यक्ष, मुलुंड विभाग यांनी स्वखर्चातून दिलेली पारितोषिके (रु. १०००/–)
८) आभार व राष्ट्रगीताने सांगता.

जाताना प्रत्येक जण गुणगुणत व जगण्याची नवीन ऊर्जा घेऊन गेला हे नक्की. सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणाऱ्या सर्व कलाकारांचे आभार व अभिनंदन. सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

**☙ पेन्शनर्स डे – १५ डिसेंबर २०२४ :**

मुलुंड पेन्शनर्स आयोजित विविध संस्थांच्या वतीने मंगळवार दि.१७ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी २:०० या वेळेत राजे छत्रपती संभाजी सांस्कृतिक भवन, मुलुंड (पूर्व) येथे सुमारे १५० सेवानिवृत्तांच्या उपस्थितीत **पेन्शनर्स डे – आनंद सोहळा** आयोजित केला. या सोहळ्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

- ✻ या सोहळ्याचे यजमानपद **बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन – मुलुंड** शाखेकडे होते. **श्री. बधान** कार्यक्रमाचे अध्यक्ष.
- ✻ आपल्या संस्थेच्या वतीने **डॉ. नलावडे,** कार्यवाह यांचे मौलिक मार्गदर्शन.
- ✻ मुलुंड शाखेद्वारा आयोजित दर्जेदार मनोरंजनाचा कार्यक्रम. श्री.देठे, श्रीम. पालकर, श्रीम. जगे, श्री. सिंग, श्री. खोचरे यांचा बहारदार कराओके कार्यक्रम. श्री. मोहन साटम यांचा एकपात्री प्रयोग क्षण. श्री. वाळुंज यांचे प्रभावी सूत्रसंचालन.
- ✻ ऑल इंडिया सेंट्रल गव्हर्नमेंट पेन्शनर्स असोसिएशन आणि मुंबई पोर्ट ट्रस्ट असोसिएशन यांचाही सक्रिय सहभाग.

**☙ सुवर्ण महोत्सवी सांगता सोहळा व २८ वे स्नेहसंमेलन :**

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचा सुवर्ण महोत्सवी सांगता सोहळा व मुलुंड विभागाचे २८ वे स्नेहसंमेलन गुरुवार दि. २६.१२.२०२४ रोजी महाकवी कालिदास नाट्य मंदिर, मुलुंड (प.) येथे दुपारी ३:०० ते सांय ७:०० या वेळात ७०० हून अधिक सभासदांच्या उपस्थितीत थाटामाटात पार पडले.

या दैदिप्यमान सोहळ्याची प्रमुख आकर्षणे पुढीलप्रमाणे.

- ✻ कालिदास नाटयमंदिराच्या प्रवेशद्वारावरील फुलांची आकर्षक सजावट
- ✻ श्री. अनिल देठे यांनी सादर केलेला मुलुंड विभागाचा मुद्देसूद व संक्षिप्त अहवाल.
- ✻ **डॉ. मारुती नलावडे,** कार्यवाह यांनी संस्थाकार्य, संस्थेची वाढ व विस्तार, संस्थेचा ५० वर्षांचा आढावा, पुढील संकल्पना, सर्वथैवसक्षमतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संस्थास्तरावर आयोजित केलेले उपक्रम, भविष्यकालीन उपायोजना, निवृत्तीनंतरचं जगणं, सकारात्मक दृष्टिकोन, इ. विषयावर सादर केलेले दर्जेदार मनोगत.
- ✻ **संस्थाध्यक्ष मान. श्री. कमलाकर क्षीरसागर** यांचे नेहमीच्याच खुसखुशीत व प्रभावी शैलीत सादर केलेले माहितीपूर्ण विवेचन. गतिमान प्रशासन, कार्यालयाचे संगणकीकरण, संस्थेची वेबसाईट, कार्यकर्त्यांची जडणघडण, टॅली प्रणाली, भविष्यकालीन उपक्रम, इ. विषयांवर सभासदांना मंत्रमुग्ध करणारे मार्गदर्शन.
- ✻ संमेलनाध्यक्ष **मान. श्री अनंत केळकर** यांचे संक्षिप्त व भावपूर्ण आवाहन आणि पुढील वर्षातील संकल्प.
- ✻ **श्री. वाळुंज** यांचे खुमासदार शैलीतील प्रभावी सूत्रसंचालन.
- ✻ कार्यक्रमाला उंचीवर घेऊन जाणारे मधुकर तोरडमल लिखीत व मोहन साटम दिग्दर्शित '**तरुण तुर्क, म्हातारे अर्क**' हे खळखळून हसवणारे व म्हाताऱ्यांना तरुण आणि तरुणांना जवान करणारे खट्याळ, नाठाळ नाटक होय. विशेष म्हणजे डॉ. वासुदेव विष्णूपुरीकर, मोहन साटम, अनिता पालकर, मंचल दर्णे, सतीश सरदेसाई, राजा शिंगाडे, मुकुंद जोग, विद्या जगे व दिलीप भोगले

हे या नाटकातील कलाकार आपल्या संस्थेचे सभासद आहेत, ही विशेष बाब आहे. सर्वथैव सक्षमतेचे उद्दिष्ट साध्य झाले, असे नक्कीच म्हणता येईल.

* चविष्ट व रुचकर अल्पोपहार व्यवस्था.

सुवर्ण महोत्सवी वर्षातील हा सुवर्णक्षण सर्व सभासदांना पुढील जगणं आनंददायी करण्याची स्फूर्ती व ऊर्जा देईल, असा विश्वास वाटतो.

**सायबर गुन्हेगारी व घ्यावयाची काळजी :**

आपल्या संस्थेचे सर्वथैवसक्षमतेचे उद्दिष्ट लक्षात घेऊन, मंगळवार दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी दुपारी चार ते सहा या वेळात टी-विभाग येथील सभागृहात '**सायबर गुन्हेगारी, त्यातून होणारी फसवणूक व त्यादृष्टीने घ्यावयाची काळजी**'. या विषयावर ज्येष्ठ निवृत्त पोलीस अधिकारी व सायबर गुन्हेगारी क्षेत्रातील तज्ञ माननीय श्री. रवींद्र भिडे यांचे व्याख्यान व चर्चा, असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक कसे फसले व फसवले जातात? त्यासाठी कोणती काळजी घ्यावी? इत्यादी विषयांवर उद्बोधक व उपयुक्त अशी माहिती आपल्या सभासदांना देण्यात आली. या कार्यक्रमामुळे उपस्थित ८० सभासदांनी आनंद व्यक्त करून, अशा प्रकारचे इतर उपयुक्त उपक्रम नेहमी आयोजित करावेत, अशी इच्छा व्यक्त केली.

**हयातीचे दाखले :**

* ०५ नोव्हेंबर २०२४ ते ०५ मार्च, २०२५ या कालावधीत सभासदांचे हयातीचे online दाखले भरण्याची मोहीम विभागाने दर मंगळवारी टी - वॉर्ड येथील सभागृहात यशस्वीपणे राबवली.
* अनेक गृहनिर्माण संस्था, विरंगुळा केंद्र, ज्येष्ठ नागरिक कट्टा, अशा ठिकाणीही या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
* कांही आजारी/शारीरिकदृष्ट्या असमर्थ असणाऱ्या सभासदांच्या घरी जाऊनही कार्य पार पाडले.
* विशेष म्हणजे शेजारील ठाणे विभागाच्या कापूरबावडी केंद्रातही या मोहिमेत विभागाने भाग घेतला. एकूण ६४६ निवृत्त कर्मचाऱ्यांचे दाखले सादर केले गेले व ते सर्व मनपाकडून स्विकारले गेले.
* विशेष म्हणजे या कामी तरबेज असलेली मोठी फौज विभागाकडे उपलब्ध आहे.

**महिला दिन :**

दि..०८ मार्च, २०२५ रोजी **श्रीम. प्रतिमा घरत** यांच्या नेतृत्वाखाली कांही महिलांनी महिला दिनाच्या निमित्ताने इस्कॉन मंदिर, खारघर येथे भेट दिली.

* एक तास ध्यानधारणेनंतर त्यांनी '**आशालय**' या अनाथाश्रमास भेट देऊन तेथील ४५ मुलांच्या दुपारच्या भोजनासाठी देणगी देऊन कांही गरजेच्या वस्तूही भेट म्हणून दिल्या. सामाजिक बांधिलकी जपण्याचा हा एक लहानसा पण यशस्वी प्रयत्न आहे.

**साप्ताहिक सभा :**

सभासदांच्या साप्ताहिक सभा, हे या विभागाचे खास वैशिष्ट्य आहे. दर मंगळवारी दुपारी ४:३० ते ६:०० या वेळेत सुमारे ६० ते ८० सभासद टी-वॉर्ड येथील वातानुकूलित सभागृहात येत असतात.

* नवीन सभासद नोंदणी, सभासदांच्या तक्रारी व त्याची सोडवणूक, सभासद ओळखपत्र वितरण, वाढदिवस साजरे करणे, विविध व्याख्यानांचे आयोजन, विभागीय उपक्रमांचे नियोजन व आयोजन सदर सभांमधून होत आहे.

* सदर प्रसंगी **डॉ. नलावडे, श्री. अनंत केळकर, श्री. शिवराम अतकरी, श्री. बधान** उपस्थितांना मार्गदर्शन करत असतात.
* टी – विभागाचे आजपर्यंतचे सर्व सहाय्यक आयुक्त व संस्था प्रतिनिधी यांचे संबंध अत्यंत सलोख्याचे राहिले असल्यामुळे साप्ताहिक सभा सुरळीतपणे संपन्न होत आहेत.
* टी – विभागाचे सहाय्यक आयुक्त **श्री. अजित पाटणे** व नुकतीच सूत्रे हाती घेतलेल्या **श्रीम. योगिता कोल्हे** यांचे संस्थेतर्फे हार्दिक आभार.

उपरोक्त सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. नलावडे, व श्री. केळकर यांचे नेतृत्वाखाली, श्री. अतकरी, श्री. बधान, श्री. देठे, श्री. जयंत कुलकर्णी, श्री. वाळुंज, श्री. यादव, श्री.बुरांडे, श्री. परब, श्री. भोसले श्री. गुरव, श्रीम. ताम्हाणेकर, श्रीम. वैराळ, श्रीम. कुलकर्णी, श्रीम. बांदेकर, श्रीम. चित्रे, इ.नी परिश्रम घेतलेले आहेत. त्यांचे संस्थेतर्फे आभार.

**संपर्कासाठी सभासदांना आवाहन :**

विभागातील सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की, आपल्या समस्यांसंदर्भात कृपया खालील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

१) श्री. अनंत केळकर ९८६९४०२२६३
२) श्री. शिवराम अतकरी ९८९२९१६३२४
३) श्री. देवीदास बधान ९९८७५५३५६६
४) श्रीम. मंदा कुलकर्णी ९३२१०३३५७४
५) श्री. अनिल देठे ९७६९५३४७६६
६) श्री. जयवंत गुरव ९७०२१३३१३९
७) श्रीम. रेखा ताम्हाणेकर ९००४२८१६१०

मुलुंड विभागाचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी शुभेच्छा!

सर्व विभागीय अहवालांचे प्रभावी संपादन करण्याची जबाबदारी **श्रीम. शिल्पा नाईक** यांनी समर्थपणे पेलली आहे. त्यांचे आभार व अभिनंदन!

## १३) प्रमुख लेखापाल खात्याचा आनंदमेळा :

दि. ३०.११.२०२४ रोजी सोमवंशी सभागृह, दादर येथे प्रमुख लेखापाल खात्यातील सेवानिवृत्तांचा आनंदमेळा आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी सत्कारास उत्तर देताना, **संस्था अध्यक्ष मा. श्री. कमलाकर क्षीरसागर** यांनी प्रभावशाली मार्गदर्शन केले व संस्थाकार्यात उपयुक्त योगदान देण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

## १४) १ जुलैच्या काल्पनिक वेतन वाढीसाठी आवाहन :

दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना लगतच्या १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तांचे वेतन निश्चित करण्याबाबतचे **परिपत्रक क्र.साप्रवि / एफजीआर / १३, दि.११.१०.२०२३** अन्वये मनपा प्रशासनाने निर्गमित केलेले आहे.

**सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणी दिनांकानंतर दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या / होणाऱ्या तसेच ज्यांनी मागील १२ महिन्यांची अर्हताकारी सेवा पूर्ण केली आहे, अशा मनपा कर्मचाऱ्यांना**

**दि.०१ जुलैची काल्पनिक वेतनवाढ अनुज्ञेय आहे. संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपापल्या आस्थापनांकडे अर्ज करून या वेतनवाढीचा फायदा घ्यावा, असे आवाहन आहे.**

### १५) संस्थेची GST अंतर्गत नोंदणी :

**The trust has to get itself registered with GST start collecting GST on all Receipts from members.** असा शेरा दरवर्षीच्या लेखापरीक्षण अहवालात सनदी लेखापालाकडून मारला जात आहे.

GST अंतर्गत संस्थेची नोंदणी करावी किंवा कसे, याविषयी अनेक सनदी लेखापाल तसेच विविध तज्ज्ञांकडून संस्थेने मार्गदर्शन घेतले. मार्गदर्शनाअंती असा निष्कर्ष काढण्यात आला की, संस्थेचे वार्षिक उत्पन्न (सभासदांची मनपामार्फत वसूल होत असलेली वार्षिक वर्गणी, वैद्यकीय सहाय्य वर्गणी तसेच नवीन सभासद नोंदणी करताना वसूल करण्यात येत असलेली वर्गणी, इ) रु.५०,००,०००/- (रु पन्नास लाख) पेक्षा जास्त होत असल्याने GST अंतर्गत नोंदणी करणे अनिवार्य आहे.

**त्यामुळे संस्थेची GST अंतर्गत नोंदणी करण्यात यावी, असा ठराव कार्यकारिणी सभेने दि.२६.०७.२०२३ व दि.०१.०९.२०२३ रोजी सर्वानुमते मंजूर केला आहे. या ठरावानुसार दि.२०.१२.२०२४ रोजी Mumbai Municipal Pensioners Association या नावाने GST अंतर्गत नोंदणी करण्यात आली असून GST नोंदणी क्र. 27AAATM6675R1ZN असा आहे. त्यामुळे संस्थेच्या एकूण उत्पन्नावर १८% GST दरमहा २० तारखेच्या आत भरण्यात येत आहे.**

### १६) महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, पुणे या संस्थेवर आपल्या पदाधिकाऱ्यांची झालेली निवड :

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष मान. **श्री. कमलाकर क्षीरसागर** व संयुक्त कार्यवाह **श्रीम. प्रतिमा पवार** यांची महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, या संस्थेवर अनुक्रमे **उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्य** या पदावर सन २०२५-२०२८ या कालावधीसाठी बिनविरोध निवड झालेली आहे. संस्थेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

### १७) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मनपा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नियोजित मिळावे :

रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. अनेक सेवानिवृत्त कर्मचारी बृहन्मुंबई परिसरात राहत असले तरी त्यांचे संबंधित भागात वारंवार जाणे येणे असते. आजमितिला संस्थेच्या ११ शाखा कार्यरत असून अजूनही शाखा वाढीस भरपूर वाव आहे. त्यासाठी प्रथम प्रयत्न म्हणून रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यात शाखा स्थापन करून संस्थेचा विस्तार करण्याचा मानस आहे.

या दृष्टीने कार्यकारिणीच्या सभांमधून अनेकदा चर्चाही झालेली आहे. त्यामुळे उपरोक्त तीनही जिल्ह्यांत वास्तव्यास असलेल्या/वारंवार जाणे येणे असलेल्या मनपातील निवृत्त कर्मचाऱ्यांना खालील प्रमाणे आवाहन करण्यात येत आहे.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड येथे नियोजित संभाव्य मेळाव्यास आवर्जून उपस्थित रहावे.

आपल्या परिसरात राहणाऱ्या संबंधित निवृत्त कर्मचाऱ्यांना या मेळाव्याविषयी अवगत करावे.

नियोजित मेळाव्यासाठी उपस्थित राहू इच्छिणाऱ्या संबंधित निवृत्त कर्मचाऱ्यांनी कृपया आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक इ. माहिती संस्थेच्या खालील प्रतिनिधींकडे देण्यात यावी.

संपर्क प्रतिनिधी -

१) श्री. प्रभाकर गावडे - कुडाळ - ९८२१४१२४५६

२) श्रीम. अनुजा आचरेकर - गिरगाव - ९९३३१९२८२१

३) श्रीम. विजया खानोलकर - वसई - ७७१९८४८९७९

४) श्री. सुभाष लाड - लांजा - ९८६९१०५७३४

याशिवाय कार्यकारिणीमधील कोणताही सदस्यांशी संपर्क करता येईल.

**नियोजित संभाव्य मेळाव्यांच्या तारखा, स्थळ, इ. विषयी आगाऊ कळविण्यात येईल.** सर्व संबंधितांनी या संभाव्य मेळाव्यांत उपस्थित राहून संस्थावृद्धी व विस्तारासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आहे.

## १८) My Bmc App चा उपयोग करा :

बृहन्मुंबई महानगरपालिकेने कर्मचारी/निवृत्त कर्मचारी यांची इत्यंभूत माहिती दर्शवणारे My Bmc नावाचे -App विकसित केलेले आहे. सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की, सदर -App आपल्या मोबाईलवर जरूर डाऊनलोड करून घ्यावे. घरबसल्या आपणास खालील माहिती त्वरित उपलब्ध होऊ शकते.

१) संपूर्ण वैयक्तिक माहिती २) नोंदलेला पत्ता ३) पेन्शन स्लीप, पेन्शन प्रमाणपत्र, हयातीचा दाखला सद्यस्थिती ४) पेन्शन बँक माहिती, वारसदारचे नाव इ.

सदर -App डाउनलोड केल्यानंतर **Employee Service** मध्ये जाऊन आपला **कर्मचारी संकेतांक टाईप केल्यानंतर ६ अंकी OTP येतो. तो टाईप केल्यानंतर वरील सर्व माहिती सहज उपलब्ध होते. फक्त गरज आहे, थोडेसे तंत्रज्ञानी होण्याची.**

## १९) ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतन धारकांच्या निवृत्ती वेतन वाढीला यश

**शासन निर्णय क्र. सेनिवे/२०२१/प्र. क्र.६४/ सेवा-४ दि.१६.०१.२०२४** नुसार महानगरपालिकेच्या ८० वर्षे व त्यावरील निवृत्ती वेतनधारक / कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना निवृत्ती वेतनात वाढ मिळवून देण्यासाठी संस्थेने प्रशासनाशी सातत्याने पत्रव्यवहार केला, पाठपुरावा केला. त्यास यश येऊन पुढील तक्त्यात नमूद केल्यानुसार ८० वर्षांवरील निवृत्त वेतन धारकांना वाढ मिळालेली आहे.

**अनु. . वय वर्षे ........... महाराष्ट्र शासन निर्णयानुसार मिळालेली वाढ**

१ .....८० + ते ८५ ....२० % वाढ

२ .....८५ + ते ९० ....३० % वाढ

३ .....९० + ते ९५ ....४० % वाढ

४ .....९५ + ते १०० ..५० % वाढ

५ .....१०० + ..........१०० % वाढ

**महानगरपालिका प्रशासनाचे संस्थेतर्फे हार्दिक आभार.**

# सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ

## शहर विभाग






## ठाणे विभाग





मुलुंड विभाग

## मुलुंड विभाग






## डोंबिवली विभाग






# सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ

## कल्याण विभाग






## वसई विभाग






## बोरीवली विभाग





## चेंबूर विभाग





# सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ

## गोरेगाव विभाग





## पुणे विभाग





## बदलापूर विभाग





## दादर कार्यालय





## १८ डिसेंबर, २०२४ विद्यार्थी गुणगौरव सोहळा







## मध्यवर्ती कार्यालयामधील 'दीपावली'





## मासिक सभा






प्रमुख लेखापाल (कोषागार), निवृत्ती वेतन विभागाने हयातीचे दाखले भरण्याविषयी आयोजित केलेला प्रशिक्षण वर्ग व त्यातील संस्थेचा सहभाग

बोरिवली शाखा आयोजित सायबर गुन्हे व त्यावरील उपाय यावरील कार्यशाळा





## २०) QR Code आधारित ओळखपत्रा विषयी :

बृहन्मुंबई महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यरत तसेच सेवानिवृत्त कामगार/कर्मचारी/अधिकारी यांना कॉर्पोरेट क्षेत्राच्या धर्तीवर QR Code सह नवीन ओळखपत्र देण्याबाबतचा निर्णय परिपत्रक क्र. एमओएम/२२८९ दि. १६.०२.२०२४ नुसार घेतलेला आहे.

निवृत्तांचे वाढते वय, विविध आजार, शारीरिक असक्षमता, स्थलांतर, इ. अनेक कारणांमुळे सेवानिवृत्तांना हे दिव्य पार करता येणे अशक्य आहे. याचा विचार करून असोसिएशनने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी (संस्थेचे सभासद असोत वा नसोत) ओळखपत्र काढून देण्याची मोहीम महानगरपालिका प्रशासनाच्या सहकार्याने गतवर्षी हाती घेतली होती.

त्यानुसार असोसिएशनच्या सर्व शाखांमध्ये कार्यकर्ते/कार्यकारणी सदस्य/पदाधिकारी यांच्या अथक परिश्रमातून एकूण ८७०६ कर्मचारी / सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ओळखपत्रे काढली गेली. परंतु **कोणत्याही निवृत्त कर्मचाऱ्यास अद्यापपर्यंत Q. R. Code आधारित ओळखपत्र प्राप्त झालेले नाही. सदर बाब मनपा प्रशासनाच्या स्तरावर प्रलंबित आहे. त्यामुळे सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांना संस्थेतर्फे पुढील आवाहन करण्यात येत आहे.**

- ✻ ज्यांचे ओळखपत्र काढले गेले आहे, त्यांना आस्थापनेच्या पडताळणीसापेक्ष ते नक्कीच मिळेल, याविषयी सर्वांनी संयम ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे आपले कांहीच अडलेले नाही.
- ✻ QR Code ओळखपत्र आणि दरमहा मिळणारी पेन्शन याचा काहीही संबंध नाही. हे ओळखपत्र नसल्यामुळे कोणाचीही पेन्शन बंद होणार नाही, याची खात्री बाळगावी.

## २१) विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ :

मार्च /एप्रिल २०२४ मध्ये महानगरपालिका शाळांमधून इयत्ता १० वी, १२ वी तसेच पदविका, पदवी, पदव्युत्तर परीक्षेत नैपुण्य मिळवणाऱ्या आपल्या संस्थेच्या सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभ जी / उत्तर विभाग कार्यालयाच्या सभागृहात दिनांक १८.१२.२०२४ रोजी **संस्थेचे कार्यवाह मान. डॉ. मारुती नलावडे यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाला. सदर प्रसंगी श्रीम. प्रतिमा पवार (संयुक्त कार्यवाह), श्री. हेमंत पटवर्धन (खजिनदार), श्री.चंद्रशेखर फडके (सहखजिनदार), श्री. शिवराम अतकरी (संयुक्त कार्यवाह)** व अन्य पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

सदर समारंभाचे नियोजन व आयोजन **श्री. दिलीप करंदीकर, कार्यालय प्रमुख** यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात या पारितोषिक वितरण समारंभाची सविस्तर माहिती दिली. अध्यक्षस्थान भूषविणारे संस्थेचे कार्यवाह मान. **डॉ. नलावडे** यांनी विद्यार्थ्याना शिक्षणाचे एकंदर महत्त्व अधोरेखित केले. पुढील करिअरसाठी काय निवडावे इ. विषयी सुरेख मार्गदर्शन केले. इतर पदाधिकाऱ्यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या पालकांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून आभार मानले. **उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मान. डॉ. नलावडे व इतर पदाधिकऱ्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.**

या पारितोषिक वितरण समारंभामध्ये एकूण **रुपये ३८,२००/–** एवढी रक्कम एकूण १९ विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| म. न. पा. शाळेतील विद्यार्थी | रु. १५,७००/- |
| सदस्यांची मुले / नातवंडे इ. | रु. २२,५००/- |
| **एकूण रुपये** | **रु. ३८,२००/–** |

याशिवाय विद्यार्थ्यांना आकर्षक प्रमाणपत्रे व अल्पोपहार वितरित करण्यात आला.

**विशेष सूचना :**

- ※ **बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील जे विद्यार्थी मार्च/एप्रिल २०२५ मध्ये घेतलेल्या शालांत परीक्षेत पहिल्या दहा क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात येणार आहे.**
- ※ **तसेच मार्च/एप्रिल २०२५ मध्ये घेतलेल्या (इ. १२वी, पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी) परीक्षेत ज्या सभासदांच्या पाल्यांनी विशेष यश संपादित केले आहे,** अशा विद्यार्थ्यांचाही सत्कार संस्थेतर्फे करण्यात येणार आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, **त्यांनी सदर परीक्षेतील उत्तीर्ण निकालपत्रासह (झेरॉक्स) आपले अर्ज दि. ३०.११.२०२५ पर्यंत संस्था कार्यालयात पाठवावेत.**

**महत्त्वाची सूचना :**

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभ **गुरुवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२५** रोजी संस्था कार्यालयात आयोजित करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

## २२) पेन्शन स्लीप :

निवृत्तांना दरमहा पेन्शन स्लीप ई-मेलद्वारा प्राप्त होत आहे. अजूनही अनेकांना पेन्शन स्लीप मिळण्यात अडचणी असल्यास त्यांनी संस्थेकडे संपर्क साधावा. त्यांना योग्य ते सहकार्य करण्यात येईल.

अद्यापही ज्यांना पेन्शन स्लीप मिळत नाही, त्या पेन्शन धारकांनी ई-मेलद्वारा आपले खालील नमुन्यातील अर्ज ao.penib@mcgm.gov.in या ई-मेल पत्यावर पाठवावेत. अर्जात पुढील गोष्टी नमूद कराव्यात. **स्वतःचे नांव, कर्मचारी संकेतांक, मोबाईल क्र. व ई-मेल आयडी** (२५ कॅरेक्टर पेक्षा जास्त नसावा). अर्जाचा नमुना संस्थेच्या वेबसाईटवरही देण्यात आलेला आहे. तरीही तो येथे पुन्हा देण्यात येत आहे.

Name :-
Address:-
Contact No:-
Date:

To,
The Chief Accountant (Treasury)
M. C. G. M.
1st floor, Annex Building,
Mahapalika Marg, Fort
Mumbai-400001

Sub - To get Pension Slip through email.

Dear Sir/Madam

It is requested to make suitable arrangements to send me the monthly Pension Slip on my below mentioned email ID with immediate effect.

My details are as under-

1) Name :
2) Employee Code No :
3) Mobile Number :
4) Email Id :

Yours Faithfully
(Full Name: )

तसेच पे स्लीप न मिळाल्यास **०२२–२२६२०२५१/०२२–२२७५४०००** विस्तारीत क्र. ४०३४ या क्रमांकावर संपर्क साधावा. पे स्लीप त्वरीत पाठवली जाते, असा अनुभव आहे. पे स्लीप My BMC App वरूनही डाउनलोड करता येते.

## २३) निवृत्ती वेतन विभाग :

महापालिकेचे प्रमुख लेखापाल (कोषागर) यांचे कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे :

**प्रमुख लेखापाल (कोषागार) यांचे कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, विस्तारित इमारत, पहिला मजला, महापालिका मार्ग, मुंबई– ४०० ००१**

**संपर्क क्र : ०२२–२२६२०२५१ / वि. क्र ४८९०.**

## २४) अंशराशीकरण रकमेचे अधिदान (Comutation Amount) :

निवृत्ती वेतनांपैकी ज्या निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण केलेल असेल व ती रक्कम ज्या तारखेला मिळाली असेल, त्यानंतर १५ वर्षांनी तेवढीच रक्कम निवृत्ती वेतनात समाविष्ट करण्यात येते. **निवृत्तीनंतर अंशराशीकरणाची रक्कम ज्या तारखेला जमा झाली असेल, त्या तारखेपासूनचा १५ वर्षांचा कालावधी कृपया लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.** त्यासाठी कोणीही सभासदांनी असोसिएशनकडे किंवा निवृत्ती वेतन विभागाकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. कृपया याबाबत क्र. सा.प्र.वि / एफ जी आर / १६ दि. १९.१०.२००४ हे परिपत्रक पहावे. सदर परिपत्रक असोसिएशनच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

**सर्व सभासदांना विनम्र आवाहन करण्यात येते की, निवृत्तीवेतन अंशराशीकरण पुनर्स्थापना कालावधी १५ वर्षे ऐवजी १२ वर्षे अजिबात झालेला नाही. याविषयी येणाऱ्या बातम्या, व्हिडिओ याकडे दुर्लक्ष करण्यात यावे.**

## २५) देणगीदार :

अहवाल वर्षात खाली नावे नमूद केलेल्या सभासदांनी देणगी स्वरूपात बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनला आर्थिक सहाय्य केले आहे. सर्व देणगीदारांची नावे व अन्य तपशील, असोसिएशनच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतो, याची कृपया नोंद घ्यावी.

दि. १ एप्रिल २०२४ ते दि. ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील देणगीदारांचा तपशील

| अनु.क्र. | सभासद / देणगीदारांचे नाव | स्थळ | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. कुसुम नारायण कामत | पुणे | २०,०००/– |
| २ | श्री. हरिश्चंद्र परांजपे | ठाणे | २०,०००/– |
| ३ | श्रीम. रेखा देशमुख (कै. केशव घाटपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ) | मुलुंड | ११,०००/– |
| ४ | श्री. चिंतामणी गोपाल कुलकर्णी | कांदिवली | १०,०००/– |
| ५ | श्रीम. हर्षशीला ठाकूरभाई पटेल | डोंबिवली | १०,०००/– |
| ६ | श्रीम. माधवी मयेकर | डोंबिवली | १०,०००/– |
| ७ | श्रीम. रमा रमेश शर्मा | डोंबिवली | १०,०००/– |
| ८ | श्री. प्रकाश देशमाने | डोंबिवली | ७,५००/– |
| ९ | श्रीम. भारती नवनीत राणा | कांदिवली | ७,०००/– |

| अनु.क्र. | सभासद / देणगीदारांचे नाव | स्थळ | रक्कम |
|---|---|---|---|
| १० | श्रीम. अनुजा आचरेकर | गिरगाव | ६,०००/- |
| ११ | श्री. अनंत काजरोळकर | सायन | ५,१८१/- |
| १२ | श्री. चंद्रशेखर फडके | डोंबिवली | ५,००१/- |
| १३ | श्रीम. वृषाली विनायक करंजकर | मुलुंड | ५,००१/- |
| १४ | श्री. कमलाकर व्यंकटेश क्षीरसागर | डोंबिवली | ५,००१/- |
| १५ | श्री. वामन वासुदेव कुटुंबे | वाशी | ५,०००/- |
| १६ | श्रीम. घांगरेकर | ठाणे | ५,०००/- |
| १७ | श्रीम. वैशाली दिवेकर | मुलुंड | ५,०००/- |
| १८ | श्री. अनंत रघुनाथ वीरकर | मुलुंड | ५,०००/- |
| १९ | श्रीम. रागिणी अनंत विरकर | मुलुंड | ५,०००/- |
| २० | श्रीम. अनघा अभय वैद्य | डोंबिवली | ५,०००/- |
| २१ | श्रीम. माया रमेश घडे | कल्याण | ५,०००/- |
| २२ | श्रीम. छाया कांचन चित्रे | ठाणे | ५,०००/- |
| २३ | श्री. अशोक थोरात | मुलुंड | ५,०००/- |
| २४ | श्रीम. सुनिता व्यंकटेश भट | गोरेगाव | ५,०००/- |
| २५ | श्री. मिनेश शहा | ठाणे | ५,०००/- |
| २६ | श्रीम. सुलभा अनंत लोंढे | - | ५,०००/- |
| २७ | श्री एकनाथ कावतकर | दादर | ५,०००/- |
| २८ | श्रीम. मृदुला तेरेदेसाई | ठाणे | ५,०००/- |
| २९ | श्रीम. अलका कडणे | दादर | ५,०००/- |
| ३० | श्रीम. आशालता अरविंद कुलकर्णी | चेंबूर | ५,०००/- |
| ३१ | श्री. महादेव सोहनी (कै. मीना महादेव सोहनी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ) | मुलुंड | ५,०००/- |
| ३२ | श्रीम. सुलभा कुलकर्णी | चेंबूर | ५,०००/- |
| ३३ | श्री. अनंत दत्तात्रय केळकर | मुलुंड | ३,०००/- |
| ३४ | डॉ. मारुती श्रीराम नलावडे | मुलुंड | ३,०००/- |
| ३५ | श्रीम. सुषमा लाड | डोंबिवली | ३,०००/- |
| ३६ | श्रीम. अनिता सुरेश ठाकूर | बोरिवली | ३,०००/- |
| ३७ | श्री. दिलीप डोंगरकर (कै. श्री. आणि श्रीम. डोंगरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ) | ठाणे | ३,०००/- |
| ३८ | श्रीम. शैलजा श्रीखंडे | ठाणे | ३,०००/- |
| ३९ | श्रीम. शिला वसंत जोशी | गिरगाव | ३,०००/- |
| ४० | श्रीम. ज्योती नवाथे | डोंबिवली | २,५००/- |
| ४१ | श्रीम. सरिता गवाणकर | गोरेगाव | २,५००/- |
| ४२ | श्री. मोहन शंकर साटम | मुलुंड | २,२२२/- |

| अनु.क्र. | सभासद / देणगीदारांचे नाव | स्थळ | रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| ४३ | श्रीम. रचना कलगुटकर | - | २,०००/- |
| ४४ | श्री जयंत रामचंद्र दातार | डोंबिवली | २,०००/- |
| ४५ | श्रीम. कलावती दत्तात्रय असाई | एरोली | २,०००/- |
| ४६ | श्री. सुहास खामकर | ठाणे | २,०००/- |
| ४७ | श्री. दादा गुलाब साळवे | ठाणे | २,०००/- |
| ४८ | कै. प्रेमबाई प्रागजी सोलंकी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ | महालक्ष्मी | २,०००/- |
| ४९ | श्री. नितीन मंडकईकर | ठाणे | २,०००/- |
| ५० | श्रीम. नीता वासुदेव मांजरेकर | गोरेगाव | २,०००/- |
| ५१ | श्रीम. अंजली अरविंद अभ्यंकर | ठाणे | २,०००/- |
| ५२ | श्रीम. भाग्यश्री भालचंद्र बापट | ठाणे | २,०००/- |
| ५३ | श्रीम. विद्या नातू | ठाणे | २,०००/- |
| ५४ | श्री. मधुकर आंबोणकर | ठाणे | २,०००/- |
| ५५ | श्रीम. लतिका नायडू | ठाणे | २,०००/- |
| ५६ | श्री. पांडुरंग नांदगावकर | चिंचपोकळी | २,०००/- |
| ५७ | श्रीम. रेखा ताम्हाणेकर | ठाणे | २,०००/- |
| ५८ | श्रीम. सरोज महाजन | सायन | २,०००/- |
| ५९ | श्रीम. उषा अनंत लेले | मुलुंड | २,०००/- |
| ६० | श्रीम. सुप्रिया हरी जोग | कल्याण | २,०००/- |
| ६१ | श्री. दिलीप विनायक करंदीकर | डोंबिवली | १,५०१/- |
| ६२ | श्री. अजित एस इनामदार | ठाणे | १,५००/- |
| ६३ | श्री. सुनील मतकरी | ठाणे | १,५००/- |
| ६४ | श्रीम. अनघा परेरा | ठाणे | १,५००/- |
| ६५ | श्री. रवींद्र ढवळीकर | डोंबिवली | १,१११/- |
| ६६ | श्री. देविदास आनंदा बधान | मुलुंड | १,१११/- |
| ६७ | श्रीम. शिल्पा मुरंजन | डोंबिवली | १,१०१/- |
| ६८ | श्री. कमलाकर बोरसे | ठाणे | १,१००/- |
| ६९ | श्रीम. निर्मला वाणी | बदलापूर | १,१००/- |
| ७० | श्री. सुनील मुरलीधर धामणे | परेल | १,१००/- |
| ७१ | श्री. श्रीराम अर्जुन पवार | ठाणे | १,०७५/- |
| ७२ | श्री. गोविंद भावे | कल्याण | १,००१/- |
| ७३ | श्री. विजयकुमार पोतदार | बदलापूर | १,००१/- |
| ७४ | श्रीम. तारा वैराळ | मुलुंड | १,०००/- |
| ७५ | श्री. साहेबराव अहिरे | कल्याण | १,०००/- |
| ७६ | श्री. इकबाल सोडावाला | बोरिवली | १,०००/- |
| ७७ | श्रीम. जिजाबाई सुखदेव गंगणे | विक्रोळी | १,०००/- |

| अनु.क्र. | सभासद / देणगीदारांचे नाव | स्थळ | रक्कम |
|---|---|---|---|
| ७८ | श्री. रमेश कदम | – | १,०००/– |
| ७९ | श्रीम. प्रतिभा फलक | – | १,०००/– |
| ८० | श्रीम. सविता विनायक महाशब्दे | ठाणे | १,०००/– |
| ८१ | श्रीम. आशालता खिल्लारे | – | १,०००/– |
| ८२ | श्रीम. नीता दिलीप बकरे | – | १,०००/– |
| ८३ | श्रीम. रोहिणी रवींद्र जाधव | – | १,०००/– |
| ८४ | श्री. मुलजी जयराम सुमरा | नेरूळ | १,०००/– |
| ८५ | श्री. हेमंत पटवर्धन | डोंबिवली | १,०००/– |
| ८६ | श्रीम. पद्मा कुलकर्णी | – | १,०००/– |
| ८७ | श्रीम. सविता सुभाष गावंड | ठाणे | ५०१/– |
| ८८ | श्रीम. विजया रतनराव सोनावणे | – | ५००/– |
| ८९ | श्री. दिलीपकुमार पुरुषोत्तम धर्माधिकारी | – | ५००/– |
| ९० | श्री. हेंन्ड्री आप्पा पारधे | कल्याण | ५००/– |
| ९१ | श्री. आनंद यशवंत कांबळे | – | ५००/– |
| ९२ | श्री. आघरकर | – | ५००/– |

## २६) संस्थेची विभागीय कार्यालये :

सभासदांशी चर्चा करणे, सुसंवाद साधणे, विविध विषयी त्यांना मार्गदर्शन करणे, यथाशक्ती साहाय्य करणे, समस्या सोडवणे, इत्यादी कार्यासाठी आठवड्यातून एक दिवस किंवा गरजेनुसार संबंधित विभागातील कार्यकर्ते/पदाधिकारी एकत्र जमतात. काही स्थानी जागा मिळाल्या आहेत. जेथे जागा उपलब्ध नाही, तेथील आपले कार्यकर्ते त्यांच्या घरूनच संस्थाकार्य करत आहेत. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | विभाग | स्थळ | वेळ व दिवस | कार्यकर्त्यांचे नाव | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुलुंड विभाग | टी–वॉर्ड कार्यालय, | मंगळवार : सायं. | श्री. अनंत केळकर | ९८६९४०२२६३ |
| | | क्र.२० (सभागृह), | ४.०० ते ५.३० | श्री. शिवराम अतकरी | ९८९२९१६३२४ |
| | | पहिला मजला, | | श्री. बधान | ९९८७५५३५६६ |
| | | मुलुंड–४०००८० | | श्री. गुरव | ९७०२१३३१३९ |
| | | | | श्रीम. मंदा कुलकर्णी | ९३२१०३३५७४ |
| | | | | श्रीम. रेखा ताम्हाणेकर | ९००४२८१६१० |
| २. | बोरिवली विभाग | आर (मध्य) विभाग | शनिवार : सायं. | श्री. सुरेश सावंत | ९८६९१८६८१२ |
| | | कार्यालय, नवीन इमारत, | ४.०० ते ५.३० | श्री. रमेश राणे | ९८६९०६६५२३ |
| | | १ला मजला, बोरिवली (प.) | | श्री. नागेश सामंत | ९८६९५३१६९८ |
| | | | | श्रीम. अनिता गोंधळेकर | ७०४५३५३५०५ |
| | | | | श्री. संजय तोरस्कर | ९९६९४०९८९७ |

| क्र. | विभाग | स्थळ | वेळ व दिवस | कार्यकर्त्यांचे नाव | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ३. | वसई विभाग | कुलकर्णी हॉल, वसई (प.) | सायं ४ ते ६ दर महिन्याचा पहिला बुधवार | श्री. काशिनाथ पाटील | ९८२३४२४९६९ |
| | | | | श्रीम. हेमलता हटकर | ९१३७०६१८०३ |
| | | | | श्री. अनंत पाटील | ९८९२३४६५६२ |
| | | | | श्रीम. कोन्सेसाव डिमेलो | ८००७३५४६४० |
| | | | | श्री. जॉन गोन्सालवीस | ९३२२७५८८०४ |
| | | | | श्रीम. मेबल गोन्सालवीस | ९८१९७१०४८३ |
| | | | | श्रीम. विजया खानोलकर | ७७१९८४८९७९ |
| | | | | श्रीम. आंजेलिन नुनीस | ९७३०४४५७९६ |
| ४. | डोंबिवली विभाग | क्रीडा भवन, व्ही. पी. रोड, पेंडसे नगर, डोंबिवली (पूर्व) | शनिवार : सायं. ५.१५ ते ६.३० | श्री. दिलीप करंदीकर | ९८३३८५६८५२ |
| | | | | श्री. जयंत दातार | ९८६९६७२३७१ |
| | | | | श्री. चंद्रशेखर फडके | ९६१९७४९९६४ |
| | | | | श्री. हेमंत पटवर्धन | ९१६७९५१४९९ |
| ५. | कल्याण विभाग | उपलब्धतेनुसार | सायं. ४ ते ६ महिन्यातून एकदा | श्रीम. शिल्पा पटवर्धन | ९८२०३३६५७६ |
| | | | | श्री. श्रीराम कुलकर्णी | ९८३३५८९३४० |
| | | | | श्री. विनायक मोघे | ९८१९१२०४९३ |
| | | | | श्री. अभय चौबळ | ९९२०५७५७३१ |
| | | | | श्री. रवींद्र बावीस्कर | ९००४३९०७२७ |
| | | | | श्री. चंद्रकांत तळेले | ९९८७२७३०२० |
| ६. | बदलापूर विभाग | कालुराम कॉम्प्लेक्स, 'ए' विंग, वाणी आळी, विठ्ठल मंदिराजवळ, बदलापूर (पूर्व), जिल्हा : ठाणे-४२१५०३ | आवश्यकतेनुसार | श्री. विजयकुमार पोतदार | ९७६६५२५२६७ |
| | | | | श्री. के. एन. राजपूत | ८६९८७३१३७६ |
| | | | | श्रीम. सुमित्रा कुलकर्णी | ९४२२४८०२९९ |
| | | | | श्री. विश्वनाथ जाधव | ९८१९५९२९६९ |
| | | | | श्रीम. अपर्णा पेठकर | ९३२५५७६४७५ |
| ७. | कर्जत विभाग | - | - | श्री. रामनाथ गांगल | ९४२३८९१३७९ |
| ८ | चेंबूर | अमेय सोसायटी सी-६, टिळक नगर, टर्मिनलसमोर चेंबूर | शनिवार : सायं ४.०० ते ६.०० | श्रीम. शिल्पा नाईक | ९८२०२२२०७५ |
| | | | | श्रीम. शोभना पाटील | ९७५७३०१२८५ |
| | | | | श्रीम. प्रमिला कोंडगेकर | ९३२३७१९५९० |
| | | | | श्रीम. शकुंतला थोरात | ९००४०७८४६४ |
| | | | | श्रीम. सुष्मिता चिकोर्डे | ९३२४७९७३१० |
| | | | | श्री. प्रकाश राणे | ९८६९४१९३९७ |
| | | | | श्री. महेश म्हात्रे | ९८६९२२७४८३ |
| ९. | ठाणे | उपजल अभियंता(प्रचालने) यांचे कार्यालय, बीग बाजार समोर, कापूरबावडी, ठाणे (प)-४००६०७ | दरमहा तिसऱ्या आठवड्यातील एक दिवस सोयीप्रमाणे सायं. ४ ते ६ | श्री. सुहास खामकर | ९८२०८४०२५३ |
| | | | | श्रीम. अलका जोशी | ९३७२६१३९०८ |
| | | | | श्रीम. वंदना शिर्के | ७०४५६४९३३५ |
| | | | | श्री. सुरेन्द्र भोई | ९९६९३८७८५८ |
| | | | | श्री. मधुकर आंबोणकर | ९९६९१६६६८२ |
| | | | | श्रीम. रेखा ताम्हाणेकर | ९००४२८१६१० |

| क्र. | विभाग | स्थळ | वेळ व दिवस | कार्यकर्त्यांचे नाव | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १० | गोरेगाव | पी/साऊथ-विभाग कार्या., सभागृह, दुसरा मजला, गोरेगाव-४००१०४ | आवश्यकतेनुसार | श्रीम. नीता मांजरेकर | ९६५३३२८७५६ |
| | | | | श्री. विनायक रेगे | ९८६९०६१५७२ |
| | | | | श्री. श्रीराम जोशी | ९८६९६५८४२२ |
| | | | | श्रीम. स्वरदा दाते | ९९६७३७८५८२ |
| | | | | श्रीम. नीलिमा जवंजाळ | ९८९२८३४५२० |
| ११ | शहर | उपलब्धतेनुसार | आवश्यकतेनुसार | श्री. सतिश आवटे | ९८६७७२०३२५ |
| | | | | श्री. शरद कुवेसकर | ९८६९४६४५४४ |
| | | | | श्रीम. अनुजा आचरेकर | ९८३३१९२८२१ |
| | | | | श्री. नामदेव थोरात | ९३२२२३८७२० |
| | | | | श्री. सुधीर शिशुपाल | ९८९२१९०८०५ |
| १२ | पुणे | उपलब्धतेनुसार | आवश्यकतेनुसार | श्री. सुधीर सावदेकर | ९८१९७५४४६६ |
| | | | | श्री. मणेरीकर | ८१०८५१४५१४ |
| | | | | श्रीम. बहुतुले | ९८६९१०८५५५ |
| | | | | श्रीम. गोरे | |
| | | | | श्रीम. शरद कुलकर्णी | ९८२०५६६००८ |

## २७) दि. १ एप्रिल, २०२४ ते दि. ३१ मार्च, २०२५ या कालावधीत संस्थेस माहिती प्राप्त झालेल्या दिवंगत सभासदांचा तपशील :

| अनु.क्र. | दिवंगत सभासदाचे नांव | स्थळ | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्रीम. सुनिता मनोहर परब | मुलुंड | १३.०४.२०२४ |
| २. | श्रीम. सुगंधा पद्मनाभ ठोंबरे | दादर | ०३.०३.२०२४ |
| ३. | श्रीम. शितल विजय आरडेकर | विरार | १३.०५.२०२४ |
| ४. | श्रीम. नातालिया मायकल तुस्कानो | वसई | ११.०३.२०२४ |
| ५. | श्री. फ्रान्सिस जॉन डाबरे | वसई | २२.१०.२०२३ |
| ६. | श्री. जोसेफ जॉन घोन्सालीस | वसई | २२.११.२०२३ |
| ७. | श्री. जॉकी मनू दालमेत | वसई | २५.०१.२०२४ |
| ८. | श्रीम.इमेर्शियाना फ्रान्सिस फर्नांडिस | वसई | डिसेंबर २०२३ |
| ९. | श्री. महादेव बाबुराव तेंडुलकर | वसई | डिसेंबर २०२३ |
| १०. | श्री. बाप्टिस्टा पॉल तुस्कानो | वसई | ०३.१२.२०२० |
| ११. | श्री. जॉकी जोसेफ फर्नांडिस | वसई | सप्टेंबर २०२२ |
| १२. | श्री. अंतोन आगू लुद्रिक | वसई | मार्च २०२१ |
| १३. | श्री. राजू शेट्टी लोकय्या | दादर | २१.०४.२०२४ |
| १४. | श्री. दसप्पा म. बैलूर | दादर | २५.०८.२०२३ |

| अनु.क्र. | दिवंगत सभासदाचे नांव | स्थळ | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १५. | श्री. मधुकर लाडू पारधी | कांदिवली | ११.०६.२०२४ |
| १६. | श्री. पालजी सवा मारू | भाईंदर | ०१.०७.२०२२ |
| १७. | श्री. विजयसिंह पाटणकर | माटुंगा | ०३.०७.२०२४ |
| १८. | श्री. रमेश अनंत जेठे | दादर | ०२.०७.२०२४ |
| १९. | श्रीम. शोभा नंदकुमार राणे | दादर | ३०.०६.२०२४ |
| २०. | श्री. केशव लक्ष्मण घाटपांडे | मुलुंड | २४.०७.२०२४ |
| २१. | श्री. नरेंद्र नार्वेकर | बोरीवली | २८.०२.२०२४ |
| २२. | श्री. सतीश पुरुषोत्तम ताडफळे | मुलुंड | १७.०७.२०२४ |
| २३. | श्री. शांताराम शहाजी अहिरे | चेंबूर | २१.०७.२०२४ |
| २४. | श्री. अनिल काशिनाथ इनामदार | पुणे | ०७.०८.२०२४ |
| २५. | श्रीम.सुशिला रॉजर फुटर्याडो | वसई | ०९.०८.२०२४ |
| २६. | श्री. गिरधर मारू | दादर | ११.०८.२०२४ |
| २७. | श्रीम. जयश्री कर्णिक | कळवा | १७.०८.२०२४ |
| २८. | श्रीम. रेखा कृष्णा साबळे | कल्याण | २२.०८.२०२४ |
| २९. | श्रीम. मंगला सुरेश शिंदे | धारावी | ०२.०८.२०२४ |
| ३०. | श्री. दयाळ मंगा पुंगेरा | महालक्ष्मी | १३.०२.२०२१ |
| ३१. | श्री. नारायण धुरी | मुलुंड | २६.०८.२०२४ |
| ३२. | श्रीम. उदया नारायण धुरी | मुलुंड | - |
| ३३. | श्रीम. सुनिता गुरुनाथ पणदूरकर | वसई | १३.०९.२०२४ |
| ३४. | श्रीम. विद्या अनिल सराफ | मुलुंड | २६.०९.२०२४ |
| ३५. | श्री. सुरेश देवल | मुलुंड | १०.१०.२०२४ |
| ३६. | श्री. अजित हरिभाऊ कुलकर्णी | मुलुंड | १७.१०.२०२४ |
| ३७. | श्री. अनिल दत्तात्रय पटवर्धन | विलेपार्ले | ३०.०९.२०२४ |
| ३८. | श्रीम. सीमा रमेश चोरगे | दादर | ०९.०८.२०२४ |
| ३९. | श्रीम. अनघा रवींद्र अवधानी | डोंबिवली | २९.१०.२०२४ |
| ४०. | श्रीम. प्रमिला प्रभाकर कोलते | मुलुंड | २३.१०.२०२४ |
| ४१. | श्रीम. मीनल मदन परळीकर | मुलुंड | ०३.११.२०२४ |
| ४२. | श्री. दिवाकर परशुराम सोहनी | माहीम | ०४.११.२०२४ |
| ४३. | श्री. गणपती आनंद प्रभू | डोंबिवली | जून २०२४ |
| ४४. | श्री. सिताराम शंकर जंगम | ठाणे | ३०.०५.२०२४ |
| ४५. | श्री. मनमोहन घनश्याम दलाया | माटुंगा | १९.१०.२०२४ |
| ४६. | श्रीम. गिरीजा सदानंद दरेकर | डोंबिवली | २९.११.२०२४ |
| ४७. | श्रीम. विजया अमोल पाटील | वसई | ०७.१२.२०२४ |
| ४८. | श्रीम. माधवी मुकुंद शेंडे | गोरेगाव | १५.१२.२०२४ |
| ४९. | श्री. संजय रामचंद्र मराठे | ठाणे | १५.१२.२०२४ |

| अनु.क्र. | दिवंगत सभासदाचे नांव | स्थळ | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ५०. | श्रीम. सविता प्रकाश जोशी | सोलापूर | ०८.१२.२०२४ |
| ५१. | श्री. प्रकाश मांजरेकर | वडाळा | – |
| ५२. | श्री. जयराज घोलप | कुर्ला | – |
| ५३. | श्रीम. शुभदा प्रभाकर बेर्डे | ठाणे | २९.०१.२०२५ |
| ५४. | श्री. खोत दत्तू गोविंद | सांताक्रूझ | १९.०२.२०२५ |
| ५५. | श्रीम. नीलाक्षी जुवेकर | पुणे | – |
| ५६. | श्री. सुनील धर्माधिकारी | डोंबिवली | – |
| ५७. | श्रीम. भावे | डोंबिवली | – |

**।। सर्व दिवंगतांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली ।।**

## २८) लेखापरीक्षण :

१ एप्रिल, २०२३ पासून असोसिएशनचे लेखे परीरक्षीत करण्याच्या कामाचे संगणकीकरण करण्यात आले असून, सौ. मनाली गावड, दादर यांच्याकडे हे दायित्व सोपविण्यात आले आहे. या उपलब्धीबद्दल असोसिएशनच्या सनदी लेखा परीक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे. **श्री. दिलीप करंदीकर, श्री. हेमंत पटवर्धन,** यांनी सनदी लेखापाल व अंतर्गत हिशेब तपासनीस यांचेशी वारंवार संपर्क साधून, जमाखर्च, ताळेबंद, इत्यादी तयार करून घेऊन लेखापरीक्षण पूर्ण करून घेतले. त्याबद्दल त्यांचे संस्थेतर्फे विशेष अभिनंदन!

संस्था कार्यालय : **श्री. दिलीप करंदीकर,** हे कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असून **सौ. रागिणी गुरव व सौ. मनाली गावड** सर्व दिवस कार्यालयीन वेळेत उपस्थित असतात. **श्री. प्रकाश खर्डे,** हे सेवक म्हणून सर्व दिवस कार्यालयीन वेळेत हजर असतात.

## २९) आभार :

१. मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (सा.प्र), उपायुक्त (वित्त), प्रमुख लेखापाल (कोषागार व वित्त), उपप्रमुख लेखापाल (निवृत्ती वेतन कर्मचारी/प्रशासकीय सुधारणा) व त्यांचे खात्यातील सर्व कर्मचारी यांचे, निवृत्ती वेतन धारकांच्या विविध समस्या सोडवण्यास सहकार्य केल्याबद्दल.

२. सहाय्यक आयुक्त (जी/एन) व त्यांचे कर्मचारी यांचे, मासिक सभांसाठी सभागृह, इतर संलग्न सोयीसवलती, दूरध्वनी सेवा, इत्यादी उपलब्ध करून दिल्याबद्दल.

३. सहाय्यक आयुक्त (टी–विभाग, पी–दक्षिण विभाग, आर मध्य विभाग) यांचे, विभागीय सभांसाठी सभागृह उपलबद्ध करून दिल्याबद्दल.

४. सनदी लेखापाल व चार्टर्ड अकाऊंटंट श्री. निलेश म्हापसेकर व अंतर्गत हिशेब तपासनीस, श्री. प्रदीप कुलकर्णी यांचे सन २०२४–२०२५ चे लेखा परीक्षण केल्याबद्दल व वेळोवेळी उपयुक्त मार्गदर्शनाबद्दल.

५. दैनिक नवाकाळ, दैनिक सामना या वर्तमानपत्रांनी संस्थेच्या विविध वृत्तांना प्रसिद्धी दिल्याबद्दल.

६. दादर माटुंगा कल्चरल सेंटर, माटुंगा यांनी वार्षिक सभेसाठी त्यांचे सभागृह उपलब्ध केल्याबद्दल तसेच मयूर साऊंड सर्व्हिस यांचे, योग्य ती साधनसामग्री पुरवल्याबद्दल.

७. संस्थेस प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वेळोवेळी मदत करणारे कार्यकर्ते, हितचिंतक, देणगीदार व जाहिरातदार.

८. कवी कालिदास नाट्यमंदिर, मुलुंड, प्रबोधनकार ठाकरे सभागृह, बोरिवली, अण्णाभाऊ साठे सभागृह, भायखळा यांचे विभागीय सुवर्णमहोत्सवी सांगता सोहळा कार्यक्रमासाठी सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल.

**३०) श्रद्धांजली :**

अहवाल वर्षात दिवंगत झालेले **संस्थेचे माजी अध्यक्ष कै. विजयसिंह पाटणकर, मुलुंड विभागाचे संस्थापक कै. केशव घाटपांडे, तसेच पंडित संजय मराठे, कै माधवी शेंडे, कै. नाना सावंत, कै. श्रीम. विजया पाटील – कार्यकारीणी निमंत्रित सदस्या**, संस्थेस माहिती प्राप्त झालेले सर्व ५७ सभासद, प्रसिद्ध उद्योजक **कै. रतन टाटा** आणि दिवंगत झालेले सर्व ज्ञात/ अज्ञात सभासद, काश्मीरमध्ये पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात तसेच अहमदाबाद येथे विमान दुर्घटनेत मृत्यू पावलेले सर्व नागरिक, देशकार्यार्थ शहीद झालेले सर्व सैन्य दलातील रक्षणकर्ते, क्रीडा/ संगीत/ सामाजिक/ सांस्कृतिक/ राजकीय क्षेत्रातील दिवंगत झालेले **सर्व मान्यवर यांना बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| **डॉ. मारुती नलावडे** | **श्री. कमलाकर क्षीरसागर** |
| (कार्यवाह) | (अध्यक्ष) |

**कै. विजयसिंह पाटणकर, (माजी अध्यक्ष)**
**(पाटणकर कुटुंबियांतर्फे दि. २१.०७ २०२४ रोजी एस. एन. डी. टी. कॉलेज येथील आयोजित शोकसभेत श्रीम.पवार यांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन संस्थेतर्फे श्रद्धांजली अर्पण केली.)**



**कै. केशव घाटपांडे**
संस्थापक, मुलुंड विभाग



**कै. माधवी शेंडे**
**तळमळीच्या कार्यकर्त्या**



**कै. नाना गणपत सावंत**
**आयुष्याची शतकी वाटचाल**
**म्हसेवाडी, मु. पो. पाटणूस**
**ता. माणगाव, जिल्हा-रायगड**



**कै. विजया पाटील**
**कार्यकारिणी सदस्या**



# परिशिष्ट – अ

**बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या शनिवार दि.२१ सप्टेंबर, २०२४ रोजी, दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, माटुंगा (प) येथील सभागृहात, सकाळी ११:३० वाजता, संपन्न झालेला ५० व्या (सुवर्ण महोत्सवी) वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनची सुवर्ण महोत्सवी वर्षातील, ५०वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११:३०** वाजता दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, माटुंगा (प), मुंबई ४०००२८ येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सभेला सकाळी ११:३० वाजता **२२०** सभासद उपस्थित होते. १० मिनिटानंतर म्हणजे सकाळी ११:४० वाजता एकूण २५५ सभासदांच्या उपस्थितीत **मान. श्री. कमलाकर क्षीरसागर** यांचे अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली.

संस्थेचे कार्यवाह **डॉ. मारुती नलावडे** यांनी सर्वप्रथम सभेला उपस्थित असलेल्या सर्व सन्मा. सभासद, कार्यकारिणीचे पदाधिकारी व सदस्य/निमंत्रित सदस्य, मार्गदर्शक मंडळाचे सदस्य, या सर्वांचे स्वागत केले.

त्यानंतर दि. ०२ जुलै २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन पावलेले, संस्थेच्या अध्यक्षपदाची ८ वर्षे समर्थपणे जबाबदारी पार पाडलेले **मनपाचे निवृत्त अतिरिक्त आयुक्त, श्री. विजयसिंह पाटणकर** यांना, व ज्यांनी आपल्या घरातून पेन्शनर्स असोसिएशनच्या मुलुंड शाखेची मूहूर्तमेढ रोवली, असे अत्यंत नम्र, विनयशील, धडाडीचे व्यक्तिमत्त्व असलेले जे दिनांक २४ जुलै २०२४ रोजी निधन पावले, अशा **श्री. केशव घाटपांडे** यांना, तसेच अहवाल वर्षात दिवंगत झालेले सर्व सन्माननीय सभासद, देशकार्यात शहीद झालेले सर्व सैन्य दलातील रक्षणकर्ते, क्रीडा, संगीत, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, इ. क्षेत्रातील मान्यवर यांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर **डॉ. नलावडे** यांनी संस्थेचे सर्व पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य/निमंत्रित सदस्य, मार्गदर्शक मंडळाचे सदस्य यांची सभागृहास ओळख करून दिली.

त्यानंतर कार्यवाह **डॉ. मारुती नलावडे** यांनी आपले संक्षिप्त निवेदन केले. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

१) सन २०२३–२४ चा ५० वा वार्षिक अहवाल, लेखापरिक्षित जमाखर्च, ताळेबंद, अंदाजपत्रक इ. दस्तावेज सुमारे ६००० पेक्षा जास्त सभासदांना नियत वेळेपूर्वी त्यांच्या ई–मेल पत्त्यावर निर्गमित केला आहे.

२) त्याचप्रमाणे सदर संपूर्ण दस्तावेज संस्थेच्या www.bmpa.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच WhatsApp या समाज माध्यमावर देखील प्रसारित केला आहे.

३) वार्षिक अहवाल २०२३–२०२४ मध्ये काही दुरुस्त्या करणे आवश्यक असून, त्या दुरुस्त्या करून घेण्याचे आवाहन केले. त्या खालीलप्रमाणे.

| पृष्ठ क्र./ ओळ | चुकीचा शब्द/संख्या | आवश्यक दुरुस्ती |
|---|---|---|
| ७. पहिली ओळ | जीवनप्रमान | जीवनप्रमाण |
| १९. चौथी ओळ, शेवटचा शब्द | ७४६ | ४७६ |
| २४. वीसावी ओळ | तळले | तळेले |
| एकवीसावी ओळ | अनुजा | श्रीम.अनुजा |
| २६. सहावी ओळ | संस्थेचा | संस्थेची |
| बावीसावी ओळ | अनुजा | श्रीम. अनुजा |
| २९. एकोणवीसावी ओळ | ६४० | ६६८ |
| चोवीसावी ओळ | ८३० | ८५७ |
| सत्तावीसावी ओळ | ८७०६ | ८७३१ |
| एकोणतीसावी ओळ | ८७०६ | ८७३१ |
| ३८.तिसरी ओळ | व | 'व' खोडणे |
| ४६.पंधरावी ओळ | आस्थापानांच्या | आस्थापनांच्या |
| ४७.सातवी ओळ | मूळ लिखाण पहाणे (अनावश्यक शब्द) | त्याऐवजी 'अविरतपणे सुरू राहणे' |

४) असोसिएशनच्या सर्व शाखांमधील कार्यकारिणी सदस्यांनी/निमंत्रित सदस्यांनी/कार्यकर्त्यांनी जेवढ्या छापील अहवाल प्रतींची मागणी केली, त्यापेक्षा + ५० प्रती संबंधित विभागातील सभासदांना वितरीत करण्यासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. (एकूण २२३० प्रती).

५) आज वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवशीही, ज्या उपस्थित सभासदांकडे अहवालाच्या प्रती नाहीत, त्या सर्वांना उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

६) वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस 'नवाकाळ' या दैनिक वर्तमानपत्रात दि.०४ सप्टेंबर, २०२४ रोजी (पृष्ठ क्र.७) व 'सामना' या दैनिक वर्तमानपत्रात दि.०५ सप्टेंबर, २०२४ रोजी (पृष्ठ क्र. ६) प्रसिद्ध करण्यात आली आहे.

७) या वर्षी अहवालाची कांही वैशिष्ट्ये म्हणजे, मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे (दि. ०७. ऑक्टोबर,२०२३) जोडलेले इतिवृत्त, मराठीत सादर केलेला जमा खर्चाचा तपशील व अंदाजपत्रक, ८० + वरील निवृत्तांना होणाऱ्या संभाव्य निवृत्त वाढीचा तपशील, महागाई भत्ता वाढ तक्ता, इ. दिलेली माहिती होय.

८) दि.१८ डिसेंबर, २०२४ रोजी होणाऱ्या विद्यार्थी गुणगौरव व पारितोषिक वितरणासाठी संबंधित सभासदांनी त्यांच्या पाल्यांचे प्रस्ताव संस्था कार्यालयात परीक्षेतील उत्तीर्ण निकालपत्रासह अवश्य पाठवावेत.

उपरोक्त निवेदनानंतर डॉ. नलावडे, कार्यवाह यांनी कार्यक्रम पत्रिकेनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात केली. सदर सभेचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे.

**विषय क्र.१ : मागील (४९ व्या) वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (मागील वर्षी, वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार, दि. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी आयोजित केली होती.)**

सदर विषयी कार्यवाह **डॉ. नलावडे** यांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले.

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने संस्थेने एक चांगला पायंडा पाडला असून शनिवार दि. ०७ ऑक्टोबर, २०२३ च्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सर्व सभासदांना या वर्षीच्या ५० व्या वार्षिक अहवाला सोबतच परिशिष्ट-अ मध्ये (पृष्ठ क्र.३९ ते ४८) उपलब्ध केले आहे.

त्यामुळे सभासदांना घेतलेल्या निर्णयाची सविस्तर माहिती तर होईलच, परंतु इतिवृत्त वाचनात जाणारा बराचसा वेळही वाचेल.

तरीही डॉ. नलावडे यांनी सभेसमोर मागील ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वृत्ताचा सारांशरूपाने संक्षिप्त आढावा घेतला, तो खालीलप्रमाणे.

* सर्वसाधारण सभासदांना सहज आकलन व्हावे म्हणून, जमाखर्च व अंदाजपत्रक मराठी भाषेतही उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी सभासदांनी मागील वार्षिक सभेवेळी केलेली होती. त्यामुळे मान. अध्यक्षांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली असून ते मराठी भाषेतही देण्यात आलेले आहे.
* सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वैद्यकीय सहाय्य योजनेच्या रकमेत वाढ करण्याचा मानस मान. अध्यक्षांनी व्यक्त केलेला होता. त्याची पूर्तता करण्यात आली असून वैद्यकीय सहाय्य योजनेच्या कमाल रकमेत रु.४०,०००/- वरुन रु.५०,०००/- इतकी वाढ करण्यात आलेली असून एकूण रु.१०,०००/- वाढ करण्यात आलेली आहे.
* सभासदांच्या लेखी विनंतीनुसार सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार कार्यकारिणीला देण्यात आलेला असून, खालील अटीसापेक्ष सभासदत्व रद्द करण्यात येईल.
  १) सभासदांनी वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ घेतलेला असू नये.
  २) सभासदत्व रद्द करण्याचा अर्ज सादर केलेल्या दिनांकापर्यंतची संस्थेने वसूल केलेली वार्षिक/ वैद्यकीय वर्गणी परत दिली जाणार नाही.
* सभासदांनी सभासदत्व स्विकारताना वैद्यकीय योजनेची वर्गणी वसूल करू नये, असे नमूद केले असल्यास परंतु नजरचुकीने वैद्यकीय योजनेची वर्गणी वसूल केली असल्यास आणि सभासदांनी वैद्यकीय मदत घेतली नसल्यास व सदस्यांनी तसा लेखी अर्ज केल्यास, वसूल केलेली वैद्यकीय योजनेची वर्गणी संबंधित सभासदांस परत करण्यात येईल.
* वैद्यकीय योजनेचा अर्ज नामंजूर झाल्यास व सभासदाने कागदपत्रांची लेखी मागणी केल्यास, सदर कागदपत्रे संबंधित सभासदास नामंजूरीच्या कारणांसह परत करण्यात येतील.
* यानंतर सभेच्या शेवटी मान.अध्यक्षांचे उदबोधनपर, अतिशय उपयुक्त व संस्थेची वाढ, विकास याविषयीचे मार्गदर्शन झाले. त्याचा सविस्तर उहापोह इतिवृत्तांत केलेला आहेच.
* त्यानंतर श्रीम. पवार, संयुक्त कार्यवाह यांनी सर्वांचे आभार मानून राष्ट्रगीतानंतर सभेची सांगता झाली.

वरीलप्रमाणे मागील वार्षिक सभेच्या इतिवृत्ताचा आढावा **डॉ. नलावडे**, कार्यवाह यांनी घेतल्यानंतर सदर इतिवृत्तावर आजच्या सभेत सविस्तर चर्चा झाली, ती खालीलप्रमाणे.

**श्री.काशीनाथ पाटील**, (स.क्र.१६१७४) कर्मचारी संकेतांक : २९२८९१५ यांनी आक्षेप घेतला की, जागा खरेदी संदर्भात माझा विरोध कुठेही नोंदवलेला दिसत नाही. मान. अध्यक्षांनी स्पष्ट केले की, जागा खरेदी करण्यासंदर्भात सभासदांची मते जाणून घेणे, एवढाच उद्देश होता. अंतिम निर्णय सर्वांना विश्वासात घेऊनच घेण्यात येईल.

कार्यवाहांनी स्पष्ट केले की, केवळ विरोधासाठी विरोध करणे, ही मानसिकता न ठेवता सर्वांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे, संस्थेच्या हिताचे आहे. जागा घेण्यास आमचा विरोध नसून, **ती दादर परिसरातच असावी**, असे मत श्री.काशिनाथ पाटील यांनी व्यक्त केले.

ठराव मांडताना कार्यकारिणीचे सदस्य सूचक व अनुमोदक म्हणून राहू शकतात का? असा प्रश्न **श्री. प्रकाश सातवे (स.क्र. २०३११)** यांनी उपस्थित केला.

वार्षिक अहवाल कार्यकारिणीने मंजूर केलेला असल्याने कार्यकारिणी सदस्यांनी सूचक व अनुमोदक असू नये, असे कार्यवाहांनी स्पष्ट केले. सदर बाब यापुढे नक्कीच लक्षात घेतली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

सविस्तर चर्चेअंती पुढील ठराव मांडण्यात आला.

**ठराव क्र.१ : ठरविण्यात येते की, ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा झालेली असून दि.०७ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास कोणत्याही दुरुस्त्यांशिवाय सर्वांनुमते मंजूरी देण्यात यावी.**

**ठराव क्र.१ सर्वांनुमते मंजूर**

सूचक :- श्री. प्रकाश सातवे (स.क्र. २०३११)

अनुमोदक :- श्री.देवीदास बधान (स.क्र. १७८११)

**विषय क्र.२ : ५० वा वार्षिक अहवाल, लेखापरिक्षित जमाखर्च, ताळेबंद वाचून (१ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च, २०२४) मंजूर करणे.**

संस्थेचे खजिनदार श्री. पटवर्धन यांनी सन २०२३-२४ चा लेखापरीक्षित जमाखर्च, ताळेबंद सभागृहासमोर सादर केला. याविषयी झालेली सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे.

१) श्री. प्रकाश सातवे (स.क्र. २०३११) यांनी प्रश्न उपस्थित केला की, दि.३१ मार्च २०२४ रोजी बचत खात्यात रु.१०,८६,३३५.९० (दहा लाख शहाऐंशी हजार तीनशे पस्तीस पैसे नव्वद फक्त) इतकी रक्कम दिसत आहे. एवढी मोठी रक्कम बचत खात्यात ठेवणे बरोबर नाही, ती मुदत ठेवीत गुंतवणे गरजेचे आहे.

२) दि. ३१ मार्च, २०२४ अखेर रु.४,००,३८,९२१.०० (चार कोटी अडोतीस हजार नऊशे एकवीस फक्त) इतकी रक्कम सारस्वत बँक, म्युनिसिपल बँकेत ठेवलेली आहे, ही लक्षणीय बाब असून त्यासाठी कार्यकारिणीचे अभिनंदन करावेच लागेल, असेही मत श्री. प्रकाश सातवे यांनी व्यक्त केले.

याविषयी श्री. पटवर्धन खजिनदार यांनी स्पष्टीकरण दिले की, नजिकच्या भविष्यातील खर्चाचा आढावा घेऊन बचत खात्यात रक्कम ठेवण्यात येते व उर्वरीत रक्कम गरजेनुसार कमी कालावधीसाठी / मुदत ठेवीत ठेवण्यात येते. वैद्यकीय सहाय्य निधी, दैनंदिन खर्च, सुवर्ण महोत्सव खर्च, आयकर, टीडीएस, इ.साठी रक्कम बचत खात्यात ठेवावी लागली.

तरीही मान.अध्यक्षांनी स्पष्ट केले की, श्री. प्रकाश सातवे यांचा आक्षेप बरोबर असून सदर बाब पुढील वर्षी कटाक्षाने टाळली जाईल. संबंधित सभासदाच्या शंकेचे समाधान झाले असल्याने सन २०२३-२४ चा जमाखर्च, ताळेबंद मंजूर करण्यात आला. त्याविषयीचा ठराव पुढीलप्रमाणे.

**ठराव क्र.२ : ठरविण्यात येते की, ५० वा वार्षिक अहवाल, सन २०२३–२४ चा लेखापरिक्षित जमाखर्च व ताळेबंद सर्वांनुमते मंजूर करण्यात यावा. तसेच सन २०२३–२४ या वर्षातील एकूण उत्पन्न रु.३५,४५,४९२/– (रु. पस्तीस लाख पंचेचाळीस हजार चारशे ब्याण्णव फक्त) असून एकूण खर्च रु.२३,२२,०७५/– (रु. तेवीस लाख बावीस हजार पंच्याहत्तर फक्त) इतका झाला असून शिल्लक रक्कम रु.१२,२३,४१७/– (बारा लाख तेवीस हजार चारशे सतरा फक्त) इतकी सन २०२४–२५ या आर्थिक वर्षातील उत्पन्नात वर्ग करण्यास मान्यता देण्यात यावी.**

**ठराव क्र.२ सर्वांनुमते मंजूर**

| | |
|---|---|
| सूचक :– श्री. जयवंत गुरव | अनुमोदक:– श्री. शशिकांत लाखन |
| (स.क्र. २००८९) | (स.क्र. १४९६४) |

**विषय क्र.३ : सन २०२४–२५ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रक मंजूर करणे.**

सन २०२४–२५ या आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक श्री. पटवर्धन, खजिनदार यांनी सादर केले.

अंदाजपत्रकात इमारत निधी म्हणून रु.१०,००,०००/– (रु. दहा लाख फक्त) इतका खर्च दाखवण्यात आलेला आहे. त्याबद्दल काही सभासदांनी प्रश्न उपस्थित केला.

५० वर्षे होऊनही अद्याप संस्थेचे कामकाज महानगरपालिकेच्या जी/उत्तर विभागातील एका छोटयाशा जागेतून करण्यात येत आहे. संस्थेच्या कामकाजाची कार्यकक्षा रुंदावलेली असून सभासद संख्येतही सातत्याने वाढ होत आहे. सभासदांची वाढलेली वर्दळ, कार्यकारिणी / पदाधिकारी मंडळाच्या बैठका, संस्थेचे फर्निचर व दस्तावेज, कार्यालयीन कर्मचारी बैठक व्यवस्था, इ. साठी सध्याची महानगरपालिकेची जागा (खो. क्र. ०९) अत्यंत लहान असून ती अपुरी पडत आहे. शिवाय जागा खाली करण्याची महानगरपालिकेची टांगती तलवार आहेच. या सर्व बाबींचा विचार करून संस्थेची स्वतःच्या मालकीची जागा असावी, अशी अपेक्षा मार्गदर्शक मंडळ, कार्यकारिणी व अन्य अनेक सभासदांनी वारंवार व्यक्त केलेली आहे. याचा विचार करून जागेसाठी प्राथमिक स्वरूपात अंदाजपत्रकात रु.१०,००,०००/– (रु. दहा लाख फक्त) इतक्या रकमेच्या खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे. असे स्पष्टीकरण खजिनदार, कार्यवाह, अध्यक्ष यांनी दिले.

यानंतर सविस्तर चर्चेअंती सन २०२४–२५ च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. त्याविषयीचा ठराव पुढीलप्रमाणे.

**ठराव क्र.३ : ठरविण्यात येते की, सन २०२४–२५ च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येत असून अंदाजित जमा रक्कम रु.१,३८,२६,३३५.३९/– (रु. एक कोटी अडोतीस लाख सव्वीस हजार तीनशे पस्तीस पैसे एकोणचाळीस फक्त) व अंदाजित खर्च रक्कम रु.१,३६,९१,०००.०० (एक कोटी छत्तीस लाख एक्क्याण्णव हजार फक्त) व शिल्लक रक्कम रु.१,३५,३३५.३९/– (एक लाख पस्तीस हजार तिनशे पस्तीस पैसे एकोणचाळीस फक्त) यासही मान्यता देण्यात यावी.**

**ठराव क्र. ३ सर्वानुमते मंजूर**

| | |
|---|---|
| सूचक :– श्री. मधुकर आंबोणकर | अनुमोदक:– श्री. काशिनाथ पाटील |
| (स.क्र. २३५१२) | (स.क्र.१६१७४) |

**विषय क्र. ४ : सन २०२४-२५ या वर्षासाठी मानद अंतर्गत हिशोब तपासनीसाची निवड करणे.**

**श्री. प्रदीप मोरेश्वर कुलकर्णी,** निवृत्त उपप्रमुख लेखापाल, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि.१८.०९.२०२४ रोजी संस्थेला एक पत्र दिलेले असून सन २०२४-२५ या वर्षासाठी संस्थेचे अंतर्गत हिशोब तपासनीस म्हणून काम करण्यास संमती दिलेली आहे. त्यास अनुसरून पुढील ठराव करण्यात आला.

**ठराव क्र.४ : ठरविण्यात येते की, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मानद अंतर्गत हिशोब तपासनीस म्हणून श्री. प्रदीप मोरेश्वर कुलकर्णी, निवृत्त उपप्रमुख लेखापाल, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची निवड करण्यात यावी व त्यांना नियमानुसार योग्य ते मानधन अदा करण्यात यावे.**

**ठराव क्र.०४ सर्वानुमते मंजूर**

| | |
|---|---|
| सूचक :- श्रीम. नीता मांजरेकर | अनुमोदक :- श्री अनंत केळकर |
| (स.क्र. २३६२५) | (स.क्र. ५७८८) |

**विषय क्रमांक ५ :- सन २०२४-२५ चे हिशोब तपासण्यासाठी सनदी लेखापाल यांची नेमणूक करणे.**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे हिशोब तपासण्यासाठी श्री. निलेश म्हापसेकर, सनदी लेखापाल यांनी त्यांच्या दि.१९.०९.२४ च्या पत्रानुसार संमती दिलेली असल्याने त्यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात आली. त्याविषयीचा ठराव पुढीलप्रमाणे.

**ठराव क्र. ५ : ठरविण्यात येते की, सन २०२४-२५ चे हिशोब तपासण्यासाठी श्री. निलेश म्हापसेकर, सनदी लेखापाल यांची पुनर्नियुक्ती करण्यात यावी तसेच या कामासाठी त्यांना एकूण रु.२४,४००/- (रु. चौवीस हजार चारशे फक्त) इतकी रक्कम मानधन म्हणून अदा करण्यात यावी.**

**ठराव क्र.५ सर्वानुमते मंजूर**

| | |
|---|---|
| सूचक :- श्री. मिलिंद खोले | अनुमोदक:- श्री. शरद कुवेसकर |
| (स.क्र. २३४४६) | (स.क्र. २४३२५) |

**विषय क्र. ६ : मान. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेणे.**

**६.१ : वैद्यकीय सहाय्य निधी योजनेतून डोळ्यांवरील शस्त्रक्रियेसाठी रु.१०,०००/- इतकी मदत मंजूर करणे.**

**श्री. अनंत केळकर** (स.क्र. ५७८८) यांनी प्रश्न उपस्थित केला की, एका डोळ्याच्या शस्त्रक्रियेसाठी अधिकतम रु.१०,०००/- इतकी वैद्यकीय मदत सभासदांना देण्यात येत आहे.

परंतु या योजनेतून आर्थिक मदत मिळण्यासाठी किमान वैद्यकीय खर्च रु.४०,०००/-इतका होणे अनिवार्य आहे. ज्या सभासदांनी रु.४०,०००/- इतका खर्च केला आहे, त्यांना त्या रकमेच्या २०%

म्हणजे फक्त रु.८,०००/- इतकीच रक्कम सध्या मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे किमान रु.४०,०००/- इतका खर्च एका डोळ्यासाठी झाला असल्यास सभासदांना रु.८,०००/- ऐवजी रु.१०,०००/- इतकी वैद्यकीय मदत मंजूर करणे अत्यावश्यक आहे.

श्री. केळकर यांच्या प्रस्तावावर खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा होऊन त्यांचा प्रस्ताव सर्वांनुमते मंजूर करण्यात आला. तो पुढीलप्रमाणे.

**ठराव क्र.६.१: ठरविण्यात येते की, एका डोळ्याच्या शस्त्रक्रियेसाठी किमान रु. ४०,०००/- (रु. चाळीस हजार फक्त) इतका खर्च झालेला असल्यास वैद्यकीय सहाय्य योजनेतून सभासदांस त्याच्या २०% म्हणजे रु.८,०००/- (रु. आठ हजार फक्त) ऐवजी रु.१०,०००/- (रु.दहा हजार फक्त) इतकी वैद्यकीय मदत देण्याचे दि.२१ सप्टेंबर, २०२४ पासून मान्य करण्यात यावे. तसेच ही अतिरिक्त मदत नसून ती एकूण अधिकतम रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार फक्त) इतक्या मर्यादेच्या अंतर्गत आहे, यासही मान्यता देण्यात यावी.**

**ठराव क्र. ६.१ सर्वांनुमते मंजूर**

| | |
|---|---|
| सूचक :- श्री. अनंत केळकर | अनुमोदक :- श्री. सुहास खामकर |
| (स.क्र. ५७८८) | (स.क्र. २३५११) |

कार्यक्रम पत्रिकेतील विषय संपल्यानंतर **डॉ. नलावडे**, कार्यवाह यांनी आवाहन केले की, कोणाचे कांही प्रश्न , शंका समस्या असल्यास त्या नि:संकोचपणे विचारू शकता. त्यानुसार उपस्थित सभासदांनी विचारलेले प्रश्न पुढीलप्रमाणे.

- ❊ श्री. काशिनाथ पाटील, (स.क्र.१६१७४) व श्री. प्रकाश सातवे, (स. क्र.२०३११) यांनी अपेक्षा व्यक्त केली की, वार्षिक स्नेहसंमेलनाचा निधी रु.३०,०००/- देण्यात येतो, तो वाढविण्यात यावा.
- ❊ श्री. भूषण गावडे, (स. क्र. १५८२४) यांनी विधायक सूचना केली की, संस्थेने सामाजिक कार्यासाठी एखादी योजना सुरू केल्यास योग्य राहील.
- ❊ अनेक सभासदांनी भावना व्यक्त केल्या की, कुटुंब निवृत्ती वेतनाचे दावे मंजूर होण्यासाठी फारच विलंब लावण्यात येतो, त्यासाठी ठोस उपाय योजावेत, इ.

कार्यवाह **डॉ. नलावडे** यांनी निवेदन केले की, वरील सर्व प्रश्नांसहीत अन्य इतर बाबींवर समाधानकारक उत्तरे मान. अध्यक्षांच्या अध्यक्षीय मनोगतांतून नक्कीच मिळतील.

संस्थेतर्फे कार्यान्वीत असलेल्या वैद्यकीय मदत निधी योजनेविषयी कांही सभासदांनी कांही वाजवी अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. (उदा. मदत निधीत वाढ करणे, नियमांत सूट देणे. इ.)

याविषयी कार्यवाह **डॉ. नलावडे** यांनी पुढील स्पष्टीकरण दिले.

- ❊ वैद्यकीय मदत निधीची मर्यादा रु.४०,०००/- वरून रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) इतकी नुकतीच सुवर्ण महोत्सवी शुभारंभ समारंभाचे निमित्ताने दि.१३ जानेवारी, २०२४ पासून वाढवण्यात आलेली नाही. त्यात आता लगेचच तरी वाढ करणे संस्थेला शक्य नाही.
- ❊ संस्थेतर्फे चालवली जाणारी ही योजना कोणत्याही प्रकारची आरोग्य विमा योजना नसून, जे सभासद आर्थिकदृष्टया निम्न स्तरातील आहेत, त्यांना संकटसमयी मोठ्या भावाने लहान

भावाला/बहिणीला दिलेला हा मदतीचा हात आहे. ही कोणतीही सरकारी लाडकी बहीण / भाऊ योजना नाही, याची कृपया सभासदांनी नोंद घ्यावी व शक्यतो ज्यांची आर्थिक परिस्थिती खरोखरच बिकट आहे, त्यांनीच या योजनेचा लाभ घ्यावा. हा नियम नाही, आवाहनवजा विनंती आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

* सुवर्ण महोत्सवी वर्षातील ५० व्या सर्वसाधारण सभेला तुम्ही, आम्ही या वातानुकूलीत सभागृहात हजर आहोत, हे आपले भाग्य आहे. आपण नशीबवान आहोत. आपल्या सर्वांचे संस्थेतर्फे हार्दिक आभार. यापुढचे आपले आयुष्य सुखाचे, समाधानाचे, आनंदाचे, चांगल्या आरोग्याचे जावो, ही संस्थेतर्फे ईश्वरचरणी प्रार्थना.

कार्यवाह **डॉ. नलावडे** यांच्या वरील आवाहनानंतर मान. **अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर** यांनी ओघवत्या शैलीत आपले दमदार, खुमासदार व रंगतदार मनोगत व्यक्त केले. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे.

## अध्यक्षीय मनोगत

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या, सुवर्ण महोत्सवी वर्षात, संपन्न होत असलेल्या, ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या, सर्व भाग्यवान, मान्यवर सभासदांचे मन:पूर्वक स्वागत करताना मला आनंद होत आहे. एखाद्या सांस्कृतिक सभागृहात, विशेष करून वातानुकुलीत सभागृहात, अशी सभा प्रथमतःच संपन्न होत आहे.

या सभेत बोलताना माझ्या मनात, ज्यांनी ही संस्था स्थापन केली, वृद्धींगत केली, अशा सर्वांच्याबद्दल कृतज्ञतेची भावना आहे. एका छोट्याशा जागेत केवळ २० सेवानिवृत्त मंडळींनी स्थापन केलेल्या संस्थेची आजची सभासद संख्या २५००० इतकी आहे.

अशी संस्था, असे कार्य , हे ईश्वरी / परमेश्वरी संकल्पाने अस्तित्वात येते, अशी मान्यता आहे, असा विश्वास आहे. वस्तुत: महानगरपालिका स्थापनेस शंभराहून अधिक वर्षे झाली असली तरी, बॉम्बे म्युनिसिपल पेन्शनर्स असोसिएशन १९७४ साली म्हणजे ५० वर्षांपूर्वी स्थापन झाली.

संस्था स्थापनेचे बीज, सेवानिवृत्त झालेल्या, कामगार, कर्मचारी इत्यादीना, निवृत्तीवेतनादी फायदे मिळण्यात येत असलेल्या समस्या, त्रास यातून दिलासा देण्याची प्रेरणा, संवेदनशीलता, सेवाभाव असलेल्यांच्या मनी निर्माण होण्यात आहे.

संस्था स्थापन करणे, संघटना उभी करणे, कार्याला दिशा देणे, वेळोवेळी निर्माण होणाऱ्या अडचणीना सामोरे जात त्यातून मार्ग काढणे, हे अवघड असते. अपमान, शिव्या-शाप स्वीकारत, निष्ठेने, सातत्याने संस्था कार्य पुढे नेणे सोपे नसते. **नाव छापले नाही – ठीक आहे, फोटो छापला नाही – हरकत नाही, उल्लेख सुद्धा केला नाही – चालेल, पण कार्य असे करीन की नांव आपोआप प्राप्त होईल,** या पद्धतीने संघटना कार्य केलेल्या सर्वांचे, आज स्मरण करणे आवश्यक आहे / अगत्याचे आहे. त्यांच्याबद्दल, मी कृतज्ञता व्यक्त करतो.

त्यांच्यामुळे आपण सगळे, आज इथे आहोत याची जाणीव प्रगट करत, त्यांच्या कार्याला, सेवेला, त्यागाला, समर्पणवृत्तीला त्रिवार वंदन करतो.

**ब)** संस्थाकार्याचा आढावा,अहवाल स्वरूपात आपल्या समोर आहे. आज सभेत तसेच काही अन्य माध्यमातून काही मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत, ज्याबाबत उपयुक्त माहिती मिळावी अशी अपेक्षा व्यक्त झाली आहे.

१) मार्च २०२४ मध्ये सुमारे २२५०० निवृत्तीवेतन धारकांना केवळ एक रुपया एवढेच निवृत्तीवेतन दिल्याचे स्पष्ट झाल्यावर खूप अस्वस्थता निर्माण झाली होती. आधार कार्डला पॅन जोडला न गेल्यामुळे, आयकर विभागाच्या आदेशान्वये, ही कारवाई केली गेली. आधार कार्डला पॅन जोडणे व नंतर Income Tax Return भरून त्याद्वारे परतावा घेणे, ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक होते. याप्रसंगी असोसिएशनने, संबंधित निवृत्तीवेतनधारकांना धीर देणे, उचित मार्गदर्शन करण्याचे काम केले. आपले उत्पन्न रुपये ७ लाख मर्यादेत असल्याने, Income Tax Return भरण्याची आवश्यकता नाही, असे गैरसमज पसरले होते. आपल्या संस्थेने पुढाकार घेऊन, तज्ञ सनदी लेखापरिक्षकांचे मार्गदर्शनपर कार्यक्रम डोंबिवली तसेच ठाणे येथे आयोजित केले, निवृत्तीवेतन धारकांच्या मनातील गैरसमज दूर केले, शंका निरसन केले व सार स्वरुपात मार्गदर्शन , तज्ञ सल्ला, संबंधितापर्यंत पोहोचविला. आजमितीला, ज्यांनी Income Tax Return सादर केला त्यापैकी अनेक निवृत्तीवेतनधारकांना परतावा मिळाला आहे. आयकर खात्याकडे उपलब्ध होणारी माहिती (AS - 26), त्यांच्या कार्यपद्धतीत झालेले बदल, इत्यादी बाबींची नोंद घेऊन, ज्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५ लाखाच्या मर्यादेपुढे जात असेल, अशा प्रत्येकाने प्रतिवर्षी Income Tax Return न विसरता भरणे हितकारक आहे.

२) एप्रिल २०२४ मध्ये काही हजार निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतन मिळाले नाही. कारण Online / Offline पद्धतीने हयातीच्या दाखल्याद्वारे सादर झालेली माहिती व कार्यालयातील डेटा मधील माहिती यामध्ये विसंगती दिसून आली. जीवन प्रमाण ही संगणकीय प्रणाली केंद्र सरकारची आहे. या प्रणालीतून Life Certificate सादर केल्यावर संदेश प्राप्त होतो. गतवर्षी या प्रणालीतून तयार झालेले Life Certificate महानगरपालिकेच्या संगणकीय प्रणालीने स्वीकारल्यावर, तदनुसार, ७२ तासांच्या कालावधीत महानगरपालिका प्रशासनाने ई-मेल द्वारे संबंधित निवृत्तीवेतन धारकास कळविले. मात्र अनेकांनी याकडे गांभिर्याने पाहिले नाही. ज्या प्रकरणी माहितीमध्ये विसंगती दिसून आली आहे, त्या प्रकरणी संबंधित निवृत्तीवेतन धारकाने Pension IB विभागाशी संपर्क साधून, महानगरपालिकेच्या कार्यालयातील डेटामधील माहिती अद्ययावत करून घेणे इष्ट ठरेल, जेणेकरुन भविष्यात अशा प्रसंगांची पुनरावृत्ती होणार नाही. Life Certificate विषयी सावधानता, सतर्कता बाळगणे आवश्यक आहे.

३) Commutation of Pension बाबत उच्च न्यायालयाने दिलेले आदेश, संबंधित पक्षकारावर बंधनकारक असतात. Pension Restoration चा कालावधी १२ वर्षावर सिमित करण्याबाबत केंद्र / राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेतल्यावर महानगरपालिका प्रशासन धोरण बदल करू शकेल. या प्रकरणी फेडरेशन स्तरावर सुद्धा प्रयत्न सुरू आहेत. कोर्टाची पायरी चढणे सोपे नसते व प्रयास सुरू असल्यामुळे त्याची सध्या आवश्यकता नाही.

४) Q.R Code आधारीत ओळखपत्रे मिळण्यासाठी फोटो काढणे, माहिती संकलित करण्या कामी असोसिएशनच्या योगदानाची दखल प्रशासनाने घेतली आहे. प्रत्यक्ष ओळखपत्र लवकरात लवकर निवृत्तीवेतन धारकास मिळावे, यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

५) गेले २ / ३ महिने निवृत्तीवेतन मिळण्यास विलंब झाला आहे. परंतु याबाबत Whats App वर प्रसारित होणारे संदेश अकारण भ्रम निर्माण करतात व प्रशासनाविरूद्ध असंतोष निर्माण होण्यासाठी असतात, असे निरीक्षण आहे. महानगरपालिका प्रशासनाकडून निवृत्तीवेतनापोटी बँकेस देय असणारी रक्कम विहित मुदतीत देण्यात येते. झालेला विलंब संगणकीय प्रणालीतील

तांत्रिक अडचणीमुळे झाला असून, या प्रत्येक प्रसंगी निवृत्तीवेतन विभागातील उच्च अधिकारी बँकेच्या तसेच असोसिएशनच्या संपर्कात होते. हल्ली अनेक बँकाकडून निवृत्तीवेतन, संबंधित निवृत्तीवेतन धारकाच्या खात्यात जमा झाल्याचे संदेश प्राप्त होत नाहीत व त्यामुळे निवृत्तीवेतन धारकांच्या मनामध्ये भीती, अस्वस्थता निर्माण होत असते, असे अनुभवास येते. बँकेकडून संदेश न आल्यास प्रत्यक्ष बँकेत जाऊन खातरजमा करणे उचित होय. उगाच धावाधाव, फोनाफोनी करू नये. यासाठी चांगला उपाय म्हणजे संबंधित बँकेकडून Net Banking सुविधा मिळविणे व घरबसल्या माहिती घेणे. Whats App वर प्रसारित होणाऱ्या संदेशावर विसंबून स्वत:चे व इतरांचे स्वास्थ बिघडू देऊ नये. या संदेशावर विश्वास ठेवण्यापेक्षा आपल्या यंत्रणा, असोसिएशन कार्यकर्ते यावर विश्वास ठेवणे उचित होय.

६) महानगरपालिकेच्या मुदत ठेवी (Investment in Fixed Deposit) बाबत सुद्धा Whats App वर प्रसारीत होणाऱ्या संदेशावर विसंबून स्वत:चे व इतरांचे मानसिक स्वास्थ बिघडू देऊ नये. महसूली खर्च (Revenue Expenditure) व भांडवली खर्च (Capital Expenditure) असे खर्चाचे प्रकार असून भांडवली खर्चातून भविष्यात महसूल निर्माण होणे अपेक्षित असते. याबाबत उचित निर्णय घेण्याचा अधिकार महानगरपालिका सभागृहाचा असतो. वैधानिक प्राधिकरण व प्रशासन हे धोरणात्मक निर्णय घेणे, त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम असतात, उत्तरदायी असतात, याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

७) नवीन संरचनेप्रमाणे महानगरपालिका प्रशासनात जवळपास ७० विविध खाती आहेत. संबंधित खात्यातील आस्थापना विभाग, निवृत्तीवेतन, कुटुंब निवृत्तीवेतन दावे, पूरक दावे, वार्षिक वेतन वाढ (Increment) इत्यादी तयार करणे, सेवा अभिलेख परिरत करणे अशी कामे मूलत: करतात. सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजूरीनंतर प्रत्यक्ष अधिदान, लेखापरिक्षणाचे दायित्व लेखा खात्याचे असते. निवृत्तीवेतन धारक स्वत:च्या खात्याविषयी, आस्थापना विभागातील संबंधित कर्मचारी, निवृत्तीवेतन धारकाप्रती असंवेदनशील झाल्यामुळे, प्रामुख्याने प्रकरणे प्रलंबित रहातात व संबंधित खातेप्रमुख, विलंबास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांना जाब विचारत नाहीत, हेतुत: विलंब प्रकरणी दंडात्मक ठोस कारवाई करत नाहीत, असा सार्वत्रिक अनुभव आहे. उप आयुक्त (सा.प्र.) यांनी सूचित करून सुद्धा किमान भेटीसाठी वेळ देण्याचे सौजन्य पाळत नाहीत, असा अनुभव आहे. अन्यायग्रस्त सेवानिवृत्त देखील या ना त्या प्रकारे प्रकरण मार्गी लागावे यासाठी प्रयत्नशील असतात. या वस्तुस्थितीमुळे प्रकरणे प्रलंबित रहातात व विलंबास जबाबदार कर्मचारी / अधिकारी यांचेवर धाक राहिलेला नाही, असे अनुभवास येते.

८) सर्व सेवानिवृत्त कामगार / कर्मचारी यांनी प्रयत्नपूर्वक स्वत:च्या सेवाभिलेखाची प्रत, तसेच निवृत्तीवेतन दाव्याची प्रत, संबंधित आस्थापना विभागाकडून प्राप्त करून घेणे त्यांच्या व कुटुंबाच्या हिताचे आहे. याबाबत प्रशासनाने यापूर्वीच परिपत्रक निर्गमित करून संबंधितास स्पष्ट आदेश दिले आहेत. **उपरोक्त दस्तऐवज हे A Class Record सदरात येत असूनसुद्धा अनेकदा ते हरविले आहे, सापडत नाही असे सर्रासपणे, निर्ढावलेपणाने सांगितले जाते,** असा अनुभव अनेकांनी घेतला आहे, हे स्मरणात ठेवावे.

९) कुटुंबनिवृत्ती वेतनदावा मंजूरीस किमान ८ / १० महिन्यांचा कालावधी लावला जातो. या संबंधित कार्यपद्धतीत सुधारणा करावी, यासाठी आपली असोसिएशन सन २०२० पासून प्रयत्नशील आहे. **सॅप संगणकीय प्रणालीमध्ये १.११.२०१९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या मंडळींच्या**

**Family Penion Claimant ची माहिती अपडेट करण्यासाठी परिपत्रक निघाले,** परंतु वेबपेज तयार करण्याचे काम रेंगाळत ठेवले आहे, ही वस्तुस्थिती आहे. आपले प्रयत्न, पाठपुरावा चिकाटीने सुरू आहेत. प्रशासकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याचे अनुभवास येते.

१०) **बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवृत्तीवेतन धारकांना, ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीपोटी काहीही रक्कम देय राहिलेली नाही. एकूण थकबाकीपैकी ५०% रक्कम दिनांक ०१.१०.२०१९ रोजी तर उर्वरित ५०% रक्कम नंतर ३ समान हप्यात देण्यात आलेली आहे. सबब या विषयी Whats App वर प्रसारीत होणाऱ्या संदेशाकडे दुर्लक्ष करण्यात यावे.**

११) विविध केंद्रस्थानी संपन्न होणाऱ्या, सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ/वार्षिक स्नेहसंमेलनात, उपस्थितीच्या प्रमाणात आर्थिक सहकार्य असोसिएशनने द्यावे, संस्थेच्या अंदाजपत्रकात, एकूणच Pensioners Community किंवा समाजातील दुर्बल घटक, जेष्ठ नागरिक, खेळाडू, कलाकार इत्यादीसाठी मदत, प्रोत्साहनपर हेतू यासाठी काही आर्थिक तरतूद करणे, दीर्घकाळ प्रलंबित दावे ज्यांचा उल्लेख सभागृहात झाला, अशा सर्व बाबींची नोंद घेतली आहे. त्यातील यर्थाथता, व्यवहार्यता तपासून निर्णय घेण्याचे काम कार्यकारिणी निश्चित करेल.

१२) सुवर्ण महोत्सवी वर्षातील संकल्पित उपक्रमातील काही उपक्रम यशस्वीपणे संपन्न झाले आहेत. राज्यातील इतर बहुसंख्य महानगरपालिकामध्ये सेवानिवृत्त कामगार / कर्मचारी यांच्यासाठी कार्य करणारी यंत्रणा नाही. तिथे सेवानिवृत्त मंडळींना खूप अडचणीना सामोरे जावे लागते. त्यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याचा संकल्प आहे. तसे प्राथमिक पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

संपर्क, संवाद हेतूने पालघर, कुडाळ व रत्नागिरी या पारिसरात रहाणाऱ्या निवृतीवेतन धारकांचे मेळावे आयोजित करावेत असा संकल्प आहे. त्यासाठी उपरोक्त परिसरात निवास करणाऱ्या निवृत्तीवेतन धारकांची माहिती जमा करण्याचे प्राथमिक काम हाती घेतले आहे. अनेक निवृत्तीवेतन धारकांची घरे उपरोक्त परिसरात आहेत. त्यांचे तिथे कारणपरत्वे जाणे येणे असते. परंतु बाकी निवास मुंबई व परिसरात असतो. जी सेवानिवृत्त मंडळी कायम स्वररूपी उपरोक्त परिसरात रहातात, त्यांचा स्नेहमेळावा घ्यावा असा संस्थेचा हेतू आहे. विधानसभा निवडणूका झाल्यानंतर स्नेहमेळाव्याचा तपशील नक्की करण्यात येईल.

१३) अलिकडच्या काळात जोमाने सुरु झालेली विभागीय केंद्रे विचारात घेता, सध्या एकूण १२ ठिकाणी संस्थाकार्य सुरू आहे. त्यामुळे कलाकार सभासदांच्या संख्येत देखील मोठी वाढ झाली. जास्तीत जास्त कलाकार सभासदांना संधी देण्याचा संस्थेचा मानस आहे. रंगमंच वेळेची उपलब्धता व जास्तीत जास्त कलाकारांचा समावेश, ह्याचा ताळमेळ बसविणे सोपे नाही. त्यामुळे संगीत कार्यक्रम नियोजन, हा विषय आव्हानात्मक झाला आहे. हा कार्यक्रम जानेवारी २०२५ मध्ये आयोजित करण्याच्या शक्यतेची चाचपणी सुरू आहे.

१४) सुवर्ण महोत्सवी वर्ष सांगता समारंभ सर्वच विभागीय केंद्रस्थानी संपन्न व्हावेत, असा संस्थेचा आग्रह आहे. काही हजार सभासद या माध्यमातून संपर्कित व्हावेत असा हेतू आहे. या समारंभांचे आयोजन/नियोजन, विभागीय केंद्र पातळीवर होणे अपेक्षित आहे. **सर्व केंद्राना, संस्था काही स्वरुपात आर्थिक सहाय्य निश्चितच देणार आहे. उर्वरित आर्थिक व्यवस्था संबंधित केंद्रास वर्गणी/देणगी स्वरुपात करावी लागणार आहे.** नुकत्याच प्राप्त सूचनेप्रमाणे या श्रृंखलेतील पहिला कार्यक्रम ठाणे येथे , दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात येत आहे.

१५) भविष्यात डोकावले तर असे लक्षात येईल की, **आणखी १० वर्षांनी म्हणजे सन २०३४ मध्ये आपल्या संस्थेचा षष्ठयब्धीपूर्ती कालावधी असेल. त्यानंतर मैलाचा टप्पा असणार आहे तो संस्थेचा हिरक महोत्सव, जो येईल सन २०४८ – २०४९ साली.** हे उपक्रम म्हणजे संस्था तसेच संस्थाकार्य विस्ताराच्या, संस्थाकार्य जास्तीत जास्त प्रभावशाली होण्याच्या संधी. या संधीचे सोने करायचे असेल तर सातत्यपूर्ण परिश्रम करावे लागतील. नवी मुंबई विभागाचे केंद्र अद्याप स्थिरावयाचे आहे. अलिकडच्या काळात ठाणे, गोरेगांव, पुणे, मुंबई शहर, चेंबूर या विभागीय केंद्रात कार्य गतिमान झाले आहे. कार्य विस्तारास खूप Scope आहे. मध्य, पश्चिम, हार्बर, ट्रान्स हार्बर या मार्गावरील प्रत्येक स्टेशन परिसरात रहाणाऱ्या सेवानिवृत्त मंडळींच्या संपर्क, संवादासाठी किमान एक Whats App group हे ध्येय असू शकते. खरंतर डोंबिवलीच्या पूर्वेकडील मंडळींना पश्चिमेस जाणे अवघड वाटते. या हिशोबाने प्रत्येक स्टेशनसाठी दोन ग्रुप तयार करावे लागतील.

१६) पुढील कालखंडात राज्य/राष्ट्र पातळीवर, संस्था तसेच संस्थाकार्य नेणे, संस्थेचा ठसा / स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असेल.

१७) या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रभावी प्रशासकीय व्यवस्थापन हवे व **त्यासाठी, जिथून संस्थेला कुणी ऊठ म्हणून दरडावणार नाही, अशी स्वतंत्र जागा – स्वत:चे कार्यालय हवे. संस्थेला स्वतंत्र कार्यालय हवे याबाबतीत एकमत आहे,** कुणाचाच विरोध नाही. मात्र जागा निश्चित करताना आता संपूर्ण Mumbai Metropolitan Region चा विचार करणे प्राप्त आहे. शिवाय संस्था कार्यक्षेत्र त्याही पलिकडे विस्तारले गेले आहे, आणखी विस्तारले जाणार आहे. याबाबत सहकार्यासाठी सर्वांना आवाहन आहे, **कुणी जागा देणगीदाखल देत असेल तर, त्याचेही स्वागत आहे**.

१८) सद्य परिस्थितीत, सेवावृत्तीने, निरलसपणे संस्थाकार्य करणे अवघड, आव्हानात्मक झाले आहे. कारण सभोवतालची सामाजिक परिस्थिती बदलली आहे. बदलापूर प्रकरणात असे दिसून आले आहे की, संबंधित शाळेची वास्तू फोडण्यापर्यंत अनियंत्रित जमाव गेला. ५०/ ६० वर्षांच्या परिश्रमांची, सेवावृत्तीची कदर केली गेली नाही. ज्येष्टांप्रती आदर, संवेदनशीलता राहिलेली नाही. कोणीही सामान्य व्यक्ती, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली राष्ट्रप्रमुखास फेकू, चोर म्हणतो, तर एका संस्थेतील कार्यकर्त्याची काय कथा? असे असले तरी संस्था व संस्थाकार्य वृद्धीसाठी सातत्यपूर्ण परिश्रमास पर्याय नाही.

१९) कार्य करताना नेहमी तन – मन – धनपूर्वक असा शब्दप्रयोग केला जातो. **यापैकी मन जर प्रेरणादायक असेल तरच शरीराने किंवा धनाने काही केले जाऊ शकते. नुसत्या सहानुभूतीने प्रत्यक्ष कार्य वाढत नाही, कार्य वाढण्यासाठी काहीतरी सकारात्मक कृती करावीच लागते.**

**नको रे मना द्रव्य ते पुढीलांचे । अती स्वार्थबुद्धी न रे पाप सांचे ॥**
**घडे भोगणे पाप ते कर्म खोटे । न होता मनासारिखे दु:ख मोठे ॥**

मनासारखे झाले नाही की अहंकार, मत्सर, द्वेष निर्माण होतो, त्याला अती स्वार्थ, खोटी कामे याची जोड मिळाली की कार्यनाश होतो हे खरे आहे. या मुद्यावर मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलणे केले होते. या वर्षीच्या वार्षिक अहवालाच्या पृष्ठ क्रमांक ४८ वर ते नमूदही केले आहे. **आपल्याला जर काही कार्य करणे शक्य होणार नसेल तर केवळ विरोधासाठी विरोध किंवा कार्यात अकारण अडथळा निर्माण होणार नाही, काम करणारा निरुत्साही होणार नाही एवढे तरी पहावे.**

आपण नेहमी प्रार्थना करतो की - **अनासायेन मरण । विना दैन्येन जीवनम देहांते तव सानिध्यम । देही मे परमेश्वर ।**

रुग्णालयाच्या शय्येवर खितपत पडल्यावर अनासायेन मरण या प्रार्थनेचा अर्थ समजतो, उमजतो. पण तेव्हा वेळ निघून गेलेली असते. दैन्य केवळ पैशाचेच नसते. कुणाच्याही आयुष्यात कोणत्याही प्रकारचे दैन्य येऊ नये, यासाठी तर **सर्वथैव सक्षमतेचा मंत्र आहे**. प्रत्येकाला मानसिक समाधान, शांतता, कृतार्थता लाभावी यासाठी - **जनी निंद्य ते सर्व सोडून द्यावे, जनी वंद्य ते सर्व भावे करणे प्राप्त आहे. आपणा सर्वांचे आयुष्यातील जेष्ठपर्व आनंदी, सुखी, समाधानी व्हावे, यासाठीच प्रार्थना आहे -**

**सर्वेपि सुखीनः सन्तु । सर्वे सन्तु निरामया ।।**

**सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित दुःख भाग्भवेत ।।**

**मा. अध्यक्षांच्या मनोगतानंतर संस्थेच्या संयुक्त कार्यवाह श्रीम. प्रतिमा पवार यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व राष्ट्रगीतानंतर अध्यक्षांच्या अनुमतीने सभा संपल्याचे कार्यवाह डॉ. नलावडे यांनी जाहीर केले.**

| | |
|---|---|
| **श्री. कमलाकर क्षीरसागर** | **डॉ. मारूती नलावडे** |
| अध्यक्ष | कार्यवाह |

# INDEPENDENT AUDITOR'S REPORT

To,
**The Members of M/s MUMBAI MUNICIPAL PENSIONER'S ASSOCIATION**
ROOM NO-9.GR.FLOOR, G- NORTH MUNICIPAL
WARD OFFICE BUILDING, J.K.SAWANT MARG
DADAR, MUMBAI - 400 028.

## Opinion

We have audited the attached financial statements of **M/s MUMBAI MUNICIPAL PENSIONER'S ASSOCIATION** which comprise of the Balance Sheet as at **31st March, 2025** and the statement of income and expenditure of the **Trust** for the year then ended and a summary of significant accounting policies and other explanatory information.

In our opinion and to the best of our information and according to explanations given to us, the financial statements give the information required by the **Bombay Public Trusts Act 1950, trust deed of the trust & rules there under**, in the manner so required, and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India.

(i) In case of Balance Sheet, of the state of affairs of the trust as on **31st March 2025** and

(ii) In case of income & expenditure account of the Loss of the Trust for the year ended on that date.

## Basis for Opinion

We conducted our audit in accordance with the Standards on Auditing (SAs) issued by ICAI Our responsibilities under those Standards are further described in the Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements section of our report. We are independent of the Company in accordance with the Code of Ethics issued by the Institute of Chartered Accountants of India together with the ethical requirements that are relevant to our audit of the financial statements under the provisions of **Bombay Public Trusts Act 1950, trust deed of the trust & rules there under** and we have fulfilled our other ethical responsibilities in accordance with these requirements and the Code of Ethics. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

## Responsibilities of The Managing Committee for the Financial Statements

The **managing committee of the trust** is responsible for the preparation and fair presentation of the financial statements in accordance with the Accounting Standards issued by ICAI, and for such internal control as management determines is necessary to enable the preparation of financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

In preparing the financial statements, **managing committee of the trust** is responsible for assessing the entity's ability to continue as a going concern, disclosing, as applicable,

matters related to going concern and using the going concern basis of accounting unless **managing committee of the trust** either intends to liquidate the entity or to cease operations, or has no realistic alternative but to do so.

The **managing committee of the trust** is responsible for overseeing the entity's financial reporting process.

## Auditor's Responsibility for the Trust of the Financial Statements

Our objectives are to obtain reasonable assurance about whether the financial statements as a whole are free from material misstatement, whether due to fraud or error, and to issue an auditor's report that includes our opinion. Reasonable assurance is a high level of assurance, but is not a guarantee that an audit conducted in accordance with SAs will always detect a material misstatement when it exists. Misstatements can arise from fraud or error and are considered material if, individually or in the aggregate, they could reasonably be expected to influence the economic decisions of users taken on the basis of these financial statements.

## Other Matter

We draw attention to the following points related to the financial statements. Our opinion is not qualified in respect of this matter.

1. **No Income Tax Registration : The trust has not registered with the Income Tax Dept. Every charitable entity has to take registration u/s 12AA of Income Tax Act 1961. If it is not taken then the interest income of the trust is taxable as a mutual concern.**
2. **The receipts of branch activities are not considered.**
3. **Report relating to accounts audited as required under sub-section (2) of section 33 & 34 and rule 19 of the Bombay Public Trusts Act is annexed to this report.**

DATED : 31/07/2025
PLACE : MUMBAI.

For **M/s. NILESH MHAPSEKAR & CO.**
CHARTERED ACCOUNTANTS
PROPRIETOR

Membership No. 116280
Firm Reg. No. 124697W
Unique Document Identification Number (UDIN) for this document is 25116280BMMALF5589

# MUMBAI MUNICIPAL

## INCOME & EXPENDITURE ACCOUNT

| 2023-2024 | | | 2024-2025 |
|---|---|---|---|
| Rs. P. | EXPENDITURE | Rs. P. | Rs. P. |
| | **TO ESTABLISHMENT EXPENSES** | | |
| 67,917.00 | a) Printing & Stationery | 211,309.00 | |
| 445,645.00 | b) Conveyance | 494,455.10 | |
| 13,062.00 | c) Postage & Telephone | 24,032.00 | |
| 508,600.00 | d) Establishment Expenses | 630,961.00 | 1,360,757.10 |
| 23,240.00 | **TO AUDIT FEES** | | 28,320.00 |
| 69,207.00 | **TO MISCELLANEOUS EXPENSES** | | 108,458.00 |
| 2,000.00 | **TO AFFILIATION FEES** | | 1,000.00 |
| – | **TO MAHILA DIN PROGRAMME** | | |
| 215,009.00 | Expenses for Mahila Din Programme | 8,955.00 | |
| 53,400.00 | Less : Contribution for Mahila Din Programme | _ | 8,955.00 |
| | **TO DEPRECIATION** | | |
| 6,124.00 | a) Furniture & Fixtures - Office | 7,352.00 | |
| 47,732.00 | b) Computer & Typewriter | 29,539.00 | 36,891.00 |
| 3,415.00 | **TO BANK CHARGES** | | 1,346.13 |
| | **TO EXPENSES ON OBJECT OF THE TRUST** | | |
| 13,000.00 | a) Prizes to Students of BMC School | 15,700.00 | |
| 164,795.00 | b) Gen. Body Meeting Expenses | 314,144.00 | |
| 153,198.00 | c) Association Activities | 166,069.00 | |
| – | d) Donation | 30,485.00 | 526,398.00 |
| 22,000.00 | **TO PROFESSIONAL FEES** | | 30,000.00 |
| 1,125.00 | **TO OFFICE RENT** | | 1,140.00 |
| 41,683.00 | **TO WEBSITE & SOFTWARE EXPENSES** | | 58,288.00 |
| – | **TO LEGAL FEES** | | 175,000.00 |
| – | **TO GST PAID** | | 76,790.00 |
| 576,723.00 | **TO INCOME TAX PAID** | | 1,085,026.00 |
| 1,223,417.00 | **TO EXCESS OF INCOME OVER EXPENDITURE** | | 312,599.77 |
| **3,545,492.00** | **TOTAL RS.** | | **3,810,969.00** |

**AS PER OUR REPORT OF EVEN DATE**

**FOR MR. NILESH MHAPSEKAR CHARTERED ACCOUNTANTS**

**MUMBAI**

**DATED : 31/07/25**

## PENSIONERS' ASSOCIATION

**FOR THE YEAR ENDING 31ST MARCH 2025**

| 2023-2024 | | | 2024-2025 |
|---|---|---|---|
| Rs. P. | INCOME | Rs. P. | Rs. P. |
| | **BY INTEREST** | | |
| | **(A) ON SAVING BANK A/C** | | |
| 5,080.00 | a) Saraswat Co-op. Bank Ltd. | 2,057.00 | |
| 35,465.00 | b) Municipal Co-op. Bank Ltd. | 24,000.00 | |
| 5,658.00 | c) Indian Bank | 4,132.00 | 30,189.00 |
| | **(B) ON FIXED DEPOSIT WITH BANKS** | | |
| 94,137.00 | a) Saraswat Co-op. Bank Ltd. | 119,280.00 | |
| 978,052.00 | b) Municipal Co-op. Bank Ltd. | 1,183,900.00 | |
| – | c) Indian Bank | – | 1,303,180.00 |
| | **BY INCOME FROM OTHER SOURCES** | | |
| 217,050.00 | b) Life Membership Fees | | 115,500.00 |
| 2,210,050.00 | **BY VOLUNTARY DONATION FROM MEMBERS** | | 2,362,100.00 |
| – | **BY MISCELLANEOUS RECEIPTS** | | – |
| **3,545,492.00** | **TOTAL RS.** | | **3,810,969.00** |

**FOR MUMBAI MUNICIPAL PENSIONERS' ASSOCIATION**

| Hemant Patwardhan | Dr. Maruti Nalavade | Kamalakar Kshirsagar |
|---|---|---|
| Hon. Treasurer | Hon. Secretary, | President |

| 2023-2024 | | | 2024-2025 |
|---|---|---|---|
| Rs. P. | FUNDS AND LIABILITIES | Rs. P. | Rs. P. |
| | **RESERVE FUND** | | |
| 3,666,406.77 | Balance as per last Balance Sheet | 3,897,926.77 | |
| | **Add :** Additions during year | | |
| 217,050.00 | a) Life Membership Fees | 115,500.00 | |
| 14,470.00 | b) Entrance Fees | 7,700.00 | |
| – | c) Donation to corpus | – | 4,021,126.77 |
| | **WELFARE FUND** | | |
| 17,910,511.45 | Balance as per last Balance Sheet | 19,087,260.45 | |
| 978,051.00 | **Add :** Interest on Fixed Deposits | 1,183,900.00 | |
| 198,698.00 | Donations' received | 276,107.00 | 20,547,267.45 |
| | **CONTRIBUTORY MEDICAL AID SCHEME** | | |
| 13,126,493.92 | Balance as per last Balance Sheet | 15,825,453.92 | |
| 2,959,550.00 | **Add :** Additions During the year | 3,142,600.00 | |
| 218,321.00 | **Add :** Donation for medical scheme | 36,501.00 | |
| 25,019.00 | **Add :** Interest on SB A/c | 18,592.00 | |
| 656,370.00 | **Add :** Interest on FD | 861,938.00 | |
| (1,170,300.00) | **Less :** Medical Aid To Members | (1,960,700.00) | 17,924,384.92 |
| | **GOLDEN JUBILEE FUND** | | |
| 1,227,605.00 | Balance as per last Balance Sheet | 1,095,234.50 | |
| 708,532.00 | **Add :** Additions During the year | – | |
| 7,368.00 | **Add :** Interest on SB A/c | 5,628.50 | |
| 36,304.00 | **Add :** Interest on FD A/c | 42,160.00 | |
| (884,574.50) | **Less :** Expenses for Golden Jubilee function | (759,868.00) | 383,155.00 |
| | **PURASKAR FUND ACCOUNT** | | |
| 628,084.00 | Balance as per last Balance Sheet | 608,084.00 | |
| – | **Add :** Additions During the year | 5,000.00 | |
| – | **Add :** Interest on Puraskar Fund A/c. | – | |
| – | **Add :** Tr. From Memorial Fund | – | |
| (20,000.00) | **Less :** Puraskar fund Paid | (22,500.00) | 590,584.00 |
| **40,514,959.64** | **C/F** | | **43,466,518.14** |

# PENSIONERS' ASSOCIATION

## 31ST MARCH 2025

| 2023-2024 | | | 2024-2025 |
|---|---|---|---|
| Rs. P. | PROPERTIES AND ASSETS | Rs. P. | Rs. P. |
| | **FURNITURE & FIXTURES** | | |
| | **(A) Office** | | |
| 61,247.50 | Balance as per last Balance Sheet | 55,123.50 | |
| – | Additional During the year | 18,400.00 | |
| (6,124.00) | **Less :** Depreciation @ 10% | (7,352.00) | 66,171.50 |
| | **COMPUTER & TYPEWRITER** | | |
| 117,080.00 | Balance as per last Balance Sheet | 73,848.00 | |
| 4,500.00 | Addition During the year | – | |
| (47,732.00) | **Less :** Depreciation @ 10% | (29,539.00) | 44,309.00 |
| | **INVESTMENTS** | | |
| 1,651,849.00 | a) The Saraswat Co-op. Bank Ltd. | 1,701,849.00 | |
| 624,578.00 | b) The Municipal Co-op. Bank Ltd. 366 (Golden Jubilee Fund) | 624,578.00 | |
| 28,991,105.00 | c) The Municipal Co-op. Bank Ltd. 1519 | 30,223,446.00 | |
| 8,771,389.00 | d) The Municipal Co-op. Bank Ltd. (C.M.A.S.) 854 | 11,552,856.00 | 44,102,729.00 |
| | **DEPOSITS** | | |
| 30,000.00 | Deposits for Hall | | – |
| | **INCOME TAX (T.D.S.)** | | |
| – | Balance as per last balance sheet | – | |
| 514,283.00 | **Add :** Additions During the year | 1,054,257.00 | |
| (514,283.00) | **Less :** Trfs to Income Tax paid A/c | (1,054,257.00) | – |
| **40,197,892.50** | **C/F.** | | **44,213,209.50** |

# MUMBAI MUNICIPAL

## BALANCE SHEET AS ON

| 2023-2024 | | | 2024-2025 |
|---|---|---|---|
| **Rs. P.** | **FUNDS AND LIABILITIES** | **Rs. P.** | **Rs. P.** |
| **40,513,959.64** | **B/F.** | | **43,466,518.14** |
| | **LEGAL FUND** | | |
| 517,996.00 | Balance as per last balance sheet | 506,896.00 | |
| – | **Add :** Contribution received during the year | – | |
| – | **Add :** Interest on Fixed Deposit | – | |
| (11,100.00) | **Less :** Expenses | – | 506,896.00 |
| | **LIABILITIES FOR EXPENSES** | | |
| 53,030.00 | Balance as per last Balance Sheet | 59,978.00 | |
| 18,000.00 | **Add :** Outstanding Audit fees | 18,000.00 | |
| 18,000.00 | **Add :** Outstanding Professional Fees | 18,000.00 | |
| 6,948.00 | **Add :** TDS Payable | 43,297.00 | |
| (36,000.00) | **Less :** Audit, Professional fees & TDS paid | (83,712.00) | 55,563.00 |
| 57,000.00 | **PROVISION FOR INCOME TAX** | | 23,454.00 |
| _ | **SUSPENSE** | | 930.00 |
| | **INCOME & EXPENDITURE ACCOUNT** | | |
| 6,385,303.11 | Balance as per last Balance Sheet | 7,608,720.11 | |
| 1,223,417.00 | **Add :** Excess Income Over Expenditure | 312,599.77 | 7,921,319.88 |
| **48,746,553.75** | **TOTAL RS.** | | **51,974,681.02** |

**AS PER OUR REPORT OF EVEN DATE**
**FOR MR. NILESH MHAPSEKAR CHARTERED ACCOUNTANTS**

**MUMBAI**

**DATED : 31/07/25**

## PENSIONERS' ASSOCIATION
### 31ST MARCH 2025

| 2023-2024 | | | 2024-2025 |
|---|---|---|---|
| Rs. P. | PROPERTIES AND ASSETS | Rs. P. | Rs. P. |
| **40,197,892.50** | **B/F** | | **44,213,209.50** |
| | **INTEREST RECEIVABLE** | | |
| 1,425,235.86 | Balance as per last Balance Sheet | 2,117,725.86 | |
| 692,490.00 | **Add :** Receivable During the year | (164,071.00) | 1,953,654.86 |
| | **CASH & BANK BALANCE** | | |
| 10,511.00 | Cash in hand with Treasurer | 1,204.00 | |
| 91,631.22 | a) The Saraswat Co-op. Bank Ltd. | 86,351.47 | |
| 160,462.80 | b) Indian Bank | 101,220.92 | |
| 236,503.87 | c) The Mun. Co-op. Bank A/c-1519 | 17,881.27 | |
| 309,176.00 | d) The Mun. Co-op. Bank A/c-854 | 21,459.00 | |
| 278,050.50 | e) The Mun. Co-op. Bank A/c-366 | _ | 228,116.66 |
| 75,000.00 | **ADVANCE TO ADVOCATE** (Nilima Sangalikar) | | 75,000.00 |
| 90,000.00 | **ADVANCE TO ADVOCATE** (Anagah Desai) | | _ |
| 2,210,050.00 | Receivable A/c Donation form Members | | 2,362,100.00 |
| 2,969,550.00 | Receivable A/c Medical Aid Scheme | | 3,142,600.00 |
| **48,746,553.75** | **TOTAL RS.** | | **51,974,681.02** |

**FOR MUMBAI MUNICIPAL PENSIONERS' ASSOCIATION**

| **Hemant Patwardhan** | **Dr. Maruti Nalavade** | **Kamalakar Kshirsagar** |
|---|---|---|
| Hon. Treasurer | Hon. Secretary, | President |

## बृहन्मुंबई महानगरपालिका
## १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२५

| 2023–2024 | | | 2024–2025 |
|---|---|---|---|
| रुपये | खर्च | रुपये | रुपये |
| | **आस्थापनीय खर्च** | | |
| 67,917.00 | अ) छपाई व स्टेशनरी | 211,309.00 | |
| 445,645.00 | ब) प्रवास भत्ता | 494,455.10 | |
| 13,062.00 | क) टपाल आणि टेलिफोन | 24,032.00 | |
| 508,600.00 | ड) आस्थापन खर्च | 630,961.00 | 1,360,757.10 |
| 24,240.00 | **ऑडीट फी** | | 28,320.00 |
| 69,207.00 | **किरकोळ खर्च** | | 108,458.00 |
| 2,000.00 | **संलग्नता फी** | | 1,000.00 |
| | **महिला दिन कार्यक्रम** | | |
| 215,009.00 | महिला दिन खर्च | 8,955.00 | |
| 53,400.00 | महिला दिन वर्गणी | – | 8,955.00 |
| | **घसारा** | | |
| 6,124.00 | अ) फर्निचर आणि फिक्चर | 7,352.00 | |
| 47,732.00 | ब) संगणक / टाईपरायटर | 29,539.00 | 36,891.00 |
| 3,415.00 | **बँक आकार** | | 1,346.13 |
| | **ट्रस्ट उद्दिष्टे** | | |
| 13,000.00 | अ) म.न.पा. शाळेतील विद्यार्थ्यांना बक्षीस | 15,700.00 | |
| 164,795.00 | ब) वार्षिक सभा | 314,144.00 | |
| 153,198.00 | क) असोसिएशन उपक्रम | 166,069.00 | |
| – | ड) देणगी | 30,485.00 | 526,398.00 |
| 22,000.00 | व्यावसायिक फी | | 30,000.00 |
| 1,125.00 | कार्यालय भाडे | | 1,140.00 |
| 41,683.00 | वेबसाईट / सॉफ्टवेअर | | 58,288.00 |
| – | विधी खर्च | | 175,000.00 |
| – | जी.एस.टी. | | 76,790.00 |
| 576,723.00 | आयकर | | 1,085,026.00 |
| 1,223,417.00 | खर्चापेक्षा जमा जास्त | | 312,599.77 |
| **3,545,492.00** | **एकूण** | | **3,810,969.00** |

**AS PER OUR REPORT OF EVEN DATE**
**FOR MR. NILESH MHAPSEKAR CHARTERED ACCOUNTANTS**

**MUMBAI**

**DATED : 31/07/25**

पेन्शनर्स असोसिएशन

कालावधीतील जमा-खर्चाचा तपशील

| 2023-2024 | | | 2024-2025 |
|---|---|---|---|
| रुपये | जमा | रुपये | रुपये |
| | **व्याज** | | |
| | **(अ) बचत खात्यावरील व्याज** | | |
| 5,080.00 | क) सारस्वत बँक | 2,057.00 | |
| 35,465.00 | ख) म्युनि. को. ऑ. बँक | 24,000.00 | |
| 5,658.00 | ग) इंडियन बँक | 4,132.00 | 30,189.00 |
| | **(ब) बँकेमधील मुदत ठेवी** | | |
| 94,137.00 | क) सारस्वत बँक | 119,280.00 | |
| 978,052.00 | ख) म्युनि. को. ऑ. बँक | 1,183,900.00 | |
| 1,072,189.00 | ग) इंडियन बँक | - | 1,303,180.00 |
| | **इतर श्रोतांकडून मिळणाऱ्या उत्पनाद्वारे** | | |
| 217,050.00 | क) आजीवन सभासद वर्गणी | | 115,500.00 |
| 2,210,050.00 | **सभासदांकडून वार्षिक वर्गणी** | | 2,362,100.00 |
| - | **किरकोळ जमा** | | - |
| **3,545,492.00** | **एकूण** | | **3,810,969.00** |

**FOR MUMBAI MUNICIPAL PENSIONERS' ASSOCIATION**

| Hemant Patwardhan | Dr. Maruti Nalavade | Kamalakar Kshirsagar |
|---|---|---|
| Hon. Treasurer | Hon. Secretary, | President |

# MUMBAI MUNICIPAL PENSIONERS' ASSOCIABUDGET

## BUDGET ESTIMATES FOR THE YEAR 2025-2026

| BUDGET PROVISION FOR 2024-2025 AMOUNT RS. | ACTUALS 2024-2025 AMOUNT RS. | INCOME | PROVISION FOR FINANCIAL YEAR 2025-26 AMOUNT RS. |
|---|---|---|---|
| 10,86,335.39 | 10,86,335.39 | **A) OPENING BALANCE** | |
| 10,511.00 | 1,204.00 | CASH | |
| | | BANK | |
| 91,631.22 | 86,351.47 | THE SARASWAT CO-OP BANK LTD | |
| 1,60,462.80 | 1,01,220.92 | INDIAN BANK | |
| 2,36,503.87 | 17,881.27 | THE MUNCIPAL CO-OP BANK A/C 1519 | |
| 3,09,176.00 | 21,459.00 | THEMUNCIPAL CO-OP BANK LTD.A/C 854 | |
| 2,78,050.50 | 0.00 | THE MUNCIPAL CO-OP BANK A/C 366 | |
| | | **B) REGULAR INCOME** | |
| 22,50,000.00 | 22,10,050.00 | ANNUAL FEES - FROM MEMBERS ( 2023 - 2024 ) | |
| 22,50,000.00 | 23,62,100.00 | ANNUAL FEES - FROM MEMBERS ( 2024 - 2025 ) | |
| | | ANNUAL FEES - FROM MEMBERS ( 2025 - 2026 ) | 25,00,000.00 |
| | | **C) CONTRIBUTION - MEDICAL ASSISTANCE SCHEME** | |
| 29,50,000.00 | 29,69,550.00 | CONTRIBUTION - MEDICAL ASSISTANCE SCHEME (2023-2024) | |
| 29,50,000.00 | 31,42,600.00 | CONTRIBUTION - MEDICAL ASSISTANCE SCHEME (2024-2025) | |
| | | CONTRIBUTION - MEDICAL ASSISTANCE SCHEME (2025-2026) | 35,00,000.00 |
| | | **D) MEMBERSHIP SUBSCRIPTION & ENTRANCE FEE** | |
| 3,00,000.00 | 2,30,400.00 | LIFE MEMBERSHIP SUBSCRIPTION ( 1000 NEW MEMBERS ) | 3,00,000.00 |
| 10,000.00 | 7,680.00 | ENTRANCE FEE ( 1000 NEW MEMBERS) | 10,000.00 |
| | | **E) INTEREST** | |
| 80,000.00 | 54,004.50 | INTEREST ON SB A/C | 75,000.00 |
| 15,00,000.00 | 13,50,900.00 | INTEREST ON F.D. MUNPL. CO-OP. BANK & SARASWAT BANK | 16,50,000.00 |
| | | **F) DONATION** | |
| 5,00,000.00 | 3,17,608.00 | DONATION | 5,00,000.00 |
| **1,38,76,335.39** | **1,28,73,009.16** | **TOTAL INCOME** | **85,35,000.00** |
| | | **EXPENDITURE** | |
| | | **A) ESTABILISHMENT EXPENSES** | |
| 6,50,000.00 | 6,30,961.00 | SALARIES | 7,50,000.00 |
| 5,00,000.00 | 4,94,455.10 | CONVEYANCE & TRAVELLING EXP | 7,50,000.00 |
| | | **B) ADMINISTRATIVE EXPENSES** | |
| 75,000.00 | 2,11,309.00 | PRINTING & STATIONERY | 2,00,000.00 |
| 20,000.00 | 11,996.00 | POSTAGE & TELEPHONES | 25,000.00 |
| 30,000.00 | 19,470.00 | WEBSITE LICENSE & MAINTAINANCE | 30,000.00 |
| 30,000.00 | 50,854.00 | INTERNET CHAR./SMS PACKAGE/SOFTWARE LICENSE FEES | 50,000.00 |
| 30,000.00 | 30,000.00 | AUDIT FEES | 25,000.00 |
| 20,000.00 | | DEPRECIATION | 20,000.00 |
| 2,500.00 | 1,000.00 | AFFILIATION FEES | 1,000.00 |
| 20,000.00 | 28,320.00 | PROFESSIONAL FEES | 30,000.00 |
| 1,00,000.00 | 1,44,800.00 | MEETING EXPENSES | 1,50,000.00 |
| 3,500.00 | | INTERNAL AUDIT FEE | 3,000.00 |
| 10,000.00 | 2,700.00 | OFFICE EXPS & OFFICE RENT | 5,000.00 |
| 2,50,000.00 | | OFFICE FURNITURE | 2,50,000.00 |
| 5,000.00 | 1,348.38 | BANK CHARGES | 5,000.00 |
| 7,79,315.00 | | INCOME TAX | 7,50,000.00 |
| 76,790.00 | | G S T | 2,50,000.00 |
| 1,00,000.00 | 1,03,370.00 | **C) MISCCELLANEOUS EXPENSES** | 1,50,000.00 |
| | | **D) INVESTMENTS** | |
| 60,00,000.00 | 19,60,700.00 | CONTRIBUTION TO MEDICAL ASSISTANCE SCHEME FUND | 28,50,000.00 |
| 3,10,000.00 | | CONTRIBUTION TO MEMBERSHIP FUND | 3,10,000.00 |
| 20,00,000.00 | | CONTRIBUTION TO GENERAL FUND | 10,00,000.00 |
| | | **E) GOLDEN JUBLEE CELEBRATION EXPENSES** | |
| 10,00,000.00 | 7,57,335.00 | A) GOLDEN JUBILEE PRG. CLOSING CEREMANY FUNCTION | |
| | - | B) SOUVENIR PRINTING | |
| 2,50,000.00 | | C) WORKSHOP / CONFERENCE | 2,00,000.00 |
| 5,00,000.00 | | D) KOKAN REGIONAL GET-TOGETHER | 2,00,000.00 |
| 2,50,000.00 | | E) OTHER | 50,000.00 |
| 35,000.00 | 38,200.00 | **F) PURASKAR** | 50,000.00 |
| 1,00,000.00 | 1,56,069.00 | **G) EXPENSES ON ASSOCIATION ACTIVITIES & QR CODE** | |
| | | ACTIVITIES OF THE ASSOCIATION | 5,00,000.00 |
| 3,00,000.00 | 1,75,844.00 | **H) ANNUAL GENERAL BODY MEEING EXPS.** | 3,00,000.00 |
| | | 11 ZONAL KENDRA - MEETINGS, PRO. & ALLIED EXPENSES | 7,00,000.00 |
| | | FINANCIAL ASSISTANCE TO MEMBERS | 30,00,000.00 |
| 10,00,000.00 | | **I) OFFICE PREMISES FUND** | 10,00,000.00 |
| 1,00,000.00 | | **J) PROVISION FOR UNFORSEEN EXPENSES** | 1,00,000.00 |
| 1,35,335.39 | | **SURPLUS** | 31,000.00 |
| **1,38,26,335.39** | **56,74,836.48** | **TOTAL EXPENDITURE** | **1,37,35,000.00** |

# MUMBAI MUNICIPAL PENSIONERS' ASSOCIABUDGET

## BUDGET ESTIMATES FOR THE YEAR 2025-2026

| BUDGET PROVISION FOR 2024-2025 AMOUNT RS. | ACTUALS 2024-2025 AMOUNT RS. | I | PROVISION FOR FINANCIAL YEAR 2025-26 AMOUNT RS. |
|---|---|---|---|
| 10,86,335.39 | 10,86,335.39 | **प्रारंभिक शिल्लक** | |
| 10,511.00 | 1,204.00 | रोख | |
| | | बँक | |
| 91,631.22 | 86,351.47 | सारस्वत को -ऑप बँक लिमिटेड | |
| 1,60,462.80 | 1,01,220.92 | इंडियन बँक | |
| 2,36,503.87 | 17,881.27 | दि म्युनिसिपल को -ऑप बँक लिमिटेड, मुंबई खाते क्र.-1519 | |
| 3,09,176.00 | 21,459.00 | दि म्युनिसिपल को -ऑप बँक लिमिटेड, मुंबई खाते क्र.-854 | |
| 2,78,050.50 | 0.00 | दि म्युनिसिपल को -ऑप बँक लिमिटेड, मुंबई खाते क्र.-366 | |
| | | **उत्पन्न** | |
| 22,50,000.00 | 22,10,050.00 | सभासद वार्षिक वर्गणी (2023-24) | |
| 22,50,000.00 | 23,62,100.00 | सभासद वार्षिक वर्गणी (2024-25) | |
| | | सभासद वार्षिक वर्गणी (2025-26) | 25,00,000.00 |
| | | **वैद्यकीय सहाय्य योजना वार्षिक वर्गणी** | |
| 29,50,000.00 | 29,69,550.00 | वैद्यकीय सहाय्य योजना वार्षिक वर्गणी (2023-24) | |
| 29,50,000.00 | 31,42,600.00 | वैद्यकीय सहाय्य योजना वार्षिक वर्गणी (2024-25) | |
| | | वैद्यकीय सहाय्य योजना वार्षिक वर्गणी (2025-26) | 35,00,000.00 |
| | | **सभासद वर्गणी आणि प्रवेश फी** | |
| 3,00,000.00 | 2,30,400.00 | आजीवन सभासद वर्गणी (1000 New Members ) | 3,00,000.00 |
| 10,000.00 | 7,680.00 | प्रवेश फी (1000 New Members) | 10,000.00 |
| | | **व्याज** | |
| 80,000.00 | 54,004.50 | व्याज (बचत खाते) | 75,000.00 |
| 15,00,000.00 | 13,50,900.00 | व्याज (मुदत ठेव) | 16,50,000.00 |
| | | **देणगी** | |
| 5,00,000.00 | 3,17,608.00 | देणगी | 5,00,000.00 |
| **1,38,76,335.39** | **1,28,73,009.16** | **एकूण उत्पन्न** | **85,35,000.00** |
| | | **खर्च** | |
| | | **आस्थापना खर्च** | |
| 6,50,000.00 | 6,30,961.00 | पगार | 7,50,000.00 |
| 5,00,000.00 | 4,94,455.10 | प्रवास खर्च | 7,50,000.00 |
| | | **व्यवस्थापकीय खर्च** | |
| 75,000.00 | 2,11,309.00 | छपाई व साधन सामुग्री | 2,00,000.00 |
| 20,000.00 | 11,996.00 | टपाल खर्च / दूरध्वनी खर्च | 25,000.00 |
| 30,000.00 | 19,470.00 | वेबसाइट लायन्स व परिरक्षण | 30,000.00 |
| 30,000.00 | 50,854.00 | इंटरनेट चार्जस इ. | 50,000.00 |
| 30,000.00 | 30,000.00 | लेखा परिक्षण शुल्क | 25,000.00 |
| 20,000.00 | | घसारा | 20,000.00 |
| 2,500.00 | 1,000.00 | सलग्नता वर्गणी | 1,000.00 |
| 20,000.00 | 28,320.00 | व्यवसायिक शुल्क | 30,000.00 |
| 1,00,000.00 | 1,44,800.00 | सभा शुल्क | 1,50,000.00 |
| 3,500.00 | | अंतर्गत लेखा परिक्षण शुल्क | 3,000.00 |
| 10,000.00 | 2,700.00 | कार्यालयीन खर्च व भाडे | 5,000.00 |
| 2,50,000.00 | | कार्यालयीन फर्निचर | 2,50,000.00 |
| 5,000.00 | 1,348.38 | बँक शुल्क | 5,000.00 |
| | 7,79,315.00 | आयकर | 7,50,000.00 |
| | 76,790.00 | वस्तु सेवा शुल्क | 2,50,000.00 |
| 1,00,000.00 | 1,03,370.00 | **इतर खर्च** | 1,50,000.00 |
| | | **गुंतवणूक** | |
| 60,00,000.00 | 19,60,700.00 | वैद्यकीय सहाय्य योजना निधी | 28,50,000.00 |
| 3,10,000.00 | | सभासद निधी | 3,10,000.00 |
| 20,00,000.00 | | सर्वसाधारण सभासद निधी | 10,00,000.00 |
| | | **सुवर्ण महोत्सव उपक्रम खर्च** | |
| 10,00,000.00 | 7,57,335.00 | अ) सुवर्ण महोत्सव समारोप समारंभ | |
| | - | ब) स्मरणिका छपाई | |
| 2,50,000.00 | | क) कार्यशाळा आणि परिषद | 2,00,000.00 |
| 5,00,000.00 | | ड) कोकण प्रादेशिक संमेलन | 2,00,000.00 |
| 2,50,000.00 | | इ) इतर खर्च | 50,000.00 |
| 35,000.00 | 38,200.00 | **पुरस्कार** | 50,000.00 |
| 1,00,000.00 | 1,56,069.00 | **संघटना उपक्रम खर्च** | |
| | | **असोसिएशनचे उपक्रम** | 5,00,000.00 |
| 3,00,000.00 | 1,75,844.00 | **वार्षिक सर्वसाधारण सभेचा खर्च** | 3,00,000.00 |
| | | 11 विभागीय केंद्र - बैठका, कार्यक्रम आणि संबंधित खर्च | 7,00,000.00 |
| | | सदस्यांना आर्थिक मदत | 30,00,000.00 |
| 10,00,000.00 | | **इमारत निधी** | 10,00,000.00 |
| 1,00,000.00 | | **अनपेक्षित खर्चासाठी तरदूत** | 1,00,000.00 |
| 1,35,335.39 | | **अखेरची शिल्लक** | 31,000.00 |
| **1,38,26,335.39** | **56,74,836.48** | **एकूण खर्च** | **1,37,35,000.00** |

# महाराष्ट्र - राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ.।।

भीती न आम्हां तुझी मुळी ही, गडगडणाऱ्या नभा
अस्मानीच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभू राजा
दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।२।।

– राजा बढे

## पगार स्लिप / पेन्शन स्लिपवर येणारी माहिती

| | | |
|---|---|---|
| 1) | AR-7 | पगाराची ७व्या पेची थकबाकी (एरिअस) |
| 2) | FAP | फॅमिली पेन्शन बेसिक |
| 3) | DRP | Dearness Pay |
| 4) | DRF | फॅमिली पेन्शन डी.ए. |
| 5) | Pen | Pension |
| 6) | BAS | Pension Payble |
| 7) | E.C.No. | Employee Code |
| 8) | EMR CD | Employee Code Family Pensioner |
| 9) | APO | 7th Pay Arrears After 01.01.2016 |
| 10) | APN | 7th Pay Arrears before 01.01.2016 |
| 11) | PG.7 | सातवा वेतन आयोग उपदान (ग्रॅज्युएटी) |
| 12) | PC.7 | अंशराशीकरण फरक |
| 13) | LEA | अर्जित रजेचे देयक |
| 14) | PCM | अंशराशीकरण |
| 15) | HPL | अर्धपगारी रजेचे देयक |
| 16) | 2EXG | Arr. Exgratia - सानुग्रह अनुदानाचा फरक |
| 17) | EXG | सानुग्रह अनुदान |

**मार्गदर्शक मंडळ :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. विजयसिंह पाटणकर | - | निवृत्त अतिरिक्त आयुक्त | ९८३३००२५०५ |
| २) | श्री. शांताराम खेडेकर | - | निवृत्त उपप्रमुख लेखापाल | ९९६९०२७९९० |
| ३) | श्री. प्रभाकर जोशी | - | निवृत्त प्रमुख लेखापाल | ९९६७८३७४२३ |
| ४) | श्री. अविनाश काळे | - | निवृत्त मुख्य अभियंता | ९८६९००९०५७ |
| ५) | श्री. प्रभाकर गावडे | - | निवृत्त उपप्रमुख लेखापाल | ८८३०२२८४२१ |
| ६) | श्री. रमाकांत शेर्लेकर | - | लेखा अधिकारी श्रेणी - १ | ९८१९६३१००२ |
| ७) | श्री. अनंत केळकर | - | निवृत्त प्रशासकीय अधिकारी (आरोग्य) | ९८६९४०२२६३ |

**निमंत्रित सदस्य**

| नाव | स्थळ | भ्रमणध्वनी/दूरध्वनी |
|---|---|---|
| १. श्री. एकनाथ. शं. कावतकर | दादर | ९९२०६४९८०८ |
| २. श्री. अनिलराज कवेस्कर | नवी मुंबई | ९१६७८२५८३८ |
| ३. श्रीम. शिल्पा नाईक | चेंबूर | ९८२०२२२०७५ |
| ४. श्रीम.अदिती पांजरी | गिरगाव | ९३२३५६४६२४ |
| ५. श्री.जॉन गोन्सालवीस | वसई | ९३२२७५८८०४ |
| ६. श्री.देविदास बधान | मुलुंड | ९९८७५५३५६६ |
| ७. श्री. शिरीष शुक्ल | डोंबिवली | ९९२०६०९३११ |
| ८. श्रीम. नीता मांजरेकर | गोरेगाव | ९६५३३२८७५६ |
| ९. श्रीम. अनुजा आचरेकर | गिरगाव | ९८३३१९२८२१ |
| १०. श्री. प्रमोद कुलकर्णी | बोरिवली | ९९६९००६३०९ |
| ११. श्री. प्रदीप कुलकर्णी | डोंबिवली | ९७६९२२००५० |
| १२. श्रीम. माधवी शेंडये | गोरेगाव | ९९३०२१४३७७ |
| १३. श्री. सुहास खामकर | ठाणे | ९८२०८४०२५३ |
| १४. श्रीम. रेखा ताम्हाणेकर | मुलुंड | ९००४२८१६१० |
| १५. श्रीम. विजया पाटील | वसई | ९०२११७५०७७ |
| १६. श्री. रवींद्र बावीस्कर | कल्याण | ९००४३९०७२७ |
| १७. श्री. मधुकर आंबोणकर | ठाणे | ९९६९१६६६८२ |
| १८. श्रीम. संगीता जोशी | दादर | ९९६९०१४९०८ |
| १९. श्री. विजय सावंत | गोरेगाव | ९८६९९८६२९७ |
| २०. श्री. शरद कुवेसकर | माहीम | ९८६९४६४५४४ |

कार्यालयीन कर्मचारी :श्रीम. रागिणी गुरव :- लिपीक

श्रीम. मनाली गावड :- लिपीक (टॅली)

श्री. प्रकाश खर्डे :- कार्यालय सहाय्यक

श्रीम. प्रतिक्षा खर्डे :- सेवक

## छापता छापता

✻ सुवर्ण महोत्सवानिमित्त समाजातील गुणीजणांचा सत्कार व गौरव करण्याचे भाग्य बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनला मिळाले, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटत आहे.

✻ निवृत्तीनंतर व निवृत्तीवेतनाबरोबर आपण आपले आमच्याशी असलेले नाते अधिक घट्ट करण्यासाठी सतत संपर्क व प्रत्यक्ष संवादाच्या मार्गाने चालूया.

✻ आपल्या व कुटुंबाच्या आनंदा प्रित्यर्थ शुभ कार्याच्या / क्षणांच्या निमित्ताने संस्थेच्या वाढ व विस्तारासाठी सक्रीय आर्थिक सहभाग देऊया.

✻ सुवर्ण महोत्सव ते षष्टयब्दिपूर्तीच्या वाटचालीची तयारी आजपासून सुरू करूया.

✻ सर्वथैव सक्षमतेसाठी संस्थेच्या विविध ११ शाखांच्या विविध उपक्रमात सहभागी होऊया.

✻ www.bmpa.co.in या आपल्या संस्थेच्या अधिकृत वेबसाईटवर नियमित भेट देऊन आपली माहिती अद्ययावत ठेवूया.

✻ सभासद होण्यासाठी कोणाचीही वाट न पाहता ऑफलाईन अथवा वेबसाईटवरील सभासद फॉर्म भरून संस्थेचे सभासद होऊया व नंतर सक्रिय कार्यकर्ते होण्याचा प्रयत्न करूया.

✻ बृहन्मुंबई महानगरपालिकेचे निवृत्त कर्मचारी, निवृत्ती वेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारक, सभासदांच्या न्याय हक्कांसाठी झगडणारे **एकमेव नोंदणीकृत, मान्यताप्राप्त व्यासपीठ म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन होय.**

## संस्थेच्या दस्तावेजांची विल्हेवाट

संस्थेला ५० वर्षे पूर्ण झालेली असून संस्था कार्यालयात सन १९७४ पासूनचे जुने दस्तावेज उपलब्ध आहेत. संस्थेच्या दस्तावेजांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. संस्था कार्यालयाची जागा अत्यंत लहान असल्याने हे दस्तावेज जतन करणेही जिकीरीचे होत आहे. तसेच त्यातील बरेच दस्तावेज फाटलेले असून त्यांना वाळवीही लागलेली आहे.

उपरोक्त सर्व परिस्थिती लक्षात घेऊन सनदी लेखापाल यांच्या **सूचनेवरून खालील नमूद केलेले दि.३१ मार्च २०१४ पर्यंतचे** दस्तावेज फाडून टाकून त्यांची विल्हेवाट लावण्याचा निर्णय कार्यकारिणीने घेतला आहे.

**विल्हेवाट लावण्यात येणाऱ्या दस्तावेजांची यादी पुढीलप्रमाणे.**

१) सभासद नोंदणी पावत्या (स्थळ प्रती)

२) देणगी पुस्तके (स्थळ प्रती)

३) खर्चाचे चलन / पावत्या

४) वार्षिक अहवाल ( मात्र प्रत्येक वर्षाच्या किमान ५ प्रती जतन करून ठेवल्या जातील.)

५) वैद्यकीय सहाय्याचे मंजूर व नामंजूर अर्ज (दि.१ जानेवारी, २०२० पूर्वीचे.), इ.

ज्या सभासदांना उपरोक्तपैकी कांही दस्तावेज हवे आहेत, **त्यांनी संस्थेकडे दि.३०.०९.२०२५ पर्यंत लेखी मागणी करावी.** दि. ३० ऑक्टोबर, २०२५ पर्यंत त्यांना ते दस्तावेज मिळू शकतील. त्यानंतर ते पूर्णत: नष्ट केले जातील याची सर्व सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.